सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
आसमंतसह
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर
रविवार, १५ सप्टेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४० वे अंक ३१६ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विनम्र अभिवादन



## कर्मयोगी अप्पासाहेब काडादी

शिक्षण, आरोग्य, सहकार, राजकारण आणि समाजकारण या क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करतानाच सामान्य शेतकरी, शेतमजूर आणि कामगार हाच श्वास आणि ध्यास घेऊन आयुष्यभर वाटचाल आपण केली. अशा अलौकिक कर्तृत्वाच्या कर्मयोग्यास जयंतीनिमित्त **विनम्र अभिवादन.**

## ॲड. सोमनाथ (सोमेश) रामेश्वर वैद्य

**संस्थापक अध्यक्ष– स्वयंम शिक्षा एज्युकेशनल फाऊंडेशन, सोलापूर**

www.somnathvaidya.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ....तर आम्ही घराघरात मुख्यमंत्र्यांचे फोटो लावू

**पंढरपुरीतल उपोषणकर्ते : मंत्र्यांच्या शिष्टमंडळाबरोबरीची चर्चा निष्फळ; उपोषण सुरूच राहणार, उद्या मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या सोबत समाजाच्या शिष्टमंडळाची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ सप्टेंबर-**

घटनेनुसार धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी पंढरपूर येथे आमरण उपोषण सुरू आहे. आज सहावा दिवस असून असून जर मुख्यमंत्री शिंदेनी आमची आरक्षणाची अमंलबजावणी केली तर धनगर समाजाच्या प्रत्येक घरात फोटो लावू असे स्पष्ट मत उपोषणकर्ते यांनी शिष्टमंडळाला सांगितले.

सरकारच्या वतीने उपोषण मागे घ्यावे म्हणून व आरक्षणा प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील व उत्पादन शुल्कमंत्री शंभूराजे देसाई यांनी आंदोलकांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी आंदोलकांच्या शिष्टमंडळाबरोबर रविवार १५ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान निर्णय होत नाही, तोपर्यंत उपोषण सोडण्यास आंदोलकांनी नकार दिला.

धनगर समाजाचा एसटी आरक्षणाची अमंलबजावणी करावी या मागणीसाठी येथील टिळक स्मारक मैदानात गेल्या सहा दिवसांपासून सहा आंदोलकांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. यास दिवसेंदिवस मोठा प्रतिसाद मिळत असून राज्यभरातील समाजबांधव हजेरी लावत आहेत. दरम्यान गेल्या पाच दिवसांपासून आंदोलकांशी किंवा समाजाशी राज्य शासनाकडून कोणतीच चर्चा करण्यात येत नसल्यामुळे संताप व्यक्त केला जात होता. अखेर शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार चंद्रकांत पाटील व शंभूराजे देसाई यांनी पंढरीचा दौरा केला. यावेळी दोन्ही मंत्र्यांनी प्रथम धनगर समाजाच्या प्रतिनिधींची विश्रामगृह येथे तब्बल दोन तास चर्चा केली. यानंतर त्यांनी आंदोलनस्थळी भेट देत उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी चंद्रकांत पाटील यांनी, आरक्षण प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी आम्हाला सर्व कार्यक्रम रद्द करून आंदोलकांशी चर्चा करण्यास पाठविले असल्याची माहिती दिली. आंदोलकांच्या मागणीनुसार मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये धनगर समाजाचे आजी, माजी आमदार, मंत्री तसेच अभ्यासक हे राज्य शासनाशी चर्चा करणार आहेत. या बैठकीत आरक्षण प्रश्नावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. धनगर आरक्षणावर कायद्याचा पेच निर्माण झाला आहे. काही जातींनी धनगड जातीवर आरक्षण घेतले आहे. यामुळे न्यायालयाने धनगर आरक्षणाची याचिका फेटाळली असल्याची माहिती त्यांनी दिली. तरीही धनगर आरक्षण देण्यास आम्ही बांधील असून यावर तोडगा काढणार असल्याचे आश्वासन पाटील यांनी दिले.

### आल्याबद्दल आभार

मंत्री देसाई यांनी आम्हाला इतर कार्यक्रम असल्याने लवकर निघावे लागेल, असे सुरुवातीसच सांगितले. त्यामुळे आंदोलक चिडले आणि तुम्हाला वेळ नसेल तर आम्हाला भेटायला आलात त्याबद्दल आभार आणि आता गेलात तरी चालेल असे खडेबोल सुनावताच मंत्री देसाई गप्प झाले आणि पुन्हा चर्चा सुरू केली. परंतु ती चर्चा निष्फळ ठरली.



### धनगर समाजाच्या बाजूने कायमच आहे : आ. पडळकर

माझ्या समाजाला माझी भूमिका माहित आहे. मी ती बोलायलाच पाहिजे अशातला भाग नाही. मी धनगर समाजाच्या बाजूने कायमच आहे. मी कार्यकर्ता आहे. धनगर समाजातून वर गेलोय. धनगर समाजाच्या लोकांनी पाठबळ दिलेला आहे आणि त्यामुळे जिथे कुठे उपोषण आमचे मुलं करतायेत त्या उपोषणाला माझा नेहमी पाठिंबा असतो. देवेंद्र फडणवीस यांनीदेखील धनगर आरक्षणाबाबत आपली स्पष्टता दिली आहे की धनगर समाजाच्या आरक्षणाच्या बाबतीत पहिल्या कॅबिनेटमध्ये घेतो म्हणून सांगितलं. परंतु त्यातल्या त्यात क्रिटिकल परिस्थितीबाबत त्यांनाही माहिती नाही. यामध्ये निश्चिततच काहीतरी तोडगा निघेल. आमच्याकडून चारही बाजूने प्रयत्न केले जात आहे. हायकोर्टामध्ये आम्ही केस हरलो. त्यानंतर सुप्रिम कोर्टामध्ये हरलो. तरीही आमचा प्रयत्न सुरू आहे. यातच पुनर्विचार याचिका दाखल कशी करता येईल. त्यासंदर्भात शिंदे समिती पाच राज्यांमध्ये जाऊन आली आहे. त्याचाही रिपोर्ट सादर करायचा आहे. त्यामुळे आमचे बऱ्यापैकी प्रश्न संपलेले आहेत. अशी माहिती आ. गोपीचंद पडळकर यांनी दिली

### धनगर आरक्षणासाठी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ सप्टेंबर-**

धनगर समाजास एसटी च्या आरक्षणासाठी उपोषणास बसलेल्या सहा समाज बांधवांना पाठिंबा देण्यासाठी माढा तालुक्यातील आलेगाव चे सरपंच अमोल देवकते हे आपल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन उपोषण स्थळी आले होते व ते भाषण करीत असतानाच त्यांनी सरकारचा निषेध करीत घोषणाबाजी केली आणि खिशातून रोगर नावाची विशाची बाटली काढून तोंडाला लावली त्यामुळेएकच गोंधळ उडाला. आरक्षण मागणीची धग वाढत आहे. सबंधित आंदोलकास तातडीने उपचारासाठी तातडीने अकलूज येथील खाजगी रूग्णालयात हलविण्यात आले आहे. शुक्रवारी पाचव्या दिवशी आंदोलनकर्त्या महिला विश्रांती भुसनर यांनी नगरपालिकेच्या पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले होते.आंदोलनाच्या सहाव्या दिवशी कार्यकर्त्यांने विष प्रशन करण्याचा प्रयत्न केल्याने येथील वातावरण गंभीर बनले होते. आंदोलनकर्ते आरक्षणावर ठाम आहेत. एकतर येथून आरक्षण घेवून जाणार अन्यथा आमच्या चंद्रभागेत अस्थी जाणार, असा इशारा देत आहेत. चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### वालंचद अभियांत्रिकीच्या प्रा. सुनिता डोळ यांना पीएच. डी. प्रदान

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**



वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील प्रा. सुनिता मिलिंद डोळ यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीकडून पीएच.डी.पदवी प्रदान करण्यात आली आहे.'इंटेलिजंट स्टुडन्ट परफॉर्मन्स प्रेडिक्शन सिस्टिम युजिंग डेटा मायनिंग टेक्निक्स' या विषयावर विद्यापीठात संशोधन प्रबंध सादर केला होता. बुलढाणा येथील पंकज लद्दड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट स्टडीजचे प्राचार्य डॉ. प्रदीप एम. जावंधिया यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. त्यांच्या पीएच.डी. दरम्यान त्यांनी दोन एस.सी.आय. जर्नल्स, एक यु.जी.सी.केअर स्कोपस इंडेक्स जर्नल, दोन स्कोपस इंडेक्स जर्नल, सहा स्कोपस इंडेक्स इंटरनॅशनल कॉन्फरन्स आणि दोन इतर असे १३ विविध संशोधन प्रबंध प्रसिद्ध केल्या आहेत. त्यामध्ये दोन प्रबंधाना 'बेस्ट पेपर अवॉर्ड' मिळाला आहे. त्यांच्या यशाबद्दल वालचंद शिक्षण समुहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त श्री भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य डॉ. विजय आठवले, निवृत्त प्राचार्य डॉ. शशिकांत हलकुडे, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. अनिता पुजार आदींनी अभिनंदन केले.

### खाद्यतेलाच्या आयातीवर शुल्क आकारणीचा निर्णय क्रांतिकारक



**मुंबई, दि.१४ सप्टेंबर-**

कांदा, बासमती तांदळावरील निर्यातमूल्य रद्द, कांद्याच्या निर्यात शुल्कात कपात तसेच खाद्यतेलावरील आयात शुल्क वाढविण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णय क्रांतिकार पाऊल आहे, असा दावा भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केला. कांदा, बासमती तांदूळ, सोयाबीन आणि तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतमालाला जास्त भाव मिळण्याच्या दृष्टीने हे निर्णय निश्चितपणे क्रांतीकारी ठरतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले की, देशांतर्गत कांद्याची उपलब्धता वाढावी आणि ग्राहकांना रास्त दरात कांदा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने गेल्या वर्षी किमान निर्यात मूल्य ५५० डॉलर प्रतिटन ठेवले होते. आता कांद्याची आवक कमी झाल्यानंतर केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यात धोरणात सुधारणा करत कांदा निर्याती वरील ५५० डॉलर निर्यातमूल्य हटवले आहे. तसेच कांद्यावर आता ४० टक्के निर्यात शुल्काऐवजी २० टक्के शुल्क आकारणी करण्यात येणार आहे. खाद्यतेलाच्या आयातीवरही आधी कोणतेच शुल्क नव्हते, त्यावर आता २० टक्के शुल्क आकारण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना अधिक किंमत मिळेल. याशिवाय रिफाइंड सोयाबीन, सूर्यफूल आणि पामतेलावर आयात शुल्क १२.५० टक्क्यांवरून ३२.५० टक्के करण्यात आले आहे. हे निर्णय घेऊन केंद्र सरकारने शेतकरीवर्गाला दिलासा दिला आहे. कांद्याच्या किमतीमध्ये सुधार होणार असून, सोयाबीनच्या किंमती वाढून शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल असेही. पटेल यांनी नमूद केले.

### मुख्यमंत्री योजनादूत अर्ज करण्यास १७ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**मुंबई, दि. १४ सप्टेंबर :**

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून आता १७ सप्टेंबर पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे. महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. स्मार्ट फोन आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.

# विजेच्या धक्क्याने दहिटणेत पती-पत्नीचा मृत्यू

**अक्कलकोट, दि. १४ सप्टेंबर-**

तालुक्यातील दहिटणे येथे शनिवारी सकाळी साडेसातच्या सुमारास घराच्या पाठीमागील विद्युत खांबावरील विद्युत प्रवाहाचा धक्का लागून शेतकरी पती-पत्नीचा मृत्यू झाला.





अंबादास चौडप्पा साळुंखे (वय ५७) व कलावती अंबादास साळुंखे (वय ४९) असे मृत पती-पत्नींची नावे आहेत. याबाबत उत्तर पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे. याबाबत रेणुका श्रीशैल साळुंखे यांनी खबर दिली आहे. मयत अंबादास चौडप्पा साळुंख (वय ५७) व कलावती अंबादास साळुंखे (वय ४९, रा. दहिटणे, ता. अक्कलकोट) यांना विजेचा धक्का लागल्याने ते बेशुध्दावस्थेत पडले. त्यांना खासगी वाहनाने ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे उपचाराकरिता दाखल केले असता डॉक्टरांनी मयत झाल्याचे घोषित केले. अधिक तपास पोहेकॉ मल्लिनाथ कलशेट्टी करीत आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# सोलापूर जिल्हा तलवारबाजी निवड चाचणी स्पर्धा आज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

सब ज्युनियर जिल्हास्तरीय तलवारबाजी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन रविवार १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या मैदानावर केले आहे.

या स्पर्धेसाठी खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २०११ नंतरचा असावा. या स्पर्धेतून निवडलेला संघ २७ ते २९ सप्टेंबर दरम्यान बुलढाणा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभागी होईल. इच्छुक खेळाडूंनी पवन भोसले (९६३७९६३७७७), अक्षय माने (८३२९०७०७६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संघटनेचे जिल्हा सचिव दीपक शिंदे यांनी केले आहे.

# ठाण्यातील आनंदाश्रमात आनंद दिघेंच्या प्रतिमेसमोर नोटांची उधळण!

**व्हायरल व्हिडिओमुळे तीव्र संताप**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.१४ सप्टेंबर-**

ठाण्यात शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या आनंदआश्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाच्या शिवसैनिकांनी नोटांची उधळण करीत नाच केल्याचा किळसवाणा प्रकार उघडकीस आला आहे. गणपती विसर्जनादरम्यान आनंदाश्रमात कार्यकर्त्यांनी ढोल वाजवणाऱ्यांवर नोटा उधळल्या असून त्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. त्यावरून शिवसेना उद्धव ठाकरे गटातील नेत्यांनी जोरदार टीका केली आहे.

दरम्यान, याबाबत संबंधित शिवसैनिकांची पक्षातून हकालपट्टी करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले आहे.

ठाकरे गटाचे ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांना हा व्हिडीओ शुक्रवारी एक्सवर पोस्ट केला आहे. त्यामध्ये म्हटले की, तुम्ही आनंद आश्रमात नोटा उधळल्या. दिघे साहेबांच्या समाजसेवेचे पावित्र्य नष्ट केले. आमचा आनंद हरपला!

### ..तर हंटरने फोडून काढले असते

या प्रकाराबाबत ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी जोरदार टीका केली आहे. ते म्हणाले आनंद दिघे यांच्या कार्यालयात पूर्वी एक हंटर होता, आता तो आहे की नाही माहित नाही पण जर ते असते, तर त्यांनी त्या हंटरने या मिंधे सेनेच्या कार्यकर्त्यांना फोडून काढले असते.

### त्यांची पक्षातून हकालपट्टी करणार

या प्रकाराबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, ही घटना चुकीची असून याबाबत संबंधितावर कारवाई केली जाईल. त्यांची सविस्तर चौकशी करून त्यांना पक्षातून काढण्यात येणार आहे

सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यानंतर मला ठाण्यातून अनेकांचे फोन येत आहेत. मी याआधीही सांगितलं होतं की आनंद आश्रम आता आनंद आश्रम राहिलेलं नाही. कारण ज्या माणसाला आपण पुजतो, ज्याला आपण दैवत मानतो त्यांच्या प्रतिमेच्या समोर हे कार्यकर्ते चपला घालून नाचत आहेत. ज्या पद्धतीने नोटा उडवल्या जात आहेत, ही आपली संस्कृती नाही. अशा पद्धतीचे संस्कार आम्हाला दिघे साहेबांनी दिले नाहीत.

लोकांना हा व्हिडीओ पाहिल्यानंतर अत्यंत दु:ख झाले आहे. ठाणे जिल्ह्याची, ठाणेकरांची ही शोकांतिका आहे. दिघे साहेबांच्या आनंद आश्रमात असा प्रकार घडणे दुर्दैवी आहे. मानधन द्यायचं होते तर वेगळ्या पद्धतीने देता आले असते. अशा पद्धतीने दिघे यांच्या प्रतिमेसमोर नोटा उधळण्याची ही कोणती पद्धत आहे?. मला हे क्लेशदायी वाटते ,अशी अपेक्षा आम्हाला आनंदाश्रमातून नाही, असेही केदार दिघे यांनी सांगितले.

# गुरुवर्य बापूसाहेब झपके गुणवंत शिक्षक पुरस्कार सुनील बनसोडे यांना जाहीर

**सांगोला,दि.१४ सप्टेंबर-**

शिक्षणमहर्षि कै.गुरुवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके ४३ वा.स्मृतीसमारोहानिमित्त देण्यात येणारा कै.गुरूवर्य बापूसाहेब झपके जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार सुनील भिकू बनसोडे मांजरी हायस्कूल,मांजरी ता.साग़ोला यांना जाहीर झाला,अशी माहिती सां. ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी दिली.

हा पुरस्कार आज सकाळी १० वा. कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह सांगता समारंभ प्रमुख पाहुणे प्रसिद्ध वक्ते, प्लास्टिक सर्जन, लातूरचे डॉ.विठ्ठल लहाने यांचे शुभहस्ते व प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या समारंभामध्ये प्रदान करण्यात आहे. रोख रुपये ११000 ,सन्मान चिन्ह ,मानपत्र शाल व श्रीफळ असे स्वरूप आहे.प्रस्ताव मागवुन विशेष निवड समितीच्या सदस्यांद्वारे सदर पुरस्कारार्थीची निवड अतिशय गोपनीय पद्धतीने केली जाते.सदर जिल्हास्तरीय पुरस्काराचे हे पाचवे वर्ष असून शैक्षणिक क्षेत्रात कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रतिष्ठेचा समजला जातो.



# आ. राऊत, जरांगे-पाटलांनी मतभेद मिटवावे

**मराठा क्रांती मोर्चाचा पुढाकार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला ओबीसी मधून सगेसोयरे यासह आरक्षण मिळावे या मागणीसाठी लढा देत आहेत. आता ही आरक्षणाची लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. दरम्यान बार्शीचे भाजप पुरस्कृत आमदार राजेंद्र राऊत यांनी आपल्या पद्धतीने भूमिका घेतली.

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील आणि बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत या दोन्ही मराठ्यातील वैचारीक मतभेद मिटावा यासाठी मराठा क्रांती मोर्चातील ज्येष्ठ समन्वयक दिलीप कोल्हे, दास शेळके, सुनील रसाळे यांनी पुढाकार घेत मनोज जरांगे पाटील आणि आमदार राजेंद्र राऊत यांची भेट घेऊन सत्य परिस्थिती आणि वस्तुस्थिती याची मांडणी केली. दोन्ही मराठा बांधवांची भूमिका एकच आहे गरजवंत मराठ्यांना ओबीसीतून सगे सोयऱ्यांसह आरक्षण मिळावे त्या दृष्टिकोनातून वाटचाल ही सुरू आहे. आज मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी जालना अंतरवली सराटी येथे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील आणि बार्शी येथे आमदार राजेंद्र राऊत यांची भेट घेऊन एकोपा घडवण्यासाठी प्रयत्न केला आणि दोघांनीही यासाठी सकारात्मकता दर्शवली. यावेळी मराठा क्रांती मोर्चा चे समन्वयक दिलीप कोल्हे यांनी समाज बांधवांनी एकमेकांवर टीकात्मक भाष्य करू नये एकोप्याने राहावे आणि आपली आरक्षणाची गरजवंत मराठ्यांची लढाई यशस्वी करावी असे आवाहन केले. यावेळी मराठा क्रांती मोर्चा चे ज्येष्ठ समन्वयक दास शेळके, सुनिल रसाळे, विजय पोखरकर, बाळासाहेब सुरवसे उपस्थित होते.

# आ. राजेंद्र राऊतांच्या ठिय्याला पालकमंत्र्यांची भेट अन् चर्चा

**तिसऱ्या दिवशीही प्रतिसाद; ७६ ग्रामपंचायतींनी दिला पाठिंबा, मागण्या मुखमंत्र्यांपर्यंत पोहोचवण्याचे दिली ग्वाही**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ सप्टेंबर-**

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे व यासाठी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवावे, तसेच कोणतीही अट न घालता राज्यातील सर्वच समाज घटकांतील मुला-मुलींना सर्वच प्रकारचे शिक्षण मोफत द्यावे या मागणीसाठी आ. राजेंद्र राऊत यांनी गुरुवारपासून सुरू केलेल्या ठिय्या आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी ही विविध संस्था, संघटना, व्यापारी, ग्रामपंचायतींचा पाठिंबा मिळत आहे.

शेजारच्या तालुक्यातील मराठा बांधवही पाठिंबा देत आहेत. शहरातील मराठा समाजातील ज्येष्ठ समन्वयकांनीदेखील रात्री आंदोलनस्थळी भेट देऊन चर्चा केली. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही या मागण्याची शासन दखल घेईल. अधिवेशनासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून आपले म्हणणे त्यांना सांगू अशी ग्वाही देत आ. राजाभाऊंनी आंदोलन मागे घ्यावे, असे सांगितले. मात्र राऊत यांनी पालकमंत्र्यांची सूचना अमान्य करत मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा पवित्रा कायम ठेवला. चंद्रकांत पाटील आले तेव्हा देखील समाजाच्या घोषणा सुरूच होत्या. त्यात सूर मिसळत चंद्रकांत पाटील यांनीही घोषणा दिल्या.



राजेंद्र राऊत म्हणाले, माझे बेमुदत आंदोलन आहे. समाजात संभ्रम आहे. आंदोलन मोर्चे सुरु आहेत. दोन वेळेचे आरक्षण टिकले नाही. जरांगेंनी आंदोलन केले. कुणबी नोंदी सापडल्या. दाखले वाटप सुरु झाले. अधिसूचना काढली. गुलाल उधळला. तरीही आंदोलन सुरु आहे. तरीही संभ्रम कायम आहे. शासन व विरोधीपक्ष काही बोलत नाही. कोणी काही म्हटलं की यात आंदोलन सरकारी म्हणून टीका होतेय. मूळ मुद्याला बगल दिली जात आहे. बार्शीतील आमच्या कार्यकर्त्यांच्या पत्रावरही राजकारण केलं जातं आहे. आता माझ्यावर टीका केली तर मी समर्पक उत्तर देईन. सर्व, पक्ष आमदारांची भूमिका महत्वाची आहे. मराठवाडाही आमचा आहे. आमचा रोटी-बेटी व्यवहार. आमच्या सोयरीकी मराठवाड्यात आहे. २८८ आमदार असताना मी एकमेव आहे की, राजकारणात काय होईल, काय नाही हे मला माहित नाही. पण मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, शासनाचा प्रतिनिधी म्हणून आलो असलो तरी राजाभाऊ आमचे जुने सहकारी आहेत. विशेष अधिवेशन बोलावणे हा मुख्यमंत्र्यांचा अधिकार असून त्यांनी सांगितल्यास राज्यपाल त्याला परवानगी देतात. आपली मागणी मी सीएमपर्यत पोहोचवतो. ते निर्णय घेतील.

### मराठा मुख्यमंत्र्यांनी काही केले नाही

१९०२ ला शाहू महाराजांनी आरक्षण दिले. मराठा समाज गरीब आणि शेतीवर अवलंबून आहे ही वस्तुस्थिती आहे. आपल्याकडे दोन आरक्षण आहेत. एक घटनात्मक आणि दुसरे कायद्याने मिळणारे वेगळे आहे. अस्पृश्यतेचे बॅकग्राउंड आहे म्हणून एससी आणि एसटीला मिळणारे त्यातून आलं. उर्वरितमध्ये लोकसंख्येच्या निम्मे इतरांना मिळते. त्यांना पुढे आणण्यासाठी १९६७ पासून ओबीसी आरक्षण सुरु झाले. केंद्राने ४२०० जाती शोधल्या. त्यात राज्यात ३८२ आहेत. कुणबीबाबतची संधिग्धता कोणी दूर केली नाही. आजवर झालेल्या एकाही मराठ्यांच्या मुखमंत्र्यांनी ते केले नाही. हातात सत्ता असताना. ओबीसीमध्ये एक मराठा जात टाकायला अडचण नव्हती. ते माजी मुख्यंमत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याचे पाटील यांनी सांगितले.

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित









पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शासकीय निवासस्थानी एका नव्या पाहुण्याचे आगमन झाले आहे. 'दीपज्योती' असे या पाहुण्याचे नाव असून, ते एक गाईचे वासरू आहे. विशेष म्हणजे, त्याचा जन्म पंतप्रधान मोदी यांच्या निवासस्थानीच झाला आहे. सध्या या दोघांनाही एकमेकांचा प्रचंड लळा लागला आहे

## लासलगावमध्ये उसळले कांद्याचे दर

◆ **नाशिक, १४ सप्टेंबर**

केंद्र सरकारने किमान निर्यातमूल्य हटवल्यावर तसेच निर्यातशुल्कात निम्म्याने कपात केल्यानंतर लासलगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या दरांनी शनिवारी उसळी घेतली, अशी माहिती सूत्रांनी दिली.

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती ही देशातील सर्वांत मोठी घाऊक बाजारपेठ आहे. लासलगाव येथे कांद्याचे दर सरासरी ४३३ रुपये प्रती क्विंटलने वाढले आहेत. निर्यातमूल्य हटवण्याचा निर्णय सकारात्मक आहे. यामुळे बाजार थोडा वाढला आहे. कांद्यावर निर्यातबंदी नसावी, असे आम्हाला वाटते. अशा बाबी लादण्याचा किंवा हटवण्याचा बाजारावर परिणाम होतो. आता निर्यातमूल्य हटवण्यात आले. पण, शेतकऱ्यांचे कांद्याचे उत्पादन संपत आहे, असे लासलगाव कृषी उत्पन्ना बाजार समितीचे सदस्य बाळासाहेब क्षीरसागर यांनी सांगितले. कांद्यावरील निर्यातशुल्क २० टक्के अथवा ४० टक्क्यांनी कमी केले, याबाबत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही, असा दावा त्यांनी केला. (वृत्तसंस्था)

## ईद-ए-मिलादची सार्वजनिक सुट्टी सोमवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

अनंत चतुर्दशी आणि ईद-ए-मिलाद सण एकामागोमाग एक असल्याने दोन्ही समाजांमध्ये शांतता आणि सौहार्द रहावे यासाठी ईद ए मिलादची सार्वजनिक सुट्टी सोमवार, दि.१६ सप्टेंबर रोजी कायम ठेवण्यात आली असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी सांगितले. कुंभार म्हणाल्या की, ईद-ए-मिलाद हा मुस्लिम धर्मियांचा सण मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. अनंत चतुर्दशी हा हिंदूचा सण असल्याने दोन्ही समाजामध्ये शांतता व सामाजिक सलोखा कायम राहण्याच्या हेतूने यावर्षी सोलापूर जिल्ह्यांमध्ये मुस्लिम धर्मियांनी १६ सप्टेंबरला जुलूस काढण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, यामुळे सुट्टी देखील त्या दिवशी द्यावी अशी मागणी मुस्लिम आमदार आणि संघटनांनी केली होती. यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

## घराणेशाहीच्या राजकारणाने उद्ध्वस्त केला जम्मू-काश्मीरचा सुंदर प्रदेश

### डोडातील सभेत नरेंद्र मोदींचा घणाघात

### दहशतवाद मोजतोय् अखेरच्या घटका

◆ **जम्मू, १४ सप्टेंबर**

जम्मू-काश्मीरच्या सुंदर प्रदेशाला उद्ध्वस्त करणाऱ्या घराणेशाहीच्या राजकारणाचा सामना करण्यासाठी आमच्या सरकारने नवीन नेतृत्व समोर आणले आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सांगितले. येथील दहशतवाद अखेरच्या घटका मोजत असल्याचे त्यांनी ठामपणे स्पष्ट केले.

पंतप्रधा मोदी डोडा जिल्ह्यात भाजपा उमेदवाराच्या प्रचारासाठी भव्य सभेला संबोधित करीत होते. जम्मू-काश्मिरात १८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या आधी झालेली मोदी यांची ही पहिलीच सभा आहे. त्यात जम्मूतील डोडा, किश्तवाड आणि रामबाण तसेच दक्षिण काश्मिरातील अनंतनाग, पुलवामा, शोपियाँ आणि कुलगाममधील २४ जागांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात २५ सप्टेंबर रोजी २६ मतदारसंघांत मतदान होणार आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून विदेशी शक्तींनी जम्मू-काश्मीरला लक्ष्य केले असून, यंदाची विधानसभा निवडणूक या प्रदेशाचे भविष्य निश्चित करणार आहे. केवळ विदेशी शक्तीच नव्हे, तर येथील घराणेशाहीच्या राजकारणानेही या सुंदर प्रदेशाला आतून पोकळ केले आहे. ज्या राजकीय पक्षांवर तुम्ही विश्वास ठेवला, त्यांनी तुमच्या मुलांची कधीच काळजी केली नाही. त्यांनी केवळ स्वतःच्या मुलांची काळजी घेतली आणि त्यांना राजकारणात आणले. त्यांनी नवीन नेतृत्वाचा उदय होऊ दिला नाही, असे नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर घणाघात करताना सांगितले. (वृत्तसंस्था)


### तरुण नेत्यांना रुजू दिले नाही

२०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर आम्ही जम्मू-काश्मिरातील नवीन नेतृत्व शोधून काढले. येथील तरुणांना दहशतवादाचा सामना करावा लागला. लोकांची दिशाभूल करून कुटुंबशाहीला प्रोत्साहन देणाऱ्या पक्षांनी केवळ सत्ता उपभोगली आणि त्यांनी तरुण नेत्यांना रुजू दिले नाही, अशी टीका मोदी यांनी केली.

## सत्तेत आल्यास लाडक्या बहिणींना तीन हजार रुपये मिळणार

**मुंबई, १४ सप्टेंबर**

आगामी विधानसभा निवडणुकीत तुम्ही पुन्हा एकदा महायुतीच्या हातात सत्तेची सूत्रे द्या. त्यानंतर मी 'माझी लाडकी बहीण' योजनेतील धनराशी दुपटीने वाढविणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी येथे केली. सरकारतर्फे सध्या या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत महिलांना प्रत्येक महिन्यात दीड हजार रुपये दिले जात आहेत.




धाराशिव जिल्ह्यात आयोजित एका जाहीर कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यातील पात्र महिलांना प्रत्येक महिन्याला दीड हजार रुपये थेट बँक खात्यात जमा केले जातात. तुम्ही आम्हाला बळकटी द्या आणि आम्ही तुम्हाला आर्थिक बळकटी देऊ. तुम्हाला मिळणारी रक्कम तीन हजार रुपये करू आणि त्यानंतरही या रकमेत वाढ करण्यावर विचार केला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

सरकारची तिजोरी रिकामी झाल्यानंतर ही योजना बंद केली जाईल, अशी भीती विरोधकांकडून दाखवली जात आहे. मात्र, ते विसरले आहेत की, सरकारची तिजोरी ही जनतेच्याच पैशाने भरत असते आणि ती जनतेसाठीच असते, असा टोलाही मुख्यमंत्र्यांनी हाणला. आम्ही जेव्हा राज्य परिवहन मंडळाच्या बसेसमध्ये महिलांना ५० टक्के सवलत जाहीर केली होती, त्यावेळी विरोधकांनी अशीच भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. सुदैवाने, या निर्णयामुळे एसटी महामंडळ तोट्यातून नफ्यात आले, याकडे शिंदे यांनी लक्ष वेधले.


महिलांनाही त्यांच्या उत्पन्नातील काही भाग गुंतवणूक करता यावा, यासाठी त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे आवश्यक आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## मोफत आधार अपडेटची मुदत पुन्हा वाढवली

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने आधार कार्ड मोफत अपडेट करण्याची मुदत तीन महिन्यांनी वाढवली आहे. यापूर्वीही ही तीन महिन्यांसाठी वाढवण्यात आली होती. आधार अपडेट करण्याची शेवटची तारीख १४ सप्टेंबर होती. यूआयडीएआयने दिलेल्या माहितीनुसार, १० वर्षांपेक्षा जुने सर्व आधार अपडेट करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मोफत ऑनलाईन दस्तऐवज अपलोड करण्याची सुविधा १४ डिसेंबरपर्यंत पुन्हा वाढवली आहे, असे यूआयडीएआयने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

## खाद्यतेलावरील आयात शुल्कात वाढ; दर वाढणार

**नवी दिल्ली** : यंदाच्या हंगामात तेलबियांच्या दरांत किमान हमीभावापेक्षा जास्त झालेली घसरण पाहता, खरीप हंगामात शेतकऱ्यांना चांगले दर मिळावे, यासाठी केंद्र सरकारने खाद्यतेलावरील आयातशुल्कात शुक्रवारी वाढ केली. यामुळे सर्वसामान्य ग्राहकांना जास्त पैसे मोजावे लागणार आहे. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या किमतींवरील कॅबिनेट समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.






# माणुसकीची, लोकशाही मूल्ये जपण्याची अपेक्षा व्यर्थच!

मान कधीही झुकणार नाही, मस्तिष्क भयमुक्त राहील आणि संपूर्ण समाज हा एकसंध राहील, अशी कल्पना ज्यांनी आपल्या काव्यप्रतिभेतून केली होती, त्या जागतिक ख्यातीचे कवी रवींद्रनाथ टागोर यांना आजची परिस्थिती पाहून किती वेदना होत असतील याची कल्पनाही न केलेली बरी! स्वतःचे स्वार्थी, संकुचित राजकारण यशस्वी करण्यासाठी रवींद्रनाथांची ही आभाळाएवढी उंच कल्पना मातीत घालताना ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला, डाव्या विचारसरणीच्या राजकीय नेत्यांना लाज आणि खंत कशी वाटत नाही, याचेही आता आश्चर्य वाटेनासे झाले आहे. बंगाली जनतेने सलग तीस वर्षे डाव्यांची अत्याचारी राजवट अनुभवली. तिला कंटाळून जनतेने ममता बॅनर्जी यांच्यावर विश्वास टाकला. पण, ममतांनीही भ्रमनिरास केला आहे. रवींद्रनाथांची नीतिमूल्ये, त्यांचे विचार पायदळी तुडविण्यात धन्यता मानणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी विरोधी विचारधारेच्या लोकांवर अनन्वित अत्याचार केले आहेत. त्यांनी बंगालमध्ये राहूच नये, असे वातावरण तयार केले आहे. विशेषतः लोकसभेच्या निवडणुका झाल्यापासून भाजपाच्या कार्यकर्त्यांवर आणि संघाच्या स्वयंसेवकांवर, हिंदूंवर जे अत्याचार सुरू आहेत, ते मानवतेला काळिमा फासणारे आहेत.

बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी स्वतःची सत्ता टिकवून ठेवण्यासाठी बांगलादेशी घुसखोरांना हाताशी धरले, हे फारच दुर्दैवी होय. बंगालमध्ये मुस्लिमांची संख्या ३२ टक्के आहे. ही अधिकृत आकडेवारी आहे. हिंदू नावे धारण करून अनधिकृतपणे राहणारे बांगलादेशी घुसखोर मुस्लिम किती आहेत, त्याची तर कल्पनाही न केलेली बरी. लोकसभेची निवडणूक जिंकता यावी, पश्चिम बंगालच्या विधानसभेतही भाजपाला बहुमत मिळावे, यादृष्टीने भाजपाने प्रभावी उपाययोजना आखली होती. पण, धार्मिक कट्टरवादाने भाजपाचे स्वप्न उधळून लावले. कधीकाळी बंगालवर अनभिषिक्त सत्ता गाजवणाऱ्या कम्युनिस्टांनी त्यांची मते ममता बॅनर्जी यांच्या तृणमूलकडे वळवली. जे कम्युनिस्टांनी केले, तेच काँग्रेसनेही केले. बंगालमध्ये एकदा का भारतीय जनता पार्टीची सत्ता आली तर भाजपाला सत्तेबाहेर करणे अवघड होऊन बसेल, असा विचार करून या दोन्ही पक्षांनी स्वतःचे अस्तित्व गहाण ठेवत ममतांना पुन्हा सत्तेत आणले, हे वास्तव आहे.

केंद्रात २०१४ सालापासून भाजपाचे सरकार आहे. मध्यप्रदेश (मधला अपवाद वगळता), गुजरात या राज्यांमध्ये कित्येक वर्षे झाली काँग्रेसला सत्तेत प्रवेश मिळालेला नाही. तिथे दीर्घकाळापासून भाजपाची सत्ता आहे. कारण, जनतेच्या हिताचे निर्णय करणाऱ्या भाजपाला लोकांची पसंती असते. म्हणूनच बंगालमध्ये एकदा का भाजपाची सत्ता आली तर तिथे लोकोपयोगी कामे होतील, बंगालचा औद्योगिक विकास झपाट्याने होईल, तिथल्या लोकांचे दारिद्र्य दूर होईल आणि संपन्नता येईल. असे झाले तर लोक पुन्हा पुन्हा भाजपालाच निवडून देतील, या भीतीने ग्रासलेल्या काँग्रेस आणि कम्युनिस्टांनी त्यांची मते ममता बॅनर्जी यांच्याकडे वळवल्याचे एव्हाना स्पष्ट झाले आहे. आपण आलो नाही तरी चालेल, पण भाजपा येता कामा नये, ही या पक्षांची धारणाच मुळात लोकशाहीला मारक आहे. वास्तविक, विधानसभा आणि लोकसभा निवडणूक प्रचंड मताधिक्क्याने जिंकण्याची व्यूहरचना भाजपाने अतिशय प्रभावी रीतीने केली होती. पण, विरोधकांच्या लांगुलचालनाच्या राजकारणाने भाजपाची व्यूहरचना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. भाजपाला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी काँग्रेस आणि कम्युनिस्टांनी स्वतःचे अस्तित्व पणाला लावले, ही बाबही लोकशाहीची थट्टा आहे.

राजकारणात असणाऱ्या राजकीय पक्षांनी प्रामाणिकपणे निवडणुका लढणे अपेक्षित असते. पण, देशात सध्या राजकारणाचा जो कल दिसतो आहे, तो भाजपाला एकटे पाडण्याचा आहे. सगळे मिळून भाजपाला पाण्यात पाहात आहेत. मोदींसारखा मजबूत नेता भाजपाकडे आहे, सातत्याने भाजपाला यश मिळत आहे, ही बाब विरोधकांना चिंता करायला लावणारी आहे. असो. ममतांच्या बंगालमध्ये सध्या जी प्रचंड दहशत आहे, विशेषतः भाजपा आणि संघाचे समर्थन करणाऱ्या हिंदूंमध्ये असुरक्षिततेची भावना आहे, ती काळजी वाढवणारी आहे. कारण, राज्याच्या प्रमुख असलेल्या ममता बॅनर्जी यांना आपल्या राज्यातील हिंदूंपेक्षा बांगलादेशी घुसखोरांची काळजी आहे. त्यांच्या कृतीवरून ते दिसूनही आले आहे. खबरदार, बांगलादेशी घुसखोरांना कुणी हात लावलात तर, असा इशाराही ममता बॅनर्जी यांनी गतकाळात दिला होता. ममता बॅनर्जी या हुकूमशाही वृत्तीच्या नेत्या आहेत. त्यांच्या विरोधात बोलणाऱ्याला त्या सोडत नाहीत. बंगालमध्ये भाजपाच्या कित्येक नेत्यांवर आणि कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ले झालेत, त्यात अनेकांचा मृत्यूही झाला. हल्ले करणारे बांगलादेशी घुसखोर आणि तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्तेच आहेत, हे लपून राहिलेले नाही. आजही बंगालमधील तृणमूलविरोधक हिंदू समाजमन भयकंपित आहे. कारण, मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहेत.

एवढ्या मोठ्या प्रमाणात अत्याचार होत असताना, निष्पाप लोकांच्या हत्या होत असताना स्वयंघोषित पुरोगामी निषेधाचा एक शब्दही काढायला तयार नाहीत. पत्रकारितेतही काही स्वयंघोषित पुरोगामी आहेत. ते स्वतःच्या सोयीनुसार लेखणी चालवत असतात. भाजपाशासित राज्यांमध्ये कुठे खुट्ट जरी वाजले तरी यांचे कान टवकारलेले असतात आणि लिहिण्यासाठी लेखणी सिद्ध झालेली असते. पण, भाजपेतर राज्यात कितीही हत्या झाल्यात, कितीही लोकांच्या घरांना आगी लावल्या गेल्यात तरी ही मंडळी मिठाची गुळणी करून गप्प बसली असतात. यांच्या लेखणीची आणि वाणीची धार बोथट झालेली असते. ममता बॅनर्जी दिल्लीचा दौरा करतात, पत्रकार परिषद घेतात तेव्हा बंगालमधील हिंसाचाराविषयी एकही पत्रकार त्यांना साधा प्रश्नदेखील विचारत नाही, यावरून पुरोगामी पत्रकार किती प्रतिगामी आहेत, हे सहज लक्षात येते. पुरोगामी लोक कधीही एकाची बाजू घेत नाहीत. ते अन्यायाविरुद्ध आवाज उठवत असतात. ते कधीच कुणाचा द्वेष करीत नाहीत. मात्र, डाव्यांनी ज्यांना उजवे ठरवले आहे, त्या जमातीच्या एखाद्या पत्रकाराने प्रश्न विचारण्याचे धाडस जरी दाखवले, तर त्याला एकाकी पाडण्यासाठी स्वयंघोषित पुरोगामी पत्रकारांची फौज एकवटली असते, हे निश्चित!

याउलट, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ जेव्हा जेव्हा पत्रकार परिषदा घेतात, तेव्हा जाणीवपूर्वक त्यांना उत्तरप्रदेशातील कथित घटनांबाबत प्रश्न विचारून सतावून सोडले जाते, जाणूनबुजून हिंदू-मुस्लिम शब्द वापरात आणले जातात आणि त्यांच्या तोंडून अनवधानाने एखादा वेगळा शब्द निघाला तर त्याचे भांडवल करून भाजपाला आणि कारण नसताना संघ परिवाराला वादात अडकवण्याचे कारस्थान केले जाते. हा अनुभव आहे. बंगालमध्ये हजारो निष्पाप लोकांची हत्या झाली, असंख्य लोकांना पलायन करावे लागले, अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार करण्यात आले, गेल्या चारपाच महिन्यांत असंख्य लोकांना धमकावण्यात आले. जगविख्यात कवी रवींद्रनाथ टागोरांच्या राज्यात या घटना घडल्या आहेत. कुणी घडवून आणल्या, हे संपूर्ण देशाला माहिती आहे. सत्तेसाठी काहीही करायला तयार असलेल्या ममता बॅनर्जी यांनी आणि त्यांच्या तृणमूल काँग्रेसने लोकशाही मूल्ये पायदळी तुडविली आहेत. व्वा ममता बॅनर्जी! आता तुम्हाला दीदी म्हणण्याचीही लाज आम्हाला वाटायला लागली आहे. तुम्हाला दीदी म्हणावे असे कोणतेही चांगले वर्तन तुमच्याकडून घडताना दिसत नसल्याने तुमची दीदी ही उपाधी आम्ही काढून घेत आहोत, असे ठासून सांगण्याची वेळ आली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालांनंतर आणि आताही तृणमूलच्या गुंडांनी केलेला अत्याचार ममतांना दिसला नाही. हा अत्याचार म्हणजे भाजपाचे नाटक असल्याचा कांगावा करताना ममतांना थोडी लाजही कशी वाटली नाही. एक महिला एवढी क्रूर कशी असू शकते? बंगालमध्ये मिळालेल्या पाशवी विजयानंतर तृणमूलच्या गुंडांनी प्रचंड मनमानी करीत हिंसाचार केला, भाजपाच्या कार्यकर्त्यांना, त्यांच्या कुटुंबीयांना लक्ष्य केले, त्याबाबत कुणी काही बोलायचेही नाही? ममता, काँग्रेस, डावे यांना सामान्य माणसाशी काहीही देणेघेणे नाही. त्यांना त्यांची राजकीय पोळी शेकायची आहे, आपला उल्लू सीधा करून घ्यायचा आहे. म्हणूनच मोदीविरोधाने आंधळे झालेल्या कुणाकडूनही माणुसकीची, लोकशाही मूल्ये जपण्याची कसलीही अपेक्षा करणे व्यर्थच!

**कटाक्ष**

**गजानन निमदेव**

# पाकिस्तान-चीनची अभद्र युती तोडलीच पाहिजे!

आपल्या शेजारचे दोन मोठे देश पाकिस्तान आणि चीन भारताविरुद्ध मोठे कारस्थान करीत आहेत. या दोन देशांमध्ये झालेली युती ही अभद्र आहे. सर्व दिशांनी भारताला घेरण्यासाठी या दोन्ही देशांचे प्रयत्न सुरू आहेत. आशियात भारताचे वर्चस्व स्थापित होऊ नये यासाठी हे दोन देश परस्परांना सहकार्य करीत आहेत. पाकिस्तानने काश्मीरचा भाग बळकावला आहे, तर चीनने अरुणाचल प्रदेशचा. या दोन्ही देशांचे कारस्थान मोडून काढण्यासाठी भारताला आता झपाट्याने पावलं उचलावी लागणार आहेत. स्वतःची राष्ट्रीय सुरक्षा आणि ऊर्जेसंबंधीची स्थिती मजबूत केल्याशिवाय भारत विश्वशक्तीही बनू शकणार नाही आणि दक्षिण आशियात शांतता प्रस्थापित करण्यातही यशस्वी होऊ शकणार नाही.

भारताच्या सुरक्षेला चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांपासून धोका आहे. या दोन्ही देशांनी केवळ भारताचा भूभागच बळकावला आहे, असे नव्हे, तर बळकावलेल्या भागांचे आदानप्रदानही त्यांनी सुरू केले आहे. शिवाय, भारत सुरक्षेच्या दृष्टीने आज ज्या आव्हानांचा मुकाबला करीत आहे, ते लक्षात घेता चीन आणि पाकिस्तान यांच्यातील अभद्र युतीकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही. चीनमध्ये आज हुकूमशाही असल्यासारखीच आहे. तिथे लोकशाही नाही. त्यामुळे चीनमध्ये जोपर्यंत लोकशाही मूल्यांची स्थापना होत नाही आणि मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवणाऱ्या हुकूमशाहीला मुळासकट उखडून फेकले जात नाही, तोपर्यंत दक्षिण आशियात शांतता नांदू शकणार नाही.

पाकिस्तानने अण्वस्त्र प्रसार चालविला आहे आणि चीन साम्राज्यवादी वृत्तीचा असल्याने समस्या अधिकच गंभीर बनत चालली आहे. पाकिस्तानी सैन्याची वर्तणूक लक्षात घेतली तर अतिरेक्यांचा एक मोठा गट असेच त्या सैन्याचे वर्णन करावे लागेल. आपली अमर्याद सत्ता कायम राखण्यासाठी पाकिस्तानी सैन्य कोणत्याही थराला जायला तयार असते. पाकिस्तानी सैन्याने अफगाणिस्तानात जे अत्याचार केलेत ते जगजाहीर आहेत. शिवाय, ७० च्या दशकात पाकिस्तानी सैन्याने बंगाल्यांवर जे अनन्वित अत्याचार केलेत ते क्रूर या प्रकारात मोडणारेच होते. सध्या कथित चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरच्या नावाखाली बलुचिस्तानमधील लोकांवरही पाकिस्तानकडून अत्याचार केले जात आहेत. बलुचिस्तानमधील सोने, तेल आणि गॅसवर डल्ला मारण्यासाठी पाकिस्तानकडून ग्वादर प्रांतात बंदर उभारले जात आहे आणि तिथल्या भूभागावर रस्ते तयार केले जात आहेत, रेल्वेमार्ग तयार केला जात आहे, तसेच पाईपलाईन टाकल्या जात आहेत. या कथित ग्वादर मेगा प्रोजेक्टच्या नावावर बलुचिस्तानमध्ये दोन देशांमधील १० कोटी लोकांना वसविण्याचा पाकिस्तान-चीनचा कट आहे. पाकिस्तानने कब्जा केलेल्या बलुचिस्तानात मूळ बलुची लोकांची संख्या फक्त दोन कोटी आहे. त्यांचाच प्रांत असलेल्या बलुचिस्तानातून मूळ बलुची लोकांना हुसकावून लावण्याची पाकिस्तानी सैन्याची योजना आहे. अतिशय सुनियोजित पद्धतीने पाकिस्तानी सैन्य बलुचींना हुसकावून लावत आहे. असेच सुरू राहिले तर आपल्या काश्मीरमधून जसे सगळे पंडित विस्थापित झाले, तसेच सगळे बलुची लोक बलुचिस्तानातून लवकरच विस्थापित होतील, अशी भीती आहे. चीनची मर्जी सांभाळण्यासाठी पाकिस्तान चीनला बंदर तयार करून देत आहे आणि बळकावलेला बलुचिस्तान प्रांतही देण्याची योजना आहे. आपले हे कृत्य बिनबोभाट करता यावे यासाठी पाकिस्तानी सैन्याकडून जी कारवाई केली जात आहे, त्यात आतापर्यंत लाखो बलुची लोकांवर अत्याचार झाले आहेत. काहींची हत्या झाली, काही महिलांवर बलात्कार झाले, काहींचे अपहरण झाले. पाकिस्तानी सैन्याकडून होत असलेल्या अनन्वित अत्याचाराला बलुची लोक बळी पडले आहेत. तसे तर बलुची लोक १९४७ पासूनच पाकिस्तानी सैन्याच्या अत्याचाराचा मुकाबला करीत आहेत. लाखो बलुची लोक त्यात मारले गेले आहेत. आता जे दीडदोन कोटी उरले आहेत, त्यांना लवकरच संपविण्याचा कट पाकी सैन्य अमलात आणत आहे. अशी परिस्थिती असतानाही बलुचिस्तानमधील जनता 'आझादी'साठी कोणत्याही आंतरराष्ट्रीय मदतीशिवाय पाकिस्तानी सैन्याशी लढत आहे. पण, पाकिस्तानच्या ताकदीपुढे बलुची लोकांची ताकद कमी पडत आहे.

दक्षिण आशियातील बहुतांश देशांवर जेव्हा इंग्रजांची राजवट होती, तेव्हाही बलुचिस्तान हा एक स्वतंत्र देश होता. बलुचिस्तानला एक निर्धारित अशी सीमा होती, घटना होती, संसदही होती आणि तिथे कायद्याचे राज्य होते. पण, भारताची फाळणी झाल्यानंतरच्या काळात पाकिस्तानने बलुचिस्तानवर हल्ला केला आणि तो प्रदेश बळकावला. पाकने हल्ला करण्याआधी बलुचिस्तानने पंडित नेहरूंना हस्तक्षेप करण्याची विनंती केली होती. पण, नेहरूंनी ती फेटाळून लावल्याने पाकिस्तानचा हल्ला यशस्वी झाला आणि बलुचिस्तानवर पाकिस्तानला कब्जा करता आला. आता पाकिस्तान स्वतःच्या स्वार्थासाठी आणि भारताला घाबरवण्यासाठी हाच बलुची प्रांत चीनला आंदणात द्यायला निघाला आहे. चीनला खुश करून आपल्या बाजूने वळवायचे आणि भारताला डिवचायचे हाच एकमेव उद्योग पाकिस्तानने चालविला आहे. त्यावेळी नेहरूंच्या नेतृत्वातील भारताने हस्तक्षेप केला असता अन् ठोस पावलं उचलली असती तर कदाचित बलुचिस्तान आजही स्वतंत्र देश राहिला असता. पण, नेहरूंनी धाडस दाखविले नाही. आज बलुचिस्तान हा स्वतंत्र देश असता तर त्याचा भारताला भरपूर फायदा झाला असता. बलुचिस्तानशिवाय पाकिस्तान जगूच शकत नाही. बलुचिस्तान जर पाकिस्तानच्या ताब्यात नसते तर पाकिस्तानची आर्थिक स्थिती आणखी बिकट झाली असती. अजूनही बलुचिस्तानला स्वतंत्र केले तर पाकिस्तान एक भिकारी देश बनेल यात शंका नाही.

आपल्याकडे नैसर्गिक साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणात आहे असा दावा पाकिस्तान केवळ बलुचिस्तानच्या भरवशावरच करत आहे. त्यामुळे बलुचिस्तानला पाकिस्तानच्या तावडीतून मुक्त करणे हा प्राधान्यक्रम असला पाहिजे. १९४० साली मुस्लिम लीगने जेव्हा स्वतंत्र पाकिस्तानची कल्पना मांडली होती, तेव्हा असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की पाकिस्तान आर्थिकदृष्ट्या कमजोर राहील. पण, त्यावर मुस्लिम लीगच्या नेत्यांनी अतिशय निर्लज्ज युक्तिवाद केला होता. स्वतंत्र पाकिस्तान बलुचिस्तानवर आक्रमण करून ताबा मिळवेल अन् स्वतःला साधनसंपन्न करेल. तो युक्तिवाद पाकिस्तानने खराही करून दाखविला. यावरून हेच स्पष्ट होते की निर्मितीच्या आधीपासूनच पाकिस्तानचा बलुचिस्तानवर डोळा होता. बलुचिस्तानातील लोक आजही 'आझादी'ची लढाई लढत आहेत आणि त्यांना भारताकडून अपेक्षा आहेत. पण, आंतरराष्ट्रीय समुदायाच्या दडपणामुळे भारत बलुचला मदत करू शकेल का, हा प्रश्नच आहे. बलुचिस्तान हे एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र होते आणि आता स्वतंत्र झाल्यावरही ते तसेच राहील यात शंका नाही. बलुचिस्तानला स्वतंत्र करण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला तर भारतालाही मदत करणे शक्य होऊ शकते. दहशतवादाविरुद्धची लढाई यशस्वी करण्याची अमेरिकेची प्रामाणिक इच्छा असेल तर अमेरिकेने बलुचिस्तानवर झालेला अन्याय दूर करण्यासाठी पाकिस्तानवर दबाव आणला पाहिजे. अन्यथा, अमेरिका दहशतवादाच्या बाबतीत दुटप्पीच भूमिका घेते आहे, हेच अधोरेखित होईल. जेवढे म्हणून प्रगत पाश्चिमात्य देश आहेत, ते ढोंगी आहेत. मानवाधिकाराच्या बाता तर ते मारतात. पण, प्रत्यक्षात त्यांना सोयीचे नसेल तिथे ते काहीच बोलत नाहीत. मानवाधिकाराच्या नावाखाली भारतासारख्या देशांची गळचेपी करण्यात हे देश वस्ताद आहेत. युरोप आणि अमेरिकादी देश भारताला शहाणपणा शिकवतात. मात्र, स्वतःवर वेळ आली तर मानवाधिकाराचे सर्रास उल्लंघन करतात. अमेरिकेने ट्विन टॉवरवरील हल्ल्याचा बदला घेताना इराक आणि अफगाणिस्तानवर जे हल्ले केलेत, त्यात हजारो निष्पाप नागरिकही मारले गेले होते, याचा अमेरिकेलाही विसरच पडलेला दिसतो. त्यामुळेच भारताने आंतरराष्ट्रीय दबावाचा विचार न करता आपल्याला योग्य वाटेल तो निर्णय घेतला पाहिजे. चीन आणि पाकिस्तानची अभद्र युती कशी तोडता येईल, यावर चिंतन करून त्यादिशेने यशस्वी प्रयत्न करायला हवेत.

## रविवारची पत्रे

### मुख्यमंत्रिपदाची अवाजवी लालसा

पाच वर्षांपूर्वी साधे भोळे, राजकारणाची फारशी जाण नसलेले उद्धव ठाकरे शिवसेना भाजपाच्या भांडणात सहज गळाला लागतील, हे पाहून सत्ता हातात घेण्याची संधी सोडायची नाही असे शरद पवारांनी ठरवले व स्वार्थी, मतलबी शरद पवारांनी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाची लालूच दाखवून मुसलमानांची मांडलिक असलेल्या काँग्रेसशी शिवसेनेला हात मिळवणी करण्यासाठी भाग पाडले. मुख्यमंत्रिपद तर मिळाले पण त्यामुळे नक्कीच जाज्वल्य हिंदुत्वाचा नेहमी सतत विचार करणाऱ्या बाळासाहेब ठाकरे यांना स्वर्गातसुद्धा किती क्लेश झाले असतील, किती यातना झाल्या असतील याचा विचार बाळासाहेबांच्या सपूताच्या सतत मनात झोपेत अजूनही घोळत नसेल, हे खरे वाटत नाही. मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपोटी आपल्या वडिलांचे विचार धुडकावून टाकल्याची सततची टोचणी त्यांना अजूनही खात असल्यास नवल नाही. ती जन्मभर त्यांची पाठराखण करणार, हे नक्की. कारण संपूर्ण महाराष्ट्रभर बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वासाठी जो नावलौकिक होता, जो दरारा होता, जो धाक होता, जी जरब होती ती उद्धव ठाकरे यांनी भूईसपाट केली, नेस्तनाबूत केली, उद्ध्वस्त केली. मात्र, याबाबत शरद पवार, राहुल गांधी छद्मीपणे अनेक वेळा मनातल्या मनात हसले असल्यास नवल नाही.

फक्त आपल्या स्वार्थासाठी म्हणजे भाजपाला धडा शिकवण्यासाठी भाजपाचे २०१९ मध्ये १०५ आमदार येऊनही त्यांना न्यायाने मिळणारे मुख्यमंत्रिपद न देता दोन हिंदुत्ववादी पक्षांमध्ये वैर निर्माण करणाऱ्या शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि काँग्रेसला जाऊन मिळणे म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्व विचारांना तिलांजली देण्यासारखेच होते. शरद पवारांनी त्यावेळी साध्या भोळ्या उद्धव ठाकरे यांना गळाला मुख्यमंत्रिपदाचे पॉपलेट लावून अलगद गळात अडकवले व आपला सत्ता हस्तगत करण्याचा डाव साधला. शरद पवारांच्या भूमिकेला संजय राऊतांनी त्यांच्याकडे डोळे मिचकावून उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाच्या हरभऱ्याच्या झाडावर चढवले व असंगाशी संग करायला लावले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमीत हिंदुत्वावर निष्ठा आणि हिंदुत्वाबद्दल स्वाभिमान असणाऱ्या खऱ्या ४० शिवसैनिकांची घुसमट, गळचेपी झाल्यामुळे त्यांनी आपला पूर्वीचा सहकारी भाजपाशी सलोखा करून जो अन्याय शरद पवारांनी केला होता आणि स्वार्थी डाव खेळला होता, जी चलाखी शरद पवारांनी केली होती त्याला काटशह देऊन ती अडीच वर्षे उशिराने का होईना पण बाळासाहेब ठाकरे यांना शांती मिळावी यासाठी सच्च्या ४० शिलेदारांनी उद्धव ठाकरे यांनी केलेली चूक यशस्वीपणे दुरुस्त केली व शरद पवारांचा कपटी डाव उधळून लावला. यालाच म्हणतात बाळासाहेबांचे सच्चे हिंदुत्ववादी शिवसैनिक! हे सर्व आठवायचे कारण म्हणजे नाहीतरी सुरुवातीला किंगमेकरची भूमिकाच उद्धव ठाकरे यांना बाळासाहेबांसारखीच बजवायची होती. आदित्य ठाकरे यांनाच मुख्यमंत्री करायचे होते पण मुख्यमंत्री म्हणून आदित्य ठाकरे यांच्यासमोर जाणे शरद पवार व इतरांना मानहानिकारक झाले असते. म्हणून उद्धव ठाकरे यांनाच मुख्यमंत्रिपदासाठी शरद पवारांनी भरीस पाडले. त्यानंतर अडीच वर्षे खरी सत्ता राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस यांनीच उपभोगली. गुळाचा गणपती म्हणून उद्धव ठाकरे मातोश्रीवर मुख्यमंत्री होते. या सर्व गोष्टींचा ऊहापोह यासाठी करायचा की त्यावेळी शिवसेनेने सत्तेसाठी शरद पवारांचा हात धरला आणि शिवसेनेची वाताहात करून घेतली. त्यात सत्तेसाठी संजय राऊत बरोबर येत असतील तर नाहीतर त्यांना डावलून स्वतःच्या बुद्धीने अजूनही उद्धवजींनी भाजपाचा हात धरावा व शिवसेनेची धूळधाण करणाऱ्या बाळासाहेब यांच्या शिवसेनेला नेस्तनाबूत करणाऱ्या शरद पवारांचा हात आणि साथ सोडून चुकीचे परिमार्जन करावे व अशक्य ते शक्य करून दाखवून पाच वर्षांपूर्वीची परिस्थिती निर्माण करावी व बाळासाहेबांसारखी शिवसेनेची सर्वेसर्वा म्हणून उद्धव ठाकरे यांनी भूमिका बजवावी व मातोश्रीवर बसून सर्वदूर शिवसेनेवर लक्ष ठेवावे व मातोश्रीला शिवसेनेचे पूर्वीचे वैभव प्राप्त करून द्यावे ज्याची शरद पवारांमुळे वाट लागली. एवढी हिंमत उद्धव ठाकरे दाखवतील का? नव्हे झालेल्या चुकीबद्दल जी अजूनही भोवते आहे. बाळासाहेबांच्या पैतृक ऋणातून मुक्त व्हायचा हाच खरा मार्ग आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे उद्धव ठाकरे यांना त्यांनी योग्य वाटचाल करावी यासाठी बुद्धी देतील का? की उद्धव ठाकरे यांच्या नशिबी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे पाईक म्हणून आता नेहमी करता राहणेच नशिबी आहे, हे काळच ठरवेल! मला वाटतं उद्धव ठाकरे यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे उदाहरण लक्षात घ्यावे.

**प्रा. अनिल पळणीटकर**/९३७३२१३६१०

●● ●●

### लाडकी बहीण...

महाराष्ट्रात सध्या लाडकी बहीण, लाडका भाऊ, किसान सन्मान निधी, आयुष्मान भारत, महात्मा फुले इत्यादी शासकीय योजनांचा सुळसुळाट सुरू आहे. राज्य व केंद्र शासनाचे या योजना राबवण्याचे धोरण अतिशय वाखाणण्याजोगे आहे. या योजना राबवताना शासनाने निश्चितच सकारात्मक विचार केला असेल. 'लाडकी बहीण'ला माता-भगिनींचा प्रचंड प्रतिसाद आहे. तोही इतका प्रचंड की घरकाम करणाऱ्या बायका ८-८ दिवस सुटी घेऊन कागदपत्रे व इतर प्रक्रियेसाठी धावपळ करीत होत्या.

परवा एक शेतकरी भेटला. मी म्हटलं, काय म्हणते पीक पाणी, तर म्हणे काही नाही भाऊ सोयाबीन फेकलं आहे. आलं तितकं आलं आपण टेन्शन घेत नाही. ६ एकर जमीन आहे. २-२ एकर माझ्या आईच्या आणि बायकोच्या नावाने आहे. ६-६ हजार प्रत्येकी वर्षाचे मिळतात. आता लाडकी बहीणमध्ये बायको आणि आई दोघीही आहेत. रेशनकार्ड वेगवेगळे करून टाकले आहेत. म्हणजे १८-१८ हजार वर्षाचे मिळणार हे नक्की. बाकी अतिवृष्टी आणि इतर समस्यांसाठी आम्ही पीकविम्याचे १०-१५ हजार वेगळे जमवतो. म्हणजे किसान सन्मान, लाडकी बहीण आणि पीक विमा मिळून आम्हाला ७० एक हजार मिळतील. म्हणजे ५-६ हजार रुपये महिना. बाकी पीक जे येईल ते बोनस. शिवाय धान्य फुकटचे शासन देतच आहे आणि कर्जमाफी आणि मेडिकल फॅसिलिटी तर आहेच, आपलं मस्त चाललंय्.

अशा योजनांना चालना देऊन शासन आपल्याच पायावर धोंडा पाडून घेत आहे. बेरोजगारीच्या नावाने बोंबा मारणारे लोक शासनाच्या अशा योजनांचा पुरेपूर लाभ घेत आहेत. या सर्व योजनांचा कहर म्हणजे लाडकी बहीण योजना. फुकटचे



१८,००० मिळवण्यासाठी सर्व महिलांमध्ये चढाओढ आहे. सत्ताधारी पक्ष कार्यकर्ते तनमनधनाने, तत्परतेने या महिलांना सहकार्य करत आहेत. इतकंच काय, मी काही उच्चभ्रू सुशिक्षित महिलांनासुद्धा रांगेत बघितले आहे. मुळात असे फुकटचे पैसे देऊन जनतेला निष्क्रिय करणे हे कितपत योग्य आहे?

मी विद्यार्थी चळवळीतला आणि शिक्षण क्षेत्रात काम करणारा कार्यकर्ता आहे. सध्या शिक्षण क्षेत्रात सर्व शाळा-महाविद्यालयांमध्ये वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांचा प्रचंड तुटवडा आहे. शासनाला पैसेच वाटायचे आहेत तर अशा महिलांना दिवसाला फक्त १-१ तास शिफ्ट वाटून स्थानिक शाळा-महाविद्यालयांत कामे दिली आणि हे पेमेंट त्या-त्या खात्याकडून वळते केले तर लाखो विद्यार्थी आणि शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांवर अनंत उपकार होतील आणि फुकटचे पैसे घेऊन महिलांना आपला सन्मान गमावण्याची वेळ येणार नाही. माझ्या या लिखाणामुळे विद्यमान शासक, पक्ष कार्यकर्ते, विशेषतः महिला निश्चितच नाराज होतील. परंतु असे पैसे वाटण्यापेक्षा रोजगार निर्मितीसाठी काही प्रयत्न व्हावेत, ही इच्छा. जेणेकरून भविष्यात निष्क्रिय पिढी निर्माण होणार नाही. गेल्या लोकसभेच्या निकालावरून सत्ताधाऱ्यांना हे लक्षात यायला हवे की, मतदारांना कितीही योजना, पैसे वाटा त्यांना जे करायचे तेच करतात. कारण, लोकसभा निवडणुकीपूर्वी शासनाने पेट्या, भांडीकुंडी, शिलाई मशीन, बचतगटांना पैसे इत्यादी भरपूर वाटले. पण फलित काय, आज पण शासकांना असे वाटत असेल की पैसे वाटल्याने मतदान मिळेल तर ते चूक आहे, सत्ताधारी पक्षांना तीव्र आत्मचिंतनाची गरज आहे.

**उत्पल टोंगो**/७५०७६२२५८४

●● ●●

### आकाशवाणीने पुन्हा जुन्या रूपात यावे!

आज व्हॉट्सअॅपवरील एका कट्ट्यावर आकाशवाणीच्या संगीतातील विविध प्रकारांतील कलावंतांसाठी ऑडिशनची सूचना वाचली. ही सूचना नागपूर विभागातील कलावंतांसाठी होती. सूचना वाचून आनंद झाला. कदाचित सोशल मीडियावर अशा प्रकारची सूचना मी पहिल्यांदाच बघितली असावी. आकाशवाणीवर त्यांच्या ऑडिशनची माहिती पूर्वी नेहमी यायची, मात्र या सूचनेमुळे नागपूर आकाशवाणीमध्ये स्थानिक कलावंतांसाठी काही कार्यक्रम होतात, हे वाचून आनंद झाला आणि मग आकाशवाणीवरील दिवस आठवले. एक काळ होता आकाशवाणी हा दैनंदिन जीवनाचा एक भाग होता, सकाळी संगीताच्या तालावर, बातम्यांच्या माहितीवर दिवस जात होता अनेक महिला तर स्वयंपाक घरात रेडिओवर कायम गाणी ऐकत, आकाशवाणी नागपूरवर सर्वच भागांमध्ये स्थानिक कलावंतांची मांदियाळी असायची मात्र हळूहळू आकाशवाणीवरील कार्यक्रमांमध्ये स्थानिक कलावंतांचा सहभाग जवळपास कमी झाला. याला जबाबदार कोण? सरकारची पॉलिसी नभोवाणी विभागाची कार्यशैली की नागपूर आकाशवाणीच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांचा निरुत्साहीपणा, निष्काळीपणा? एक काळ होता ज्यावेळी नियमितपणे रविवारी, गुरुवारी नभोनाट्य सादर होत. महिलांच्या अनेक कार्यक्रमांमध्ये भगिनींचा सहभाग असायचा. विविध क्षेत्रातील कार्यरत महिलांना त्यात आवर्जून आमंत्रण असायचं. तरुणांसाठी युववाणी आणि बालांसाठी बालविहार हे सर्व कार्यक्रम आता इतिहास जमा झाले आहेत, याकरता आकाशवाणीच्या कार्यकर्त्यांनी किंवा स्थानिक अधिकाऱ्यांनी काय प्रयत्न केले, हा एक प्रश्न आहे. काही वर्षे मी जेव्हा नैमित्तिक करारावर आकाशवाणीवर उद्घोषक म्हणून काम करत होतो त्यावेळी एक आकाशवाणीचे संचालक होते. एक साधं पोस्टकार्ड आकाशवाणीत आलं की, दुपारी दक्षिणात्य संगीताचा कार्यक्रमाचा सहभाग असावा. एवढ्या एका पोस्ट कार्डवर त्या कार्यशील अधिकाऱ्यांनी एक तासाचा रोजचा दाक्षिणात्य संगीताचा कार्यक्रम सुरू केला, याचा अर्थ असा की आकाशवाणी संचालकांनी मनात आणलं तर ते काहीही करू शकतात, नभोनाट्याच्या बाबतीत जनार्दन शिंदे, गुणवंत थोरात हे आवर्जून चांगल्या चांगल्या लेखकांना आमंत्रित करून त्यांच्याकडून लिहून घ्यायचे. नागपूरपुरतेच त्याचे सादरीकरण मर्यादित न राहता ते संपूर्ण महाराष्ट्रात त्याचं सादरीकरण व्हायचं, तेही आता संपल, ज्याप्रमाणे आकाशवाणीच्या संगीत विभागाची ऑडिशनची सूचना आहे तशी नभोनाट्यासाठी ऑडिशन देऊन बी ग्रेड, बी प्लस, ए ग्रेड, ए प्लस अशी आवाजाची परीक्षा उत्तीर्ण केली पण कार्यक्रमाचं काय? त्याबद्दल मात्र उदासीन असाच हा उपक्रम असावा का? बालांसाठी अनुराधा जोशी, अरविंद जागीरदार अशी नाव आजही स्मरणात आहेत. पुढे पुढे जे कलावंत त्या ठिकाणी भेटी देतात अशांनाच कार्यक्रम मिळायचे त्यापुढे जाऊन तर काही मर्जीतील लोकांनाच कार्यक्रम मिळत गेली, पण तेही आता नाहीच असं म्हणावं लागेल. याबाबत सध्याच्या आकाशवाणीतील कार्यरत आकाशवाणी संचालकांनी निश्चित आपली भूमिका मांडावी, पुन्हा स्थानिक कलावंतांना त्यांच्या गुणांना वाव देणारे कार्यक्रम सुरू करावेत जेणेकरून आकाशवाणीचा श्रोता वर्ग वाढेल आणि अशा व्हॉट्सअॅप दुनियेत आपली जाहिरात करून किंमत करावी लागणार नाही.

**संजय पेंडसे**/९४२२४४३२९५

●● ●●

### वास्तव की अवास्तव

प्रचलित दूरदर्शन मालिका आणि चित्रपट वास्तवापासून 'दूर' राहून चित्रीकरण करतात. कथानुषंगाने चित्रित झालेल्या प्रसंगात अपघात झालेल्या व्यक्तीला 'सिटी हॉस्पिटल' या अद्ययावत महागड्या खाजगी, सर्व सुखसोयींनी युक्त अशा हॉस्पिटलच्या आय. सी. यू. अर्थात 'अतिदक्षता विभागात' दाखल केले जाते. त्या विभागात केवळ 'क्रिटिकल' म्हणजे जीवन-मरणाच्या सीमारेषेवर असणाऱ्या व्यक्तींची देखभाल अपेक्षित असते. तज्ज्ञ वैद्यकीय चमू चोवीस तास रुग्णाची तपासणी, विविध मॉनिटर्स व तपासणीद्वारे करून योग्य उपचार करीत असतात. प्रत्येक बाबतीत जागरूकता दाखविली जाते. आगंतुकांना प्रवेश निषिद्ध असतो. केवळ जवळचे नातेवाईक ओळखीनंतर प्रवेश करू शकतात, हे सर्वविदितच आहे. मालिकेत मात्र या यंत्रणेला छेद देऊन खलनायक अथवा खलनायिका राजरोसपणे ही 'सुवर्ण संधी' साधून त्या व्यक्तीला यमसदनी पाठवण्यास उत्सुक असतात. दुष्कृत्यासाठी सहजपणे वावरतात. ऑक्सिजन मास्क काढणे, निषिद्ध इंजेक्शनचा वापर करणे इत्यादी. अत्यवस्थ अगदी 'भगवान भरोसे' टाकून वैद्यकीय मंडळी रान मोकळे सोडून जातात किंवा इतर कामात व्यस्त असल्याचे दाखवितात. हा अतिदक्षता विभाग की मृत्यूचा सापळा वाटावा अशी परिस्थिती. असले प्रसंग कथेची 'मागणी' असेलही कदाचित, पण त्यासाठी वेगळी 'मांडणी' अंगीकारता येऊ शकते. अवास्तव चित्रीकरणाने जनमानसात चुकीचा संदेश प्रस्तृत होऊ शकतो. एका गाजलेल्या मराठी मालिकेत एक अशिक्षित गुंड व्यक्ती पिस्तुलाच्या धाकावर डॉक्टरांना 'मृत घोषित केलेल्या' रुग्णावर डी-फिब्रीलेटर वापरण्यास सांगतो. आणि गंमत म्हणजे बाई चक्क जिवंत झाल्याचे दिसते. त्यावर सुशिक्षित, सुविद्य डॉक्टर त्याचे आभार मानतात. मेडिकल रिपोर्टसचा हवा तो गोंधळ घालणे जणू डाव्या हाताचा मळच असतो या खलप्रवृत्ती मंडळीचा. त्याशिवाय कथेला पूर्तता येत नसावी. आजकाल उपलब्ध असलेल्या प्रेग्नन्सी टेस्टद्वारे मातृत्वाची खात्री पटत असेल तर गैरसमजापोटी घटस्फोटापर्यंतची वेळ का दाखवण्यात यावी, हेच आकलन होत नाही. तेही सुशिक्षित जोडप्यात?

संबंधित व्यक्तींनी या बाबतीत थोडी खबरदारी घेऊन किंवा तारतम्य बाळगून मनोरंजनाबरोबरच प्रबोधनही करावे, ही नम्र विनंती.

**डॉ. प्रमोद कोरान्ने**/७०३०९५५०१९

●● ●●

### उत्सवांचे विकृतीकरण थांबवा

आपली भारतीय संस्कृती खूप महान आहे. हजारो वर्षे गुलामगिरीत गेल्यानंतरही आपण धर्माचरण सोडून उत्सव साजरे केले नाहीत, असा आपला पूर्वजांचा इतिहास आहे. परंतु आज शाळा-महाविद्यालयांत कुठेही धर्मशिक्षण न दिल्या गेल्यामुळे उत्सवांचे विकृतीकरण केले जात असल्याचे दृष्टीस पडते. कृष्ण जन्माष्टमीच्या वेळी जिथे एका ठिकाणी भावपूर्ण उत्सव साजरा केला जातो, तेथेच दुसऱ्या ठिकाणी दहीहंडीच्या वेळी सिनेमाचे गाणे लावून, मोठमोठ्याने डीजे लावून, दारू पिऊन कार्यक्रम पार पडल्याचे दिसते तसेच गणेशोत्सवाच्या काळात बाप्पाची मूर्ती आणताना व ती विसर्जन करताना, नवरात्र उत्सवात देवीची मूर्ती भावपूर्णरीत्या आणणे अपेक्षित असताना, कोलाहलात तिचं आगमन आणि विसर्जन मद्य प्राशन करून, हिडीस नृत्य करून होत असेल तर हे कुठेतरी अयोग्य पद्धतीने उत्सव साजरा केला जातो आहे. हिंदू धर्मामध्ये उत्साहाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संघटनभाव वाढावा, ईश्वराप्रती आपली श्रद्धा वाढावी, पूजा, आरती करताना सर्वांना अनुभूती यावी, त्यातून धर्माचरण घडावे, समाजप्रबोधन व्हावे, अन्नदान व्हावे इत्यादी अनेक उद्देश ठेवून सार्वजनिक उत्सव साजरे केले जातात. प्रत्यक्षात ज्ञानाच्या अभावामुळे ते भावपूर्ण, श्रद्धेने करण्याचा भाग कमी होऊन त्यातून आसुरी आनंद कसा मिळविता येईल, असा विचार होत असेल तर या भरकटलेल्या पिढीला धर्मशिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज आहे. माझी सर्व आध्यात्मिक संस्थांना विनंती आहे की, या संस्थांनी अशा प्रकारे उत्सव साजरे करणाऱ्यांचे प्रबोधन करावे आणि योग्यरीत्या उत्सव साजरे करण्याचे महत्त्व जनमानसाच्या मनावर बिंबवावे.

**डॉ. भारती हेडाऊ**/९४२१७७३९९९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# लग्नाच्या आमिषाने तरूणीवर अत्याचार करणाऱ्या तरूणाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

लग्नाच्या आमिषाने तरूणीवर अत्याचार करणाऱ्या तरूणाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत तरूणीच्या फिर्यादीवरून सागर पारधी (वय २४, रा. मौलाली चौक, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सागर पारधी याने यातील पिडीत तरूणीशी लग्नाच्या आमिषाने मैत्री केली. त्यानंतर मार्च २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत सागर याने पिडीतेवर जबरदस्तीने शरीरीसंबंध करून पिडीतेच्या नकळत स्वतःच्या मोबाईलमध्ये चित्रीकरण केले. तसेच त्याने मोबाईलमध्ये काढलेले अश्लिल व्हिडीओ हे ग्रुपवर व सोशल मिडीयावर प्रसारीत केले. म्हणून याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक केंद्रे पुढील तपास करीत आहेत.

# मंद्रूपच्या गणेशोत्सव मंडळातर्फे आज स्मशानभूमी स्वच्छता मोहिम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

सोलापूर शहरालगतच्या मंद्रूप येथील मानाचा मध्यवर्ती महात्मा बसवेश्वर गणेशोत्सव मंडळातर्फे रविवारी (दि. १५) सकाळी मल्लिकार्जुन मंदिर जवळील माळी समाज स्मशानभूमी स्वच्छता अभियान आयोजिले आहे. गणेशोत्सव मंडळातर्फे विविध सामाजिक उपपक्रमांसह, देखावे सादर करण्यात येतात. गेल्यावर्षीपासून मंडळाच्या युवकांनी स्मशानभूमी स्वच्छतेचा विधायक उपक्रम सुरु केला आहे. मंडळाचे १०० पेक्षा अधिक युवक या मोहिमेत सहभागी होणार आहेत. स्मशानभूमी स्वच्छ करून त्या परिसरात स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे. त्या रोपांना अत्यंविधीसाठी वापरलेले बांबूचा आधार देण्यात येणार असून चितेची राख रोपांना घालण्यात येईल, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष नागेश मायनाळे यांनी दिली.

# जैन गुरूकूलमध्ये खेळाडूंचा सत्कार

**सोलापूर दि १४ सप्टेंबर -**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त जैन गुरूकूल प्रशाला व कनिष्ठ म हाविद्यालयातील पुणे विभागीय स्क्वॅश स्पर्धेसाठी निवड झालेला सोहम पाटील व बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झालेले रणवीर पवार, काव्या पाटील व प्राजक्ता भिमपुरे यांचा आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार प्राप्त राजेंद्र गोटे व बुद्धिबळ स्पर्धेचे राष्ट्रीय पंच उदय वगरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक राजकुमार काळे उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, क्रीडा विभाग प्रमुख संजय पंडित, ज्येष्ठ शिक्षक सुभाष नागरसे व संजय भस्मे यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रीडा विभाग प्रमुख संजय पंडित यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर क्रीडा शिक्षक सुभाष उपासे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. यावेळी औदुंबरी पोलदार व संकल्प पुजारी यांनी मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ शिक्षक सुभाष नागरसे व संजय भस्मे यांनीही विचार व्यक्त केले. सहशिक्षक विजयकुमार काळेगोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. क्रीडा शिक्षक प्रसन्न काटकर यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### रेवणसिद्ध गुरव

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**



येथील रेवणसिद्ध भीमण्णा गुरव गुरुजी (वय ९०) यांचे शनिवारी सायंकाळी ५च्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या रविवार १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता पापाराम नगर येथून त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे

### चंद्रकांत कुलकर्णी

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**



येथील चंद्रकांत माधवराव कुलकर्णी (वय ९२) यांचे शनिवारी दुपारी २च्या सुमारास वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात दोन मुले, एक मुलगी, सुना नातवंडे, जावई असा परिवार आहे. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### बीबीषण शिंदे

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**



दमानी नगर भागातील भैरव कॉलनी सोसायटीचे ज्येष्ठ सदस्य आणि वारकरी सांप्रदायातील भाविक बीबीषण बाबा शिंदे ( वय ७९ ) यांचे शनिवारी सकाळी शासकीय रुग्णालय येथे उपचार सुरू असताना निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले आणि एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी कोयना नगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# विभागीय आयुक्तांची परवानगी विनाच प्रतिनियुक्त्या?

## झेडपी कर्मचाऱ्यांच्या प्रति नियुक्याच्या वाढल्या तक्रारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेच्या अनेक विभागात नियुक्ती तालुक्याला आणि काम करतात मुख्यालयात असे बरेच कर्मचारी प्रतिनियुक्तीने काम करतात. या कर्मचाऱ्यांच्या प्रति नियुक्ती देताना तत्कालीन सीईओ यांनी विभागीय आयुक्ताची परवानगी घेतली आहे का ? की, अशाच नियुक्त्या दिल्या आहेत असा प्रश्न उपस्थित होत आहे.

झेडपी कर्मचाऱ्यांना प्रति नियुक्ती देताना विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक आहे. परंतु झेडपीमधील वरिष्ठ सहाय्यक प्रदीप सकट या कर्मचाऱ्यांची नियुक्ती मुख्यालयाच्या कृषि विभागात असली तरी काम मात्र सामान्य प्रशासन विभागात करत आहे. निलेश कुलकर्णी या कर्मचाऱ्यांची नियुक्ती आरोग्य विभागात असून काम मात्र सामान्य प्रशासन विभागात करत आहे, नरेंद्र अकेले या कर्मचाऱ्यांची नियुक्ती बांधकाम दोनला कनिष्ठ सहाय्यक म्हणून असून काम मात्र सामान्य प्रशासन विभागात करत आहे. ग्रामसेवक नित्यानंद कुलकर्णी याची नियुक्ती मोहोळमध्ये असताना काम मात्र मुख्यालयाच्या ग्रामपंचायत विभागात करत आहे , प्रसाद देवळे या कर्मचाऱ्यांची नियुक्ती मुख्यालयात असताना काम मात्र उत्तर सब डिव्हीजनच्या बांधकाम विभागात काम करीत आहे.

लेखा व वित्त विभागातील शेडे या कर्मचाऱ्याची नियुक्ती माळशिरसला असताना काम मात्र मुख्यालयातील कनिष्ठ लेखाधिकारी म्हणून करतात. श्रीधर कुलकर्णी या आरोग्य सेवक कर्मचाऱ्याची नियुक्ती उत्तर पंचायत समितीला असताना काम मात्र मुख्यालयातील आयटी सेलमध्ये करतात, माध्यमिक शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचीही तीच स्थिती आहे. त्यामुळे झेडपीमधील अनेक कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीवर प्रश्न उपस्थित केले जात असून तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत.

### विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यकच

एखाद्या कर्मचाऱ्याला प्रति नियुक्ती देताना विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यकच आहे. परंतु जे कोणी कर्मचारी प्रति नियुक्तीने काम करीत आहेत त्या कर्मचाऱ्यांना विभागीय आयुक्तांनी परवानगी दिली आहे का ते सामान्य प्रशासन विभागाकडून माहिती घ्यावे लागेल.

- **कुलदीप जंगम,** मुख्य कार्यकारी अधिकारी,झेडपी

### माध्यमिक, दक्षिण बांधकाममध्येही तीच स्थती

माध्यमिक शिक्षण विभाग आणि दक्षिण च्या बांधकाम विभागामध्ये देखील प्रति नियुक्ती कर्मचाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे अशा प्रतिनियुक्ती कर्मचाऱ्यांच्या तक्रारी वाढल्या असून यावर प्रशासन मूळ पदावर का पाठवित नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकांना वेळेत पेन्शन नाही दिल्यास...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील सेवानिवृत्त प्राथमीक शिक्षकांना ९ तारीख उजाडले तरी पेन्शन मिळेना हिंदूत्वाचा डंका पिटवणारे शासन कर्ते ऐन गौरी गणपतीचा सणात सेवानिवृत्त शिक्षकांना उपाशी ठेवले आहेत. जिल्ह्यात सूमारे १५००० सेवानिवृत्त प्राथमीक शिक्षक आहेत त्यातील ७००० सेवानिवृत्त शिक्षक वयाचे पंच्याहत्तरी गाठले आहेत. यांना दरमहीन्याला ५ ते ७ हजार रूपये वैद्यकीय खर्च असतो.या सर्व शिक्षकांना येत्या आठ दिवसात पेन्शन नाही मिळाल्यास दोन ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषदेसमोर भीक मांगो आंदोलन करणार असा इशारा सेवानिवृत्त संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबत माहितीची प्रत प्रशासन व मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना माहितीसाठी दिली आहे.

### सेवानिवृत्त संघटना २ ऑक्टोबरला जिल्हा परिषदसमोर भिक मांगो आंदोलन

सध्या सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त प्राथमीक शिक्षकाचे गेले तीन चार महिने दर महिन्याला १० ते १५ तारखेलाच पेन्शन मिळतो त्यामुळे वयस्कर सेवानिवृत्ताचे हाल होत आहे म्हणून महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त प्राथमीक शिक्षक संघाच्या वतीने दर महिन्याला १ ते ५ तारखेला पेन्शन देण्यात यावी अन्यथा येत्या २ ऑक्टोबरला जिल्हा परिषद समोर भीक मागो आंदोलन करणार असल्याचे निवेदन प्रत प्रशासनाला दिली आहे.

- **शिवानंद भरले,**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त प्राथमीक शिक्षक संघ



# मनपा शाळेत पोलिस दीदी उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

मनपा शहीद कुर्बान हुसेन मुला-मुलींची शाळा येथे पोलिस दीदी उपक्रम राबविण्यात आला.

पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विजय कबाडे, सहायक पोलिस आयुक्त राजन माने, यशवंत गवारे,सदर बझार पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अजित लकडे, भालचंद्र ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा पोलीस दीदी पोलीस दादा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात म हिला सहायक पोलिस उपनिरीक्षक अनिता जाधव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास सदर बझार पोलीस ठाणे कडील पोलिस हवालदार औदुंबर आटोळे, सागर गुंड, तसेच शालेय समिती वरील मुख्याध्यापक तबस्सुम सय्यद, मलेका तांबोळी, अध्यक्ष मालन बागवान आदी उपस्थित होते.


# गुड्डद बसवराज महास्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १४ सप्टेंबर-**

येथील महातपस्वी लिं. श्री. गुड्डद बसवराज महास्वामी यांचा ५९ वा पुण्यतिथी महोत्सव श्री. शिवानंद महास्वामीजी विरक्तमठ, करजगी यांच्या प्रेरणेने बुधवार दि. ११ ते शनिवार दि. २१ सप्टेंबर या कालावधीत संपन्न होत आहे.

अकरा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात रोज सायंकाळी सहा वाजले पासून वेदमूर्ती योगीराज शास्त्री खानापूर यांच्या रसाळ वाणीने श्री लच्याण सिद्धलिंग महाराज यांचे पुराण चालू आहे.

मंगळवार दि. १७ ते शनिवार दि. २१ या कालावधीत विशेष धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय कार्यक्रम संपन्न होणार असून त्याची रूपरेषा पुढील प्रमाणे असणार आहे. शनिवार दि. १७ रोजी रात्री आठ वाजता श्री. गुरुनाथ महाराज, संगदरी व श्री. परमानंद महाराज, यळसंगी यांचे प्रवचन होईल. बुधवार दि. १८ रोजी सकाळी दहा वाजल्यापासून देवस्थान ट्रस्ट व दमाणी ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यम ने भव्य रक्तदान व मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमास डॉ.अशोक हिप्परगी, डॉ. राहुल कारीमुंगी, सोलापूर व प्राथमिक आरोग्य केंद्र करजगी येथील वैद्यकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्याच दिवशी संध्याकाळच्या कार्यक्रमात श्री.महांतेश्वर शिवाचार्य महास्वाम ीजी, चिणमगेरी व शिवलिंग देवरू, निंबर्गी यांचे आशीर्वचन होणार आहे.




गुरुवार दि. १९ रोजी रात्री बसवलिंग म हास्वामीजी, नागणसूर, गुरुशांतलिंग शिवाचार्य, कल्लहिप्परगा, श्री. चन्नमल्लस्वामीजी, तोळणूर यांचे आशीर्वचन होणार आहे.

शुक्रवार दि. २० रोजी रात्री आठ पासून संपन्न होणाऱ्या धर्मसभेत श्री. करीवृषभ देशीकेंद्र शिवयोगीश्वर,महास्वामीजी काडसिद्धेश्वर संस्थानमठ, नोणविनकेरे यांच्या दिव्य सानिध्यात श्री.स्वामीनाथ महास्वामीजी,किरिटेश्वर मठ, सोलापूर, श्री.अभिनव काडसिद्धेश्वर महास्वाम ीजी नोणविनकेरे, श्री गुरुलिंग महास्वामीजी, यलगोड, श्री. राजशेखर महास्वामीजी, नंदगाव, श्री. षडभावरहितेश्वर महास्वामीजी, हेगडळळी, शांतवीर शिवाचार्य, मादन हिप्परगा, इत्यादींचे आशीर्वचन होणार आहे. सदर दिवशीच शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे यांचा विशेष सत्कार होणार आहे. शनिवार दि. २१ पुण्यतिथी दिनी दिवसभर चालणाऱ्या कार्यक्रमात पहाटे श्रींच्या समाधीस महारुद्राभिषेक व सहस्त्र बिल्वार्चन, सकाळी महामृत्युंजय होम, सहस्त्र सुहासिनींची पूजा, ओटी भरणे व महाप्रसाद आणि दुपारी १२ नंतर श्रींच्या पालखीची गावातून भव्य मिरवणूक संपन्न होणार आहे. रात्री होणाऱ्या महोत्सवाच्या सांगता समारंभास श्री. बसवलिंग महास्वामीजी अक्कलकोट, श्री. शिवयोगी शिवाचार्य, नावदगी, पानमंगरूळ, गुरुशांत महास्वामीजी, हत्तीकणबस, रेवणसिद्ध शिवाचार्य, कडणी, पांडुरंग महाराज, जेऊर, व सोमलिंग महाराज, शिरवळ यांची धर्मसभा होणार असल्याने पंचक्रोशीतील समस्त सद्भक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमठ,करजगी व यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात येत आहे.

# जलजीवन मिशन... वरळेगावचे ग्रामपंचायत अन ठेकेदारांच्या अंतर्गत वादामुळे थांबले

## उपअभियंता सुनिल कटकधोंड यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

तालुक्यातील वरळेगाव येथील जलजीवन मिशनचे काम गावातील ठेकेदार आणि ग्रामपंचायतीच्या अतंर्गत वादामुळे प्रलंबित असून त्यासाठी शासनाकडे सुधारित अंदाजपत्रकाचा प्रस्ताव पाठविले असल्याची माहिती उपअभियंता सुनिल कटकधोंड यांनी दिली.

वरळेगावचे जलजीवन मिशनचे काम दीड वर्षापासून प्रलंबित असल्याची तक्रार बी. व्ही. कन्स्ट्रक्शन आणि लक्ष्मण हक्के यांनी वैतागून जिल्हाधिकारी यांच्याकडे शाखा अभियंता व उपअभियंता यांच्याकडे केली होती. मात्र वास्तविक पाहता या जलजीवन मिशनच्या कामात ग्राम पंचायतमधून संबधित ठेकेदाराला विरोध होत आहे.

हे जलजीवन मिशनचे काम ६० लाखाचे होते. रिव्हाईज इस्टीमेट केल्यानंतर हे काम ३१ लाखाचे झाले. त्यामुळे हे रिव्हाईज अंदाजपत्रक शासनाकडे मंजुरीसाठी पाठविले असून उपअभियंता या नात्याने आमच्याकडून हे काम थांबलेले नाही.

- **उपाभियंता सुनिल कटकधोंड, झेडपी**

### झेडपीच्या सेस फंडातून साडेचार लाख रुपये..

दोड्डी येथील जलजीवन मिशनच्या विहीरीच्या बांधकामासाठी ४ लाख व गाळ काढण्यासाठी ५० हजार असे एकूण साडेचार लाख रूपये जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.


## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेपत: बार्शी शहर, बार्शी तालुका व आसपासचे लोकांस आमचे अशिलांनी कागदपत्रे दाखवून जाहीर नोटीस प्रसिध्द करणेस सांगितलेवरुन सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. बार्शी पैकी मौजे बार्शी ता. बार्शी नगरपालिका हद्दीतील गट क्रमांक ५३२/५ याचे क्षेत्रफळ ३१०.६१ चौ.मी. आकार २०५ रु. ०० पै. याचे मोजमाप पूर्व बाजू १२.९९ मी., दक्षिण बाजू २५.५५ मी., पश्चिम बाजू ९२.९९ मी., उत्तर बाजू २५.४९ मी. सदरच्या प्लॉटची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहेत.

पूर्वेस १५ मीटर रुंदीचा रस्ता, दक्षिणेस प्लॉट नं. ४, पश्चिमेस प्लॉट नं. ८ व ९, उत्तरेस प्लॉट नं. ६. याचे पाणी व वागणूक पूर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक बिनशेती खुला प्लॉट आतील झाड-झाडोरा, माती--दगड वगैरे तंदगभूत वस्तुसह वहिवाटीचे हक्कासह. सदरचा बिनशेती खुला प्लॉट आमचे अशिल यांनी श्री. राहुल विराग टिळक यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेणेबाबत तोंडी करार केलेला आहे व इसाराची रक्कमही दिलेली आहे.

वर नमूद केलेली मिळकत ही त्याचे मालकांनी त्यांच्या प्रापंचिक अडचणीकरीता विक्रीस काढली असता आमच्या अशिलासोबत सदर मिळकतीबाबत तोंडी ठराव करुन आमच्या अशिलास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असा भरवसा देवून आमच्या अशिलाकडून इसाराची रक्कम स्वीकारलेली आहे.

तरी तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकती बाबत कोणाचा काही हक्क, हितसंबंध, मालकीवहिवाट, कब्जा, अतिक्रमण असल्यास अथवा सदर जमीनीचा करार-मदार, पोटगी, गहाण, दान, लीन, लीज अथवा साठेखत, नोटरी इसारपावती किंवा कोणत्याही बँकेचे अथवा खाजगी सावकाराचे कर्ज असल्यास किंवा सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचा वाद, भावकीवाद, बांधाचा वाद वगैरे असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह कळवाव्यात. असे न केल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशील सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही तक्रार चालणार नाही त्याकरीता सदरची जाहीर नोटीस दिली आहे.

तारीख : १४/०९/२०२४

सही/-
श्री. नितिन अरुण मोरे
ॲडव्होकेट
जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी ता. बार्शी जि.सोलापूर
मो. नं. ९९२२४७२२१५ / ७९७२१३७४४६
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत : मोजे भोयरे ता. बार्शी व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसोने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मोजे भोयरे हद्दीतील जमीन गट नं.२४/१ पैकी क्षेत्र ०० हे. ४० आर आकार ०० रु.३० पैसे यासी चतुः सिमा पुर्वेस - अरुण महादेव उकरंडे, दक्षिणेस - सारिका दत्ता धस, पश्चिमेस - बाभुळगाव रस्ता, उत्तरेस- पोपट महादेव उकरंडे, येणेप्रमाणे वर्णनाची जमीन आतील दगड माती जल तरु, काष्ट, पाषाण, झाडे, झुडूपे, यासह आतील मालकीचे व वागणुकीचे व वहिवाटीचे अधिकारासह जाणेयेणेचे हक्कासह जिरायत जमीन.

वर वर्णन केलेली मिळकत आश्विनी समाधान विधाते यांचे मालकीची व वहिवाटीची आहे व त्याप्रमाणे त्यांची हक्कपत्रकी नोंद आहे. त्यांनी सदर मिळकत त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे आशिलास खरेदी देणेचे ठरविलेले आहे. तसेच उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास आमचे आशिलास दिलेला आहे. आमचे अशिल हे ठरलेल्या कराराप्रमाणे मुदतीत खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचेही हक्कात पूर्व खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, लिज, बक्षिस, कर्ज, बोजा, कब्जा, अग्रहक्क इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आमचेकडे लेखी हरकत द्यावी कोणाचीही हरकत तक्रार सदर मुदतीत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे आशिल हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिली. ता. १४/०९/२०२४.

सही/-
अशिल

सही/-
ॲड. संदिप महादेव भोसले
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो.नं. ८०८७११९१००
अशिलातर्फे ॲडव्होकेट



## भारत सहकारी गारमेंटस् मर्यादित, सोलापूर.

ऑफिस - गट नं.१२ होटगी गाव, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदा करिता)

भारत सहकारी गारमेंटस् मर्या. सोलापूर. या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **सन २०२३-२४ सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा वार-रविवार दि. २९/०९/२०२४ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता संस्थेचे चेअरमन श्री शफिहजरत बापूसाहेब इनामदार** यांच्या अध्यक्षतेखाली गट नंबर १२ मौजे होटगी ता. दक्षिण सोलापूर जि सोलापूर येथील प्रकल्प इमारतीत बोलविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**✲ सभेपुढील विषय ✲**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.
२) संस्थेचे सन २०२३-२४ अखेरपर्यंतचे संचालक मंडळाने सादर केलेल्या तेरीज ताळेबंद, नफा/तोटा पत्रक वाचून कायम करणे.
३) संस्थेच्या सन २०२४-२५ या सालासाठी अंतर्गत लेखा परिक्षकाची नियुक्ती करणे व फी ठरविण्याचा अधिकार देणेबाबत.
४) संस्थेचे सन २०२४-२५ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण करणेसाठी लेखा परिक्षकाची नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणे.
५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेस येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

सोलापूर.
दि.१५/०९/२०२४

प्रभारी व्यवस्थापक
भारत सहकारी गारमेंटस मर्या.
सोलापूर

**✲ विशेष सूचना ✲**

१) सभा ठीक सकाळी १०.०० वाजता सुरू होईल तथापि गणपुर्ती न झालेस सभा अर्धा तास तहकुब करून त्याच ठिकाणी सभेचे कामकाज सुरु करण्यात येईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) ज्या सभासदांना प्रश्न विचारायचे आहेत त्यांनी दि.२१/०९/२०२४ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात होटगी येथे सादर करावेत नंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
३) संस्थेचे नफा तोटा, ताळेबंद पत्रक, संस्थेच्या कार्यस्थळावरील नोटीस बोर्डावर लावण्यात आलेले आहेत.



## सोलापूर महानगरपालिका सोलापूर

पत्ता :- इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारदपथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१ नगर अभियंता कार्यालय, नागरीकामे
ई-मेल - smcaecivilworks@gmail.com मो. ७७४४००९९७९

जा.क्र. नगरअभियंता/नागरीकामे/२०२४-२५/१८०२ दिनांक - १२/०९/२०२४

**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिकेमार्फत श्री. गणेश मुर्ती विसर्जन २०२४ करिता शहरातील सर्व नागरिक विविध गणेश उत्सव मंडळ यांना खालील नमूद ठिकाणी विसर्जन ठिकाणे/विहिर/कुंडामध्ये व्यवस्था करणेत आलेली आहे. या व्यतिरिक्त ज्या श्री. गणेश भक्तांना श्री. गणेश मुर्ती विसर्जनासाठी संकलन केंद्रामध्ये जमा करावयाच्या आहेत. त्यांच्या करिता श्री. गणेश मुर्ती संकलन केंद्राची व्यवस्था सोलापूर महानगरपालिकेकडून करणेत आलेली असून, त्याची माहिती वर्तमान पत्रात संक्षिप्त पणे देणेत आलेली आहे.

| अ. क्र. | विभागीय कार्यालय क्र. | श्री. गणेश मुर्ती विसर्जन ठिकाण/कुंड / विहिरी |
|---|---|---|
| १ | ०१ | गणपती घाट |
| २ | ०१ | कल्याणी कुंड (पठाणबाबा दर्गा) / विष्णू घाट |
| ३ | ०२ | म्हाडा विहिर विडी घरकुल |
| ४ | ०२ | हिप्परगा येथील खाण |
| ५ | ०३ | एम.आय.डी.सी. ओपन स्पेस प्रिसिजन फॅक्ट्री जवळ (१-कृत्रिम कुंड) |
| ६ | ०५ | कंबर तलाव - (३ कृत्रिम कुंड) |
| ७ | ०५ | रामलिंग नगर विहिर |
| ८ | ०६ | विष्णू मिल विहिर |
| ९ | ०६ | बसवेश्वर नगर विहिर (श्री. अक्कलकोट) |
| १० | ०८ | मार्कंडेय उद्यान विहिर |
| ११ | ०८ | सुभाष उद्यान विहिर |

**विभागीय कार्यालय क्र. १**

| अ. क्र. | श्री गणेश मुर्ती संकल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | सो.म.पा. शाळा नं. २१, न्यू बुधवार पेठ |
| २ | वडार गल्ली समाज मंदिर |
| ३ | प्रसन्न हॉल, वसंत विहार |
| ४ | इंदिरा कन्या प्रशाला, शिंदे चौक |
| ५ | सो.म.पा. शाळा क्र. ९, पत्रा तालीम |
| ६ | विठ्ठल मंदिर, जुनी पोलीस लाईन |
| ७ | शरदचंद्र पवार प्रशाला, उमा नगरी |
| ८ | हुतात्मा स्मृती मंदिर |
| ९ | डॉ. कोटणीस स्मारक, भैय्या चौक, सोलापूर |

**विभागीय कार्यालय क्र. २**

| अ. क्र. | श्री गणेश मुर्ती संकल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | रोशन प्रशाला |
| २ | अंबिका समाज मंदिर, राजीव किसान नगर |
| ३ | नागनाथ अल्ली महाराज |
| ४ | पिरॅमीड हॉल, बी ग्रुप विडी घरकुल |
| ५ | संभाजीराव शिंदे प्रशाला |
| ६ | राज मेमोरियल इंग्रजी शाळा |
| ७ | जिल्हा परिषद शाळा, शेळगी |
| ८ | जोशी गल्ली, रविवार पेठ |

**विभागीय कार्यालय क्र. ३**

| अ. क्र. | श्री गणेश मुर्ती संकल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | एम.आय.डी.सी. प्रिसिजन कारखाना जवळ, भुखंड क्र. ६ व ७ खुली जागा |
| २ | जय भवानी प्रशाला, भवानी पेठ |
| ३ | विभागीय कार्यालय क्र. ३ |
| ४ | गांधी नगर नं. २ येथील समाज मंदिर |
| ५ | पावन गणपती, कर्णिक नगर |
| ६ | विनोबा भावे झोपडपट्टी येथील ललीतांबा मंदिर |

**विभागीय कार्यालय क्र. ४**

| अ. क्र. | श्री गणेश मुर्ती संकल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | मार्कंडेय नगर, जिल्हा परिषद शाळा |
| २ | माधव नगर, पद्ममारुती मंदिर |
| ३ | बुर्ला मंगल कार्यालय |
| ४ | गणेश मंदिर, बोमड्याल शाळेजवळ |
| ५ | बोल्ली मंगल कार्यालय, अशोक चौक |
| ६ | जि.प. शाळा, निलम नगर |
| ७ | साने गुरुजी प्रशाला, बत्तुल प्रशाला लगत |
| ८ | मा. सिध्दारुढ मठ गवळी वस्ती नीलमनगर |
| ९ | केंगनाळकर शाळा |

**विभागीय कार्यालय क्र. ४**

| अ. क्र. | श्री गणेश मुर्ती संकल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | राजस्व नगर सांस्कृतिक भवन |
| २ | प्रगती लॉन्स |
| ३ | अथर्व मंगल कार्यालय |
| ४ | किल्लेदार मंगल कार्यालय |
| ५ | बालाजी मंगल कार्यालय |
| ६ | गोविंदश्री मंगल कार्यालय |
| ७ | शिवदारे कॉलेज |
| ८ | मातोश्री रखुमाबाई हत्तुरे मंगल कार्यालय |
| ९ | हत्तुरे मंगल कार्यालय |
| १० | मारुती मंगल कार्यालय |
| ११ | कुसुमराज मंगल कार्यालय |
| १२ | समृध्दी गार्डन |
| १३ | पोस्ट बेसीक शाळा, विजापूर रोड |

**विभागीय कार्यालय क्र. ६**

| अ. क्र. | श्री गणेश मुर्ती संकल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | सुंदराबाई डागा प्रशाला, दमाणी नगर |
| २ | जि.प. शाळा, देगांव |
| ३ | थोबडे वस्ती समाज मंदिर, थोबडे वस्ती |
| ४ | जांबमुनी समाज मंदिर, सोनी नगर |
| ५ | उत्कर्ष नगर मनपा शाळा |
| ६ | मनपा शाळा क्र. २८, सुंदरम नगर |

**विभागीय कार्यालय क्र. ७**

| अ. क्र. | श्री गणेश मुर्ती संकल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | नियोजन भवन |
| २ | प्र.क्र. १६ मोदी शाळा, बिग बाजार समोर |
| ३ | मनपा रामवाडी शाळा |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, एम्प्लायमेंट चौक |
| ५ | मनपा उर्दू शाळा क्र. ३ |
| ६ | मनपा मराठी शाळा क्र. ३, दक्षिण कसबा |
| ७ | शिवानुभव मंगल कार्यालय |
| ८ | भोईराज समाज मंदिर शुक्रवार पेठ |

**विभागीय कार्यालय क्र. ८**

| अ. क्र. | श्री गणेश मुर्ती संकल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | जोडबसवण्णा चौक, शाळा नं. ६ |
| २ | पोलिस मुख्यालय लगत MPSC अभ्यास केंद्र |
| ३ | वॉर्ड ऑफिस म्हेत्रे |
| ४ | सुभाष उद्यान विहिरीलगत |
| ५ | बालाजी मंदिर मुर्गीनाला भाजी मार्केट |
| ६ | इन्डोअर स्टेडिअम अश्विनी हॉस्पिटल जवळ |
| ७ | वसंतराव नाईक शाळा |
| ८ | लोधी गल्ली शाळा नं. १४ जवळ मंदिर |
| ९ | सतनाम चौक ललीत कल केंद्र |
| १० | म. बेकरी शास्त्री नगर समाज मंदिर महादेव मंदिर |
| ११ | वॉर्ड ऑफिस नल्लामंदु |
| १२ | गणेश मंदिर हॉल, विकास नगर पोस्टल कॉलनी परिसरात |
| १३ | कॅम्प शाळा |
| १४ | शास्त्री नगर तायम्मा मंदिर |
| १५ | जांबमुनी समाज मंदिर अलकुंटे चौक |
| १६ | ५ नं. शाळा, भारतरत्न इंदिरा नगर |
| १७ | बापूजी नगर हनुमान मंदिर |
| १८ | ७० फुट रोड मस्जीद जवळ, समाज मंदिर (गेंट्याल टॉकीज जवळ) |
| १९ | अशोक चौक, पोलिस मुख्यालय लगत |

सही/-
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

# सोलापुर शहरातील विविध गणेश मंडळाचे देखावे (छाया : केवल तिवारी)



सोलापूर : फ्रेंड्स मित्र परिवार बहुउद्देशीय सांस्कृतिक क्रीडा मंडळाने श्री राम मंदिराचा देखावा साईबाबा चौकाजवळ सादर केला आहे.



सोलापूर : वीर बाल तरुण मंडळाने श्री राम मंदिराचा सजीव देखावा सादर केला.



सोलापूर : कावळे बिल्डिंग येथील न्यू नवरत्न विजय तरुण मंडळाचा गणपती



सोलापूर : आप्पा गणपती मंडळाने तिरुपती बालाजी मंदिराचा भव्य देखावा उभारला आहे.



सोलापूर : हरेश्वरा रेसिडेसी बसवेश्वरनगर गणेश उत्सव मंडळासमोर ज्ञानप्रबोधिनी मणिपूरच्या विद्यार्थ्यांच्या झांज पथकाने सोलापूरकरांची मने जिंकली. शनिवारी टिपलेले छायाचित्र (छायाचित्र : केवल तिवारी)




सोलापूर : सोलापूरच्या मानाचा कसबा गणपती मंडळाने मीरा भजन देखावा सादर केला.

## महत्त्वाचे

### आर. अश्विनकडून अमेरिकन गॅम्बिट्स गीताचे सादरीकरण

**चेन्नई** : अनुभवी भारतीय अष्टपैलू क्रिकेटपटू रविचंद्रन आश्विनने शनिवारी ग्लोबल चेस लीगच्या हंगाम २ च्या आधी आपल्या समाजमाध्यम हॅण्डलवर अमेरिकन गॅम्बिट्स फ्रॅन्चायझीच्या प्रोत्सान गीताचे सादरीकरण केले. 'मेक द वर्ल्ड गो' हे गीत चरण राज यांनी संगीतबद्ध केले आहे. कार्तिक चेन्नोजीराव यांनी गायले आहे. ३७ वर्षीय अश्विन हा जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकाचा जीएम हिकारू नाकामुरा यांच्या नेतृत्वाखालील संघाचा सह-मालक आहे. आमच्यासाठी, बुद्धिबळ म्हणजे पटावर सर्वोत्कृष्ट गोष्टी घडवून आणणे आहे. आम्ही भारत व जागतिक स्तरावर बुद्धिबळाला लोकप्रिय व प्रोत्साहन देऊ इच्छितो, असे अश्विनने म्हटले आहे. हे गीत निर्भयतेची आणि अंतिम विजयाची भावना अंतर्भूत करते. आम्ही उत्साही आहोत आणि आम्ही धैर्याने कसे खेळू हे जगाला दाखवण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत, असेही तो म्हणाला. ग्लोबल चेस लीगच्या हंगाम २ लंडनमध्ये ३ ते १२ ऑक्टोबर दरम्यान खेळवला जाणार आहे. या स्पर्धेत भारतीयांमध्ये विश्वनाथन आनंद, अनिश गिरी, आर प्रज्ञानंधा, आर वैशाली, कोनेरू हम्पी यांचा समावेश आहे.



### बोरुसिया डॉर्टमुंडचा हेडेनहेमवर ४-२ ने विजय

**बर्लिन** : बुंडेस्लिगा फुटबॉल स्पर्धेत बोरुसिया डॉर्टमुंडने हेडेनहेमवर ४-२ ने शानदार विजय नोंदविला. या पराभवामुळे हेडेनहेमचे गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचण्याचे स्वप्न अचानक थांबले. पहिल्या दोन सामन्यातील दोन विजयामुळे हेडेनहेम आश्चर्यकारकपणे आघाडीच्या स्थानावर पोहोचले होते, परंतु जबरदस्त फॉर्मात असलेल्या हेडेनहेम संघाची घोडदौड करीम अडेमीने थांबवली. या विजयामुळे बोरुसिया डॉर्टमंडला प्रतिस्पर्ध्यापेक्षा पुढे नेले व बुंडेस्लिगामध्ये प्रथम स्थानावर पोहोचवले. मॅक्सिमिलियन ब्रुनिगने ७४व्या पेनॉल्टीवर गोल करून बोरुसिया डॉर्टमुंडच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

## भारताचा पाकिस्तानवर २-१ ने विजय

### आशिया चॅम्पियन्स चषक हॉकी

### कर्णधार हरमनप्रीतचे २ महत्त्वपूर्ण गोल

**हुलुनबुईर, १४ सप्टेंबर**

कर्णधार हरमनप्रीत सिंगने दोन पेनॉल्टी कॉर्नरला गोलमध्ये रुपांतर करून येथे शनिवारी हिरो आशिया चॅम्पियन्स चषक हॉकी स्पर्धेच्या अंतिम साखळी सामन्यात अपराजित भारताला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर २-१ ने विजय मिळवून दिला.

सहा संघांच्या राऊंड रॉबिन साखळी स्पर्धेत भारताचा हा सलग पाचवा विजय ठरला. भारत व पाकिस्तानने आधीच या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केलेले आहे.

सामन्याच्या प्रारंभी आठव्या मिनिटाला अहमद नदीमने गोल करून पाकिस्तानला १-० अशी आघाडी मिळवून दिली, मात्र त्यानंतर हरमनप्रीत सिंगने कर्णधारपदाला साजेशी कामगिरी करत सलग दोन गोल नोंदवून भारताला विजय मिळवून दिला. भारतीय संघाला सामन्याच्या १३ व्या व १९ व्या मिनिटाला अशा दोन पेनॉल्टी कॉर्नरची संधी मिळाली, या संधीचे सोने करत हरमनप्रीतने भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. या स्पर्धेतील पाकिस्तानचा हा पहिला पराभव ठरला.



विजय नोंदवल्याचा आनंद साजरा करताना भारतीय हॉकी संघ

या विजयाबरोबरच भारताला २०१६ पासून पाकिस्तानवर आपले वर्चस्व कायम राखता आले. गत वर्षी हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा १०-२ असा पराभव केला होता. काही महिन्यांपूर्वी चेन्नई येथे झालेल्या आशिया चॅम्पियन्स चषक हॉकी स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा ४-० ने पराभव केला होता.

२०२२ मध्ये जकार्ता येथे झालेल्या आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघाने पाकिस्तानला १-१ असे बरोबरीत रोखले, तर येथे २०२१ आशिया चॅम्पियन्स चषकात भारताने पाकिस्तानचा ४-३ ने पराभव करून कांस्यपदक जिंकले होते.

कोणत्याही भारत-पाक हॉकी सामन्यांप्रमाणेच या सामन्याच्या पहिल्या चरणात दोन्ही संघांनी आपले सर्वस्व गाजवून आघाडी मिळविण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

यात पाकिस्तानने आघाडी मिळविली, परंतु पुढे भारतीय संघाच्या आक्रमक खेळामुळे त्यांना आपली आघाडी वाढविता आली नाही.भारतीय संघानेही आक्रमक खेळ करत पाकिस्तान संघावर दडपण आणले व दोन गोल नोंदविले.

मलेशिया व कोरियादरम्यानचा अन्य सामना ३-३ गोलने बरोबरीत राहिला.

राऊंड रॉबिन पद्धतीच्या या स्पर्धेत अव्वल ठरणारे चार संघ १६ सप्टेंबर रोजी होणाऱ्या उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील व अंतिम सामना १७ सप्टेंबरला होणार आहे.

(वृत्तसंस्था)

## भारतीय पुरुषांचा हंगेरीवर, महिलांचा स्वित्झर्लण्डवर विजय

### बुद्धिबळ ऑलिम्पियाड

**बुडापेस्ट, १४ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताच्या पुरुष संघाने हंगेरी बी' संघावर ३.५-०.५ असा, तर महिला संघाने स्वितझर्लण्ड संघावर ३-१ असा विजय नोंदविला.

खुल्या विभागात भारतीय पुरुषांसाठी अर्जुन एरिगेसी विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने पीटरविरुद्ध शानदार आक्रमण खेळ केला. त्याने राणीच्या बलिदानानंतर चेकमेट करत डाव जिंकला. तथापि, विदित गुजराथीला पप्प गबोरविरुद्धचा डाव बरोबरीत राखण्यावर समाधान मानावे लागले. विदित या स्पर्धेत प्रथमच विजय मिळवण्यात अपयशी ठरला, परंतु डी. गुकेशने ॲडम कोझाकला पराभूत केले, तर आर. प्रज्ञानंदने तामस बनुझवर मात केली.

महिला विभागात भारताने स्विक्त्झर्लण्डवर ३-१ असा विजय नोंदविला. पहिल्या पटावर भारताच्या डी. हरिकाला धक्कादायक पराभव पत्करावा लागला, मात्र आर. वैशाली, दिव्या देशमुख व वंतिका अग्रवालने दमदार विजय मिळवून संघाचा ३-१ असा विजय सुनिश्चित केला. भारतीय महिला संघाने सहा गुणांसह आपली संयुक्त आघाडी कायम राखली.



प्रतिस्पर्धीविरुद्ध चाल खेळण्यात मग्न दिव्या देशमुख

नुकतीच रशियाहून स्वित्झर्लण्डला स्थलांतरित झालेली अलेक्झांड्रा कोस्टेनियुक हिच्याकडून डी. हरिकाला पराभव पत्करावा लागला. अलेक्झांड्राने आपले रशियन नागरिकत्व सोडले व ती स्वित्झर्लण्ड संघात दाखल झाली.

माजी विश्व महिला बुद्धिबळ विजेती अलेक्झांड्रा हिने हरिकाकडून खेळल्या चुकीच्या चालीचा फायदा घेत पूर्ण गुण मिळवला.

वैशालीने अन्य स्थलांतरित खेळाडू गझल हकीमीफर्ड हिच्यावर मात केली. गझलनेही आपले नागरिकत्व सोडून स्वितझर्लण्डमध्ये दाखल झाली. गझलने काही नाहक चुका केल्या, त्याचा वैशालीने फायदा उचलला. दिव्या देशमुखने आपल्या विजयाचा मार्ग सुरूच ठेवला आणि सोफिया ह्विझलोव्हाविरुद्ध विजय मिळवला.

बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये शनिवारी एका उलटफेरची नोंद झाली. खुल्या विभागात पाचव्या मानांकित हॉलंडला इटलीकडून १-३ ने पराभव पत्करावा लागला.

स्पर्धेतील अजून आठ फेऱ्या शिल्लक आहे. पुढील फेरीत भारतीय पुरुषांची लढत सर्बियाशी होणार आहे. महिला विभागातही १६ संघ प्रत्येकी सहा गुणांसह बरोबरीवर आहेत. चौथ्या फेरीत भारतीय महिलांचा सामना फ्रान्सविरुद्ध होणार आहे.

(वृत्तसंस्था)

## अभिमन्यू ईश्वरन् नाबाद १४३

### भारत ब २२६ धावांनी पिछाडीवर

**अनंतपूर, १४ सप्टेंबर**

दुलिप करंडक क्रिकेट स्पर्धेत दुसऱ्या फेरीच्या अन्य सामन्यात ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील भारत क संघाने काढलेल्या ५२५ धावांना चोख प्रत्युत्तर देत भारत ब संघाने तिसऱ्या दिवस अखेरपर्यंत पहिल्या डावात ७ बाद ३०९ धावा काढल्या. खेळ थांबला तेव्हा कर्णधार व सलामीवीर अभिमन्यू ईश्वरन् १४३ धावांवर, तर राहुल चहर नाबाद १८ धावांवर खेळत होते. भारत ब संघ अजून २१६ धावांनी पिछाडीवर आहे.

भारत ब संघाने बिनबाद १२४ धावांवरुन पुढे आपल्या पहिल्या डावास सुरुवात केली. सलामीवीर अभिमन्यू ईश्वरन्‌ने एक बाजू खंबीरपणे सांभाळत साथीदार नारायण जगदिशन्‌सोबत पहिल्या गड्यासाठी १२९ धावांची सलामी भागीदारी केली. जगदिशन्‌ने १३७ चेंडूंत ८ चौकारांच्या मदतीने ७० धावांची खेळी केली. जगदिशन् बाद झाल्यानंतर अभिमन्यूला सर्फराज खान (१६), वॉशिंग्टन सुंदर (१३), साई किशोर (२१) यांची थोडीफार साथ मिळाली, परंतु मुशीर खान (१), रिंकू सिंग (६), नितीश कुमार रेड्डी (२) हे भारत क संघाच्या गोलंदाजांसमोर टिकाव धरू शकले नाहीत. खेळ थांबला तेव्हा अभिमन्यू व राहुल चहर खेळपट्टीवर होते, तोपर्यंत भारत ब संघाने १०१ षटकांत ७ बाद ३०९ धावांचा टप्पा गाठला होता. अभिमन्यूने २०२ चेंडूंत १२ चौकार व एका षट्कारसह नाबाद १४३ धावांची खेळी केली.



अभिमन्यू ईश्वरन् नाबाद १४३, चेंडू २६२, चौकार १२, षट्कार १

भारत क संघाकडून अंशुल कम्बोजने ६६ धावांत ५ फलंदाजांना बाद केले. विजयकुमार विशाक व मयंक मार्कंडेने प्रत्येकी १ बळी टिपला.

(वृत्तसंस्था)

## प्रथम सिंग, तिलक वर्माची शतके

### दुलिप करंडक क्रिकेट

### भारत ड संघाला ४२६ धावांची गरज

**अनंतपूर, १४ सप्टेंबर**

येथे सुरु असलेल्या दुलिप करंडक क्रिकेट स्पर्धेतील दुसऱ्या फेरीच्या साखळी सामन्यात प्रथम सिंग (११२) व तिलक वर्माने (१११) झळकावलेल्या शतकांच्या बळावर भारत अ संघाने भारत ड संघाविरुद्ध तिसऱ्या दिवशी ३ बाद ३८० धावा काढून आपला दुसरा डाव घोषित केला आणि प्रतिस्पर्धी भारत ड संघासमोर विजयासाठी ४८८ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. दिवस अखेर भारत ड संघाने १९ षटकांत १ बाद ६२ धावा काढल्या. खेळ थांबला तेव्हा सलामीवीर यश दुबे १५ धावांवर, तर रिकी भुई ४४ धावांवर खेळत होते.



प्रथम सिंग (११२) व तिलक वर्मा (१११)

उद्या सामन्याचा शेवटचा दिवस असून भारत ड संघाला विजयासाठी आणखी ४२६ धावा काढण्याची गरज आहे. भारत अ संघाला विजय मिळवण्यासाठी उर्वरित नऊ गडी झटपट बाद करणे आवश्यक आहे.

मयंक अग्रवालच्या नेतृत्वाखालील भारत अ संघाने पहिल्या डावात केलेल्या २९० धावांच्या प्रत्युत्तरात श्रेयस अय्यरच्या भारत ड संघाला १८३ धावाच काढता आल्या.

भारत अ संघाने १ बाद ११५ धावांवरून पुढे तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. चहापानाच्या वेळी ९८ षटकांत ३ बाद ३८० धावा झाल्या असताना भारत अ संघाने आपला दुसरा डाव घोषित केला. त्यावेळी तिलक वर्मा १११ धावांवर, तर रावत ६४ धावांवर खेळत होता.

४८८ धावांचे आव्हान स्विकारून भारत ड संघाची सलामी जोडी मैदानावर आली, परंतु सलामीवीर यश दुबेचा सह कारी अथर्व तायडे शून्यावर बाद झाला. खेळ थांबला तेव्हा यश दुबे नाबाद १५ धावांवर, तर रिकी भुई नाबाद ४४ धावांवर खेळत होते.

(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




# कलेची किंमत पैशांपेक्षा कित्येक पटीने अधिक

## सिने कलावंत सुबोध भावे : जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**
कला पैशात मोजता येत नाही. बिदगीच्या पलीकडे कला आहे. कलेची किंमत पैशांपेक्षा किती पटीने अधिक आहे, असे प्रतिपादन सिने कलावंत सुबोध भावे यांनी केले. जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेचे उद्घाटन शुक्रवारी सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिरात पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांच्या हस्ते झाले.

प्रारंभी दीप प्रज्वलन आणि श्री गणेश पूजन करुन व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले. व्याख्यानमालेचे यंदाचे ४८ वे वर्ष आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे होते. याप्रसंगी व्यासपीठावर मुलाखतकार मंजुषा गाडगीळ, बँकेचे संचालक माजी अध्यक्ष वरदराज बंग, तज्ञ संचालक अॅड. प्रदीपसिंग राजपूत, संचालिका चंद्रिका चौहान, संचालक पुरूषोत्तम उडता, जगदिश भुतडा, मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार, उपाध्यक्षा प्रीती चव्हाण उपस्थित होते.

पोलीस आयुक्त एम. राज कुमार म्हणाले, जनता बँकेसारख्या व्याख्यानमालेतून समाज प्रबोधन घडते. कर्णकर्कश डॉल्बी, लेझर शोपेक्षा व्याख्यानमालांतून समाजाला चांगली शिकवण देण्याची अधिक गरज आहे. चांगले विचार असल्यामुळेच जीवनात बदल घडतो. बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे म्हणाले, सोलापूर जनता सहकारी बँकेने अर्थकारणासोबतच आजवर सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात योगदान दिले आहे. समाजातील विविध घटकांना उत्तम सेवा देण्याचे कार्य सोलापूर जनता सहकारी बँकेकडून सातत्याने करण्यात येत आहे. मुलाखती दरम्यान सिने कलावंत सुबोध भावे म्हणाले, छत्रपती श्री शिवाजी महाराजांची भूमिका करण्यासाठी भाग्य लागते. ते भाग्य मला मिळाले. त्यांच्या विचारांना, त्यांच्या चरणांना स्पर्श करता आला ही माझ्या आयुष्यातील खूप महत्त्वाची घटना आहे. बालगंधर्व आणि जुन्या पिढीतील अनेक दिग्गजांनी सर्वस्वाचा त्याग करून कला मोठी केली. त्याची फळे आताच्या पिढीला मिळत आहेत. यावेळी सुबोध भावे यांनी कट्यार काळजात घुसली, काशिनाथ घाणेकर अशा अनेक भूमिकांचे अनुभव सांगितले. माझ्या अभिनयाच्या प्रवासातील पहिलं मोठं नाटक सोलापूरच्या शिरीष देखणे यांनी लिहिले होते. त्या नाटकाला तृतीय बक्षीस मिळाले असा अनुभव अभिनेते सुबोध भावे यांनी सांगताच प्रेक्षकांनी प्रचंड टाळ्यांचा गजर करीत त्यांचा गौरव केला. जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार यांनी प्रास्ताविक केले. संजोगीता चौधरी यांनी सूत्रसंचालन तर संपदा पानसे यांनी आभार प्रदर्शन केले.

# सेंट थॉमस शाळेत शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**
डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन म्हणून सेंट थॉमस प्रशालेमध्ये 'गाईडिंग स्टार्स' कार्यक्रमाचे आयोजन केले.

या कार्यक्रमात इयत्ता दहावीचे विद्यार्थी शिक्षक बनून एक दिवस शाळा चालवली. या कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश होता, ज्यात शिक्षकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांनी नृत्य नाटीका आणि मोहक वाद्यवृंद सादर केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून फादर पॉल उपस्थित होते. हा कार्यक्रम शाळेचे प्राचार्य फादर रॉबिन यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे शिक्षक सुमित कोळे आणि सुहिता दुधगीकर यांनी आयोजित केला.



# स्वातंत्र्यसैनिक तुळसीदास जाधव यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ सप्टेंबर-**
सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्य सैनिक स्व.तुळसीदास जाधव यांच्या पुण्यतिथीनिमित्त मेकॅनिक चौक येथील स्व. तुळशीदास जाधव यांच्या पुतळ्यास विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी नितीन साके,जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.

# पाटील अभियांत्रिकीमध्ये तंत्रज्ञानावर धडे

## ● कार्यशाळेत विविध महाविद्यालयांतील ४० प्राध्यापकांचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**
शिक्षक जर ज्ञानानी संपन्न असेल तर आपोआपच त्यांच्या हातून घडणारा विद्यार्थी हा सर्व गुण संपन्न असतो या उद्दिष्टांचा विचार करून शिक्षकांना स्थापत्य व यांत्रिकी अभियांत्रिकी मधील नवीन संगणक प्रणाली, बिल्डिंग इन्फॉर्मेशन, मॉडलिंग या विषयात पारंगत करण्यासाठी एक आठवड्याची प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. यात जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ४० प्राध्यापक सहभागी झाले होते.

स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या वतीने व टेड मंत्रा ऑटोडेस्क लर्निंग पार्टनर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन एन्व्हायरो कन्सल्टंटचे प्रमुख इंजिनीयर गोकुळ चितारी व इंजिनियर आशुतोष पाटील यांनी केले. शिक्षकांनी संगणकीय विषयाचे ज्ञान वाढवावे व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांनी करावा, नवीन शोध लावणे तंत्रज्ञानाचा वापर करून रोजच्या जीवनातील समस्या सोडविणे व क्रिटिकल थिंकिंग वाढवण्यासाठी करावा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी केले.

बी.आय.एम. या तंत्रज्ञानाची माहिती करून घ्यावी व त्याचा वापर स्थापत्य व यांत्रिकी विद्यार्थ्यांनी एम.ई.पी. मॉडलिंगसाठी केला. तर उद्योग क्षेत्रात लागणारी कुशल कारागिराची कमतरता सहज भरून निघेल व इंजिनियर्स भेडसावणारी रोजगाराची समस्या ही सुटेल, असे मत टेक मंत्राचे प्रमुख रेवणकर यांनी केली. प्राध्यापकांनी उद्योगाला चालना देणारे व व्यवसायाला उपयोगी पडणारे कुशल विद्यार्थी घडविण्याचा प्रयत्न करावा. संस्था प्रमुखांनी अशा कार्यशाळा घेण्यास प्रोत्साहन दिल्यास प्रगत भारताचे स्वप्न लवकरच उतरेल असे प्रतिपादन इंजिनियर चितारी यांनी केले. आर्किटेक्चर, स्ट्रक्चरल आणि एम.इ.पी. या ऑटोकॅड, रेव्हीट नेव्हीस वर्क या संगणकीय प्रणालीचा वापर करून प्रत्यक्ष संगणकावर प्रशिक्षण देण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. कल्याणी मामडयाल यांनी केले. प्रा. प्रशांत स्वामी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा.तृप्ती मसलेकर, प्रा. अनिल लिगाडे, प्रा. श्रीशैल बिराजदार, प्रा.विवेक भोगडे, प्रा. प्रवीण हेडगिरे, प्रा. रुकैया आडते, सोनाली दुधी व शुभम कानडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव एस. ए. पाटील, विश्वस्त शिवानंद पाटील आणि डॉ. एम. ए. चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.

# पैगंबर जयंतीनिमित्त सोमवारी विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**
जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी जुलूस कमिटी सोलापूरच्या वतीने पैगंबर जयंतीनिमित्त सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष हाजी एम.डी. शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कमिटीच्या वतीने सोलापूर शहरात सोमवारी जुलूस न काढता विविध कार्यक्रमाने पैगंबर जयंती मोठ्या उत्साही वातावरणात साजरी करण्यात येणार आहे. या निमित्ताने सोमवारी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत विजापूर वेस येथील डॉ. जाकीर हुसेन चौक येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावेळी मुस्लिम समाजातील धर्मगुरूंचे प्रवचन होणार आहे. त्याचबरोबर




सर्व धर्मीय धर्मगुरूंचा सन्मान समारंभ होणार आहे. महाप्रसादाचे वाटपही करण्यात येणार आहे.

प्रत्येक मोहल्ल्यात आकर्षक सजावट, मोहल्ला सजावट, रक्तदान शिबिर असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उत्सव अध्यक्ष रसूल पठाण यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत जाकीर नाईकवाडी, वाहिद बिजापुरे, मुस्ताक लालकोट, असीम तुळजापुरे आदी उपस्थित होते.



# अभियांत्रिकी दिनानिमित्त ६८ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**
एन.के. ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियांत्रिकी दिनानिमित्त, सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबिरात ६८ रक्त बाटल्यांचे संकलन करण्यात आले.

ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे घेतल्या गेलेल्या या रक्तदान शिबिरामध्ये तरुणाईने दिलेला प्रतिसाद, हे ऑर्किडच्या सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या संस्कृतिचे द्योतक असल्याचे दिसून येते. शिबीराचे उदघाटन प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे उपप्राचार्य डॉ. एस. एस. मेतन, डॉ. व्ही. के. पत्की व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. दरवर्षी दोन वेळा असे सलग तेरा वर्षे ऑर्किड अभियांत्रिकीमध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत होते. रक्त संकलनासाठी अश्विनी हॉस्पिटल, दमाणी, सिव्हील व हेडगेवार या रक्तपिढ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. शिबिराच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. एस. बकरे, प्रा. कदीर शेख तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सचिव जैद पठाण, कौशिक तिजारे, सानिया शेख, संदेश गाळेकर, बेगम अत्तार आदी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला.

# लायन्स क्लब क्लासिक, बालभारती विद्यालयाचे आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**
लायन्स क्लब ऑफ सोलापूर क्लासिक व बालभारती विद्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला.

लायन शब्बीर शेख, सहाय्यक पोलिस आयुक्त सुधीर खिरडकर, शिक्षण विस्तार अधिकारी रतिलाल भुसे, त्वचारोग तज्ञश्रुती मठ, लायन नंदिनी जाधव, लायन आसिफ इक्बाल, शाळेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अख्तरबानो शेख, लायन जुबेर शेख, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, महाराष्ट्र पोलीस आसिफ तारानाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत वितरण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मेळकुंदे यांनी केले. रिजवान शेख यांनी आभार मानले.



**पुरस्कार्थी असे :** इरफान लालसंगी (पोलीस ट्रेनिंग कॅम्प शेगाव), उजमा परवीन कलबुर्गी (लिटल फ्लॉवर), जस्मिन अश्फाक शेख (बालभारती विद्यालय), फरहीन मकबूल मुल्ला (जि प प्राथमिक शाळा), सालेहा बानो रियाज अहमद शेख (दि प्रोग्रेसिव उर्दू हायस्कूल), लुबना इब्राहिम शहापुरे (एम ए पानगल अँग्लो उर्दू), शबाना मेहबूब नदाफ (जि प उर्दू स्कूल विडी घरकुल), आफरीन सोहेल दिंडोरे (एम एन पी बॉईज उर्दू स्कूल), रंजना माणिक काटकर (जि प स्कूल), नसरीन बानू ताजुद्दीन माशाळकर (एम एन पी मुलींची शाळा), डॉ. आयेशा रंगरेज (कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन), तैसिन पीरअहमद सय्यद (धर्मन्ना सादूल प्रशाला), अझरोद्दीन युनूस शेख (बालभारती प्राथमिक विद्यालय), अभिनंदन विभुते (महावीर हायस्कूल), खाजा मैनुद्दीन अलीशेर जेटपूल (वस्तानवी उर्दू जूनियर कॉलेज), सागर लोंढे (प्रणिती शिंदे प्रशाला सोलापूर).

# बनावट शासन निर्णय तयार करून शासनालाच फसवले

## विजापूर नाका पोलिसात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**
उत्तर कसबा परिसरातील काळी मशिदीजवळील इंदिरा गांधी प्राथमिक विद्यालयात एकही विद्यार्थी नसल्याने शाळा बंद पडणार होती. शाळा बंद पडू नये, शासनाचा आर्थिक लाभ बंद होईल म्हणून पवन भालचंद्र बारगजे याने संस्था स्थलांतराची शक्कल लढविली. त्यासाठी त्याने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय बनावट तयार करून शिक्षण विभागाची फसवणूक केली.

याबाबत रजीन मनोज राऊळ (रा. जुने विडी घरकुल) यांच्या फिर्यादीवरून बारगजेविरुद्ध विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. संशयित आरोपी बारगजे याची स्थलांतरित झालेली शाळा राजस्व नगराजवळील आदित्य नगरातील पत्त्यावर आहे. तत्पूर्वी, बारगजे याची संस्था अनुदानित असून सध्या त्या शाळेत एकही विद्यार्थी नाही. आपली शाळा विद्यार्थ्यांअभावी बंद पडल्यास शासनाकडून मिळणारा आर्थिक लाभ बंद होईल म्हणून त्याने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा एक निर्णय बनावट जोडून त्यावर २८ फेब्रुवारी २०१४ मधील जावक क्रमांक नमूद करून पुणे शिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर केला. त्यानंतर शिक्षण उपसंचालक कार्यालयातून बारगजे याच्या संस्थेच्या स्थलांतरास परवानगी मिळाली आणि त्यानुसार महापालिका शिक्षण मडळास आदेश दिले. त्यानुसार महापालिका शिक्षण मंडळाने संस्थेचे स्थलांतर झाल्याचे प्रमाणपत्र दिले. पण, ही बाब प्रशासनाच्या लक्षात आल्यानंतर राऊळ यांनी विजापूर नाका पोलिसांत फिर्याद दिली. बनावट शासन निर्णय तयार करून बारगजे याने शिक्षण विभागाची व महाराष्ट्र शासनाची फसवणूक झाल्याचे फिर्यादीने पोलिसांना सांगितले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक दादासाहेब गायकवाड तपास करीत आहेत.

# रेल्वे सुरक्षा बलाच्यावतीने श्वान प्रतियोगिता

## ● प्रशिक्षित श्वानांनी स्पर्धेत केले उत्कृष्ट संचलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**
मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात रेल्वे सुरक्षा बलाच्या वतीने १२ आणि १३ सप्टेंबर रोजी अंतर विभागीय श्वान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यास्पर्धेत मध्य रेल्वेच्या सोलापूर, मुंबई, भुसावळ, पुणे आणि नागपूर या पाच विभागांतील प्रत्येकी दोन श्वानांनी सहभाग घेतला.

सोलापूर विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत तीन प्रकारांच्या स्पर्धांचा समावेश होता, त्यामध्ये ट्रॅकर, एक्स्प्लोसिव्ह आणि नार्कोटिक्स या प्रकारांचा समावेश होता. या स्पर्धेतील निकालात ट्रॅकर आणि एक्स्प्लोसिव्ह प्रकारांमध्ये नागपूर रेल्वे विभागातील 'रॅव' आणि 'रिओ' या श्वानांनी ४०० गुणांपैकी अनुक्रमे ३१० आणि ३७१ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. मुंबई रेल्वे विभागातील 'सिम्बा' या श्वानाने नार्कोटिक्स प्रकारात ४२५ गुणांपैकी ३९३ गुण मिळवून प्रथम क्रमांक



पटकावला.

दरम्यान ट्रॅकर आणि एक्स्प्लोसिव्ह प्रकारांमध्ये मुंबई रेल्वे विभागातील 'हॅप्पी' आणि 'जिमी' या श्वानांनी ४०० गुणांपैकी अनुक्रमे ३०१ आणि ३४८ गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळवला. नागपूर विभागातील 'प्रिन्स' या श्वानाने नार्कोटिक्स प्रकारात ४२५ गुणांपैकी २८२ गुण मिळवून दुसरा क्रमांक पटकावला. सदरच्या स्पर्धेत बेल्जियम शेफर्ड या प्रजातीचा श्वान मुख्य आकर्षण ठरला. याशिवाय डॉबरमॅन आणि लॅब्राडोर अशा प्रजातींचा देखील सहभाग होता.

# भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया

## अभियांत्रिकी क्षेत्रात असाधारण योगदान

दरवर्षी १५ सप्टेंबर हा भारतात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक, हा दिवस भारताचे महान अभियंता आणि भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचा वाढदिवस आहे. ते भारतातील महान अभियंत्यांपैकी एक होते. त्यांनी आधुनिक भारताची निर्मिती केली आणि देशाला नवे रूप दिले. त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात असाधारण योगदान दिले आहे, जे कोणीही विसरू शकत नाही. देशभरात बांधलेल्या अनेक नद्यांची धरणे आणि पूल यशस्वी करण्यात विश्वेश्वरय्या यांचा मोठा हात आहे. त्याच्यामुळे देशातील पाण्याचा प्रश्न सुटला. आम्हाला त्यांच्याबद्दल सर्वकाही तसेच अभियंता दिनाचा उत्सव कधी सुरू झाला ते जाणून घेऊ या.

**अभियंता दिनाचा इतिहास**

भारत सरकारने १९६८ मध्ये डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जन्मतारखेला 'अभियंता दिन' म्हणून घोषित केले. तेव्हापासून दरवर्षी १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन साजरा केला जातो. वास्तविक, विश्वेश्वरय्या यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६० रोजी म्हैसूर (कर्नाटक) च्या कोलार जिल्ह्यात झाला.

अभियंता म्हणून डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी देशात अनेक धरणे बांधली आहेत, ज्यात म्हैसूरमधील कृष्णराज सागर धरण, पुण्यातील खडकवासला जलाशय आणि ग्वाल्हेरमधील तिग्रा धरण यांचा समावेश आहे. एवढेच नाही तर हैदराबाद शहर बनवण्याचे संपूर्ण श्रेय डॉ विश्वेश्वरय्या यांना जाते. त्यांनी तेथे पूर संरक्षण प्रणालीची रचना केली, त्यानंतर ते संपूर्ण भारतात प्रसिद्ध झाले.

विशाखापट्टणम बंदराचे समुद्री कटाव होण्यापासून संरक्षण करण्यासाठी एक यंत्रणा विकसित करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. विश्वेश्वरय्या यांना आधुनिक म्हैसूर राज्याचे जनक असेही म्हटले गेले. त्यांनी म्हैसूर सरकारसोबत अनेक कारखाने आणि शैक्षणिक संस्था स्थापन केल्या होत्या, विशेषतः म्हैसूर साबण कारखाना, म्हैसूर लोह आणि स्टील कारखाना, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, म्हैसूर चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी महाविद्यालय.

अभियंता दिन केवळ भारतातच नव्हे तर इतर अनेक देशांमध्ये साजरा केला जातो. उदाहरणार्थ, १६ जून रोजी अर्जेंटिनामध्ये, ७ मे रोजी बांगलादेशात, १५ जून रोजी इटलीमध्ये, ५ डिसेंबर रोजी तुर्कीमध्ये, २४ फेब्रुवारीला इराणमध्ये, २० मार्च रोजी बेल्जियममध्ये आणि १४ सप्टेंबर रोजी रोमानियामध्ये अभियंता दिन म्हणून जातो. वास्तविक, हा दिवस जगभरातील अभियंत्यांना प्रोत्साहित करण्यासाठी साजरा केला जातो, जेणेकरून ते त्यांच्या कौशल्यांमुळे देश आणि जगाला प्रगतीच्या नवीन मार्गावर नेतील. आपण भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांची एक गोष्ट वाचायला हवीच. ती म्हणजे जेव्हा मोक्षगुंडम विश्वेश्वरैया हे एका ट्रेन मधून प्रवास करत होते आणि ते खाली झोपले असता त्यांना ट्रेनचा रुळामध्ये मध्ये बिघाड असल्याचे समजले. तो बिघाड पुढे म्हणजे एक ते दोन किमी वर होता त्यांचा एवढा गाढा अभ्यास, प्रॅक्टिस मुळे त्यांना हे समजले आणि कित्येक लोकांचे जीवन वाचले.

अश्या कर्तृत्वाने महान असलेल्या व्यक्तीची आज त्यांच्या जयंती दिवशी आपण आठवण करूयात आणि जसे स्वा. वीर सावरकर म्हणतात तसे, देव आणि देह यामध्या आपला देश लागतो आणि आपण देशासाठी काहीतरी देणं लागतो असे करूयात.



**- यश टोळे**
संरचना स्थापत्य अभियंता, पुणे




# कुचन प्रशालेत रोटरी क्लबतर्फे सायकलचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**
कुचन प्रशालेत रोटरी क्लब ऑफ सोलापूर आणि रोटरी क्लब ऑफ अकलूजच्या सीएसआर ग्रँटमधून रोटरी सायकल बँक योजनेतून इयत्ता १० वीच्या अंबिका गालपल्ली, श्रावणी गड्डम, साक्षी चौगुले, गौतमी कुरापाटी, अक्षरा गंधाल या गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे प्रेसिडेंट सुनिल माहेश्वरी, माजी प्रेसिडेंट राजगोपाल मिनियार, सचिव ब्रिजकुमार गोयदानी, रोटरी माजी प्रांतपाल जयेश पटेल, माजी प्रेसिडेंट डॉ. ज्योती चिडगुपकर, माजी सचिव विद्या मणुरे, रोटरी माजी प्रेसिडेंट धनश्री केळकर, संतोष कणेकर व सुनील डागा यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रथम मान्यवरांच्या शहस्ते श्री गणरायाची आरती करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुनील माहेश्वरी यांनी भूषविले. प्राचार्य युवराज मेटे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन रूपाली क्षीरसागर यांनी केले. माधुरी कुलकर्णी यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींची पूजा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष पवार यांच्या हस्ते पार पडली. याप्रसंगी तरूण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, प्रकाश जाधव, शाम गांगुडे, बसू कोळी आदी.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींची पूजा काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी नगरसेवक विनोद भोसले, प्रदेश प्रतिनिधी सी.ए. सुशील बंदपट्टे यांच्या हस्ते पार पडली. याप्रसंगी तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, शाहू सलगर आदी.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या श्रींची पूजा भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या हस्ते पार पडली. याप्रसंगी तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, सीईओ बी. श्रीनिवास, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, अक्षय कुलकर्णी.



सोलापूर : दै. तरुण भारतच्या श्रींची पूजा हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविघालयातील पर्यवेक्षक आणि शिक्षक श्री मोतीबने, कमळे, कुंभार, बनसोडे यांच्या हस्ते संपन्न झाली.



सोलापूर : दैनिक तरुण भारत श्रींच्या पूजेप्रसंगी सहाय्यक सरकारी वकील ॲड. सार्थक चिवरी.

# बाप्पाचा मार्ग सुकर

## ● महापालिकेकडून आता मिरवणूक मार्गांना मलमपट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १४ सप्टेंबर -**

गणेशोत्सवाची सांगता दृष्टीक्षेपात आली आहे. मंगळवार (दि.१७) सप्टेंबर रोजी लाडक्या गणपती बाप्पाचे विसर्जन शहरातील विविध कृत्रिम विसर्जन कुंडात होणार आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन तयारीला लागले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणूकी मार्गावर आता महापालिका प्रशासनाकडून डांबरीकरण करण्यात येत आहे. बाप्पांचे आगमन खड्डेमय रस्त्यातून झाले असताना, त्यांना निरोप देताना निदान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे चित्र दिसून येत आहे. मात्र लष्कर गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळ मिरवणूक मार्ग याला अपवाद ठरत आहे.



लष्कर गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या मिरवणूक मार्गांवर मात्र आहे, तशीच परिस्थिती कायम आहे. लष्कर मध्यवर्ती महामंडळातील सत्यनाम चौक ते कुंभार गल्ली ते मौलाली चौक परिसरातील रस्त्यांवर खड्डे कायम आहेत. या मार्गावरून छोट्या-मोठ्या अशा विविध गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणूका काढल्या जातात. सदरच्या मिरवणुकांमध्ये पारंपारिक लेझीम झांज नाशिक ढोल पथक तसेच नृत्यपथक आणि डॉल्बी यांचा समावेश असतो. मिरवणूक मार्गातील खड्डे कायम असल्यामुळे मिरवणुकीमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो. याकडे प्रशासनाचे डोळे झाक होत आहे. विसर्जन मिरवणूकीला आता केवळ दोन दिवसांचाच कालावधी शिल्लक असून महापालिका प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन रस्त्यांचे डांबरीकरण करून घ्यावे. तसेच शहरातील सर्व गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळाकडे महापालिका प्रशासनाने समान न्याय दिला पाहिजे. अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

दरम्यान सोलापूर शहरातील असंख्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून विसर्जन मिरवणूका काढल्या जातात. यामध्ये मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळ, संयुक्त लोकमान्य गणेशोत्सव महामंडळ, लष्कर गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळ, विडी घरकुल गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळ, पूर्व विभाग गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळ आदींचा समावेश होतो.

विविध गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या मिरवणूक मार्गा ह्या वेगवेगळ्या आहेत. त्यानुसार या प्रत्येक मार्गावर महापालिका प्रशासनाच्या वतीने डांबरीकरण करणे आवश्यक आहे. मात्र तसे होताना दिसत नाही. मिरवणूक काढतेवेळी खड्ड्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने दखल घेऊन सदरचे कामकाज सर्वच गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या मिरवणूक मार्गावर केले पाहिजे अशी भावना गणेशभक्त आणि मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे.



# हरिभाई देवकरण प्रशालेस डॉ. उदय निरगुडकर यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १४ सप्टेंबर -**

हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयास प्रख्यात व्याख्याते डॉ. उदय निरगुडकर यांनी सदिच्छा भेट दिली. प्राचार्या दीपा फाटक आणि प्रशालेचे जेष्ठ पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार, भानुदास बनसोडे, प्रा. धन्यकुमार बिराजदार, प्रा. सुमित गाडेकर, राघवेंद्र पिल्ले आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. उदय निरगुडकर यांनी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती जाणून घेतली. परिसर आणि ९२ वर्षाच्या प्रशस्त दगडी इमारतीचे कौतुक केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील होणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले.

# प्रबोधन मंचच्या वतीने वक्ता प्रशिक्षण शिबीर

## ● कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक जेष्ठ पत्रकार उदय निरगुडकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

आज रविवार १५ सप्टेंबर रोजी दुपारी ४.०० ते ६.०० वाजेपर्यंत कला निकेतन (ए.सी. हॉल) हरिभाई देवकरण प्रशाला या ठिकाणी प्रबोधन मंचच्यावतीने वक्ता प्रशिक्षण शिबीर घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक जेष्ठ पत्रकार उदय निरगुडकर हे असणार आहेत अशी माहिती जिल्हा प्रमुख विनायक बंकापुरे यांनी दिली आहे.

बंकापुरे म्हणाले की, सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना विविध विषयांमध्ये



आपण अनेकदा मांडणी करत असतो. ही मांडणी अभ्यास आणि ओघवत्या शैलीत असणे अत्यंत आवश्यक असते. वक्ता कसा असावा, त्याची मांडणी कशी असावी,मांडणीचे मुद्दे कसे असावेत याबाबतीत या शिबीरात प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणासाठी पूर्णवेळ उपस्थित रहावे अशी माहिती जिल्हा प्रमुख विनायक बंकापुरे यांनी दिली आहे.

## ● पोलिस आयुक्तांचा डबल धमाका

# सराईत गुन्हेगार जाधव व गायकवाड स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

शहरातील सराईत गुन्हेगार सोमनाथ जाधव व विकी गायकवाड या दोघांना पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी एमपीडीए कायद्यान्वये येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सलगर वस्ती पोलिस ठाण्याचे एक पथक दोघांनाही घेऊन येरवड्याकडे रवाना झाले आहे.

सोमनाथ बजरंग जाधव (वय २२, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ३, सोलापूर) आणि विकि दशरथ गायकवाड (वय २४, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ६, सोलापूर) अशी येरवड्यात स्थानबध्द करण्यात आलेल्या गुन्हेगारांची नावे आहेत.

सोमनाथ जाधव याच्यावर शहरातील सलगर वस्ती आणि सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हे दखल आहेत. तर विकिवर सलगर वस्ती व फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. सोमनाथ आणि विकि हे



दोघे मागील काही वर्षापासून सातत्याने घातक शस्त्राने जबरी चोरी करणे, घातक शस्त्राने गंभीर दुखापत करणे, धमकी देणे, सरकारी नोकरावर हल्ला करणे, गृहअतिक्रमण करणे, धाकदपाटा करणे, दगडफेक करणे, शस्त्रानिशी फिरून धमकी देणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे साथीदारांच्या मदतीने करतात.

सोमनाथविरुध्द गंभीर स्वरूपाचे ५ गुन्हे दाखल असून विकिविरुध्द ६ गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे नागरीकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली आहे. सोमनाथ याच्याविरुध्द सन २०२० मध्ये तडीपारी, सन २०२२ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. तर विकिविरुध्द सन २०१९ आणि २०२४ मध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तरी त्यांच्या गुन्हेगारी वर्तनात कोणताही बदल झालेला नाही. त्यामुळे या दोघांच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा बसवा म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्याकडून या दोघांनाही एमपीडीए कायद्यान्वये स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास आयुक्तांनी मंजूरी देत दोघांनाही स्थानबध्द करण्याचे आदेश दिले आहेत.

या कारवाईत पोलिस उपायुक्त विजय कबाडे, डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, यशवंत गवारी, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, उमाकांत शिंदे, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी सहभाग घेतला.

# विकसित भारत बनण्यासाठी शिक्षकांची भूमिका सैनिकांप्रमाणेच

## ● डॉ. शैलेंद्र देवळाणकर : जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळातर्फे बौद्धिक व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

विकसित भारत बनण्यासाठी शिक्षकांची भूमिका सैनिकांप्रमाणेच ठेवावी लागेल. पुढील २५ वर्षे दर्जेदार शिक्षणावर लक्ष केंद्रित करून काम केल्यास भारत जगभरात विकसित देशांच्या यादीत अग्रक्रमांकावर असेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले.

जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शनिवारी डॉ. देवळाणकर यांनी गुंफले. विकसित भारताचे उद्दिष्ट आणि शिक्षणाची भूमिका असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. व्याख्यानमालेचे यंदाचे ४८ वे वर्ष आहे.

प्रारंभी दीप प्रज्वलन आणि श्री गणेश पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, संचालक सी. ए. गिरीश बोरगांवकर, संचालिका चंद्रिका चौहान, संचालक राजेश पवार, जगदीश भुतडा, पुरूषोत्तम उडता, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य डॉ. अजितकुमार देशपांडे, जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मण सुतार आदी उपस्थित होते. डॉ. देवळाणकर म्हणाले, अमेरिका दर २० वर्षांनी राष्ट्रीय सुरक्षा धोरण लागते चीननेही २०१२ साली २०५० पर्यंतचे विकासाचे धोरण आखले. परंतु भारतात मात्र १९८६ आखले गेलेले शैक्षणिक धोरण आजवर अंमलात आणण्यात येत आहे. यामुळे होणारे दुष्परिणाम भारताच्या लक्षात आल्यामुळेच स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात भारताने पुढील



### ज्येष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर यांचे आज व्याख्यान

जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या बौद्धिक व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प जेष्ठ पत्रकार भाऊ तोरसेकर सायंकाळी ७ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात गुंफणार आहेत. कायदा, व्यवस्था आणि लोकशाही असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. या व्याख्यानास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळांने केले आहे.

२५ वर्षांचे धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे. यातील मोठा भाग म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे. हे धोरण भारताच्या पुढील शेकडो वर्षांच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे आहे. १४२ कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात तब्बल ७४ कोटी नागरिकांचे सरासरी वय ३७ आहे. तरुण लोकसंख्या ही भारतासाठी प्रचंड मोठी ताकद आहे. आणि पुढील ८० वर्षे ही स्थिती कायम राहणार आहे. परंतु या लोकसंख्येमध्ये शैक्षणिक धोरण राबवून किमान कौशल्य अंतर्भूत केल्याशिवाय ही लोकसंख्या कुशल बनणार नाही.

तरुणांना मिळणारे शिक्षण आणि बाजारातील मागणी यातील असलेली प्रचंड तफावत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे संपुष्टात येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची काटेकोर अंमलबजावणी झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून जगात कोणीही रोखू शकणार नाही, असेही डॉ. देवळाणकर यांनी सांगितले. योगीनाथ बिराजदार यांनी सूत्रसंचालन तर सुमित श्रोत्री यांनी आभार प्रदर्शन केले.



परांडा : राष्ट्रकुल संसदीय मंडळा मार्फत विधानपरिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार राष्ट्रपती श्रीमती द्रौपदीजी मुर्मु यांच्या हस्ते मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते परंडा येथे मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण कार्यक्रमात भाजपाचे माजी आमदार सुजितसिंग ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी धाराशिवचे पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत तसेच मान्यवर लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

# एल्ग्रीस सोलारतर्फे गणेशोत्सवानिमित्त ऑफर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

सौर ऊर्जा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणारी सोलापूरची एल्ग्रिस सोलार पॉवर सिस्टीम या क्षेत्रात भरीव योगदान देत असून एल्ग्रिस सोलारच्या दर्जेदार सिस्टिम्स आणि सर्व्हिसेसमुळे हजारों ग्राहकांचे लाईट बिल शून्यावर आले आहे.

गणेशोत्सवनिमित्त एल्ग्रीस सोलरतर्फे बिग गणेशोत्सव सेल १ पे ४ ही ऑफर जाहीर करण्यात आली आहे. या ऑफर अंतर्गत सोलर सिस्टम खरेदीवर तब्बल २० हजार रुपयांपर्यंत कॅशबॅक मिळणार असून एक्सक्ल्युझिव्ह २ वर्षांची सिस्टम वारंटी मिळणार आहे. याबरोबरच रुपये १९९९ किमतीचे हमखास गिफ्ट देण्यात येणार आहे. इतकेच नाही तर ३ वर्षांची एएमसी देखील मोफत देण्यात येणार आहे. केवळ रुपये ९९९ डाऊन पेमेंट भरून आपण सोलर सिस्टमचे मालक होऊ शकता आणि पुढील ३० वर्षे वीज बिल मुक्त होऊ शकता. विशेष म्हणजे या कर्जावर आकारले जाणारे प्रभावी व्याज दर होम लोनच्या व्याज दरापेक्षा कमी आहे. साधारण १-२ दिवसांत कर्ज मंजूर केले जाते. एकदा कर्ज मंजूर होऊन सोलर सिस्टम बसल्यावर या सोलर सिस्टम मधुन जनरेट होणारी सोलार वीज ग्राहकाला केवळ रु. २.९९ या अत्यल्प दरात मिळणार आहे. तरी इच्छुक ग्राहकांनी एल्ग्रीस सोलरशी ०२०७१५३ ००२७ वर संपर्क साधावा.

ELGRIS SOLAR SYSTEMS
DIV. OF N.R.DHOOT GROUP

१. डाऊन पेमेंट : रु.९९९/-
२.होम लोनपेक्षा ही कमी व्याज दर : ३.९९%
३. ईएमआयः ३९ रु.प्रती दिवस
४. सबसिडी : रु. ७८ हजार
५.वीज दरः रु.२.९९ प्रती युनिट







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सागर चंकेश्वरांचा पंचमेरु उपवास पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

दिगंबर जैन समाजाच्या पयुषण पर्वच्या पावन कालावधीत सागर सुकुमार चंकेश्वरा यांनी पंचमेरुचे पाच उपवास पूर्ण केले. दिगंबर जैन समाजाच्या पयुषण पर्वच्या पावन-भाद्रपद शुध्द् पंचमी ते भाद्रपद शुद्ध चतुर्दशी या कालावधीत प. पू. मुनिश्री १०८ सौम्य सागरजी महाराज, प.पू.मुनिश्री १०८ सारस्वत सागरजी महाराज व प. पू. मुनिश्री १०८ जयंतसागर महाराज यांच्या मंगल सानिध्यात सागर सुकुमार चंकेश्वरा यांनी पंचमेरुचे पाच उपवास पूर्ण केले. त्यानिमित्ताने १८, कल्पतरु, सिध्दजीन हौसिंग सोसायटी, मुरारजी पेठ येथे बुधवार दि. ११ व गुरुवार दि.१२ सप्टेंबर रोजी भजन व गाण्याचा कार्यक्रम पार पाडला. या भजन व गाण्याच्या कार्यक्रमास जैन समाज बांधवांनी उपस्थिती दर्शवून धर्मप्रभावना केली.



सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे कोअर कमिटी सदस्य तथा ज्येष्ठ संचालक सुकुमार चंकेश्वरा यांचे सागर चंकेश्वरा हे चिरंजीव आहेत. सागर यांनी पंचम रुचे पाच उपवास पूर्ण केले त्याबद्दल समाजामध्ये व व्यापारी, मित्र परिवारात यांचे कौतुक होत आहे.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

लग्नाचे आमिष दाखवून महाविद्यालयीन तरूणीवर जबरदस्तीने अत्याचार करणाऱ्या कर्नाटकातील तरूणाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत तरूणीच्या फिर्यादीवरुन अंकित देसिंग राठोड (वय २५, रा. लिंबाळ रेल्वे स्टेशनच्या पाठीमागे, विजापूर, कर्नाटक) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत तरूणी ही सन २०२३ मध्ये शहरातील एका कॉलेजमध्ये शिक्षण घेत होती. त्यावेळी तिच्यासोबत अंकित राठोड हादेखील शिक्षण घेत होता. या दोघांची ओळख झाल्यानंतर मोबाईलवर त्यांचे बोलणे, चॅटींग, मेसेजींग सुरु झाले. पिडीतेला तिच्या वाढदिवसादिवशी गिफ्ट द्यायचे आहे, त्याच्या घरचे लोकदेखील येणार असल्याचे सांगून अंकितने पिडीतेला शहरातील एस टी स्टॅन्ड परिसरातील एका लॉजजवळ बोलावले. त्यानंतर अंकितने पिडीतेला लॉजच्या रुममध्ये नेऊन आपण लग्न करणार आहोत असे सांगून तिच्याशी जबरदस्तीने शरीरीसंबंध केले. यावेळी अंकितने मोबाईलमध्ये व्हिडीओदेखील काढले. त्यानंतर अंकितने हे व्हिडीओ दाखवून तिचे लग्नदेखील मोडले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक विकास देशमुख पुढील तपास करीत आहेत.

### पैसे, सोन्यासाठी विवाहितेला मुलांसह हाकलून दिले

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

पैसे व सोन्यासाठी विवाहितेला मुलांसह माहेरी हाकलून देऊन छळ केल्याप्रकरणी पतीसह पाचजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत वाजीया जैद पिरजादे (वय २३, रा. कुमठा नाका, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती जैद साजिद पिरजादे, अफसाना साजिद पिरजादे, साजिद अमिनुद्दीन पिरजादे, मजीद साजिद पिरजादे, तेहसिन मोबीन शेख (सर्व रा. नई जिंदगी, शोभादेवी नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १० जून २०२० ते २० मे २०२४ या कालावधीत वाजीया या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती जैद व इतरांनी लग्नात वाजीया यांच्या वडीलांनी ब्रॅन्डेट वस्तु दिल्या नाहीत, त्याचप्रमाणे जीम टाकण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये आणावेत, लग्नात वाजीयाच्या वडीलांनी घातलेले सात तोळे सोन्याचे दागिने पतीस दिलेले नाहीत म्हणून वाजीया हिस मारहाण करून तिचा छळ करून दोन छोट्या मुलांसह माहेरी हाकलून दिले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.

### शेतात काम करताना साप चावल्याने महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

उत्तर सोलापूर येथील एकरुख येथे शेतात काम करत असताना साप चावल्याने एका महिलेचा मृत्यू झाला. वंदना तानाजी उडणशिवे (वय ४५, रा. एकरुख, ता. उत्तर सोलापूर) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. १४ सप्टेंबर २०२४ रोजी अकरा वाजण्याच्या सुमारास वंदना उडाणशिवे या शेतात काम करत असताना उजव्या पायात साप चावल्याने त्यांना पती तानाजी उडणशिवे यांनी उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालय दाखल केले असता त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबाबत सिव्हिल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### तलाखची नोटीस पोस्टाने पाठविणाऱ्याविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**

तलाखची नोटीस पोस्टाने पाठविणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नसीम समीर पठाण (वय ४८, रा. प्लॉट नं. ५३, शिवगंगा नगर भाग ३, मजरेवाडी, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन समीर महिबुब पठाण (रा. सिध्देश्वर पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नसीम पठाण यांचा पती समीर पठाण याने ऑगस्ट २०२२ मध्ये नसीम यांना पहिली व ऑक्टोबर २०२२ मध्ये दुसरी बेकायदेशीररीत्या तलाख नोटीस दिल्याची छायांकित प्रत पोस्टाने नसीम यांच्या घराच्या पत्त्यावर पाठवून दिली. म्हणून नसीम यांच्या फिर्यादीवरुन मुस्लीम महिला (विवाह अधिकार संरक्षण) अधिनियम २०१९ चे कलम ३,४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

# भू-माफियांना मदतीचा हेतू अधिकाऱ्यांना भोवला

● पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचा दणका: पोलीस दलात खळबळ

● सलगर वस्ती पोलिस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक गोविंद पवार निलंबित

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**



भू-माफियांना मदत करण्याचा पोलिस अधिकाऱ्यांचा हेतू अधिकाऱ्याला चांगलाच भोवला आहे. शहरातील सलरवस्ती पोलीस ठाण्यात नेमणुकीस असलेले गोविंद युवराज पवार यांनी जागा बळकावणाऱ्या आरोपींना मदत करीत वरिष्ठांच्या आदेशाकडे दुर्लक्ष व वरिष्ठांची दिशाभूल केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी त्यांना निलंबित केले आहे.



पोलीस आयुक्त एम.राजकुमार

या कारवाईमुळे कामात ढिलाई व दुर्लक्षपणा करणाऱ्या पोलिसांत खळबळ उडाली आहे. सोलापूर शहरातील नेहरु नगर येथील सदानंद नगर मधील गाळा नं. ३० व गट नं. ३० यापैकी प्लॉट क्र. १७ व १८ या जागेवर बेकायदेशीरपणे बोर्ड लावून जागा बळकावण्याचा प्रयत्न होत असल्याची तक्रार गुलबर्गा येथील रहिवासी अब्दुल अजिज अब्दुल कादर शेख यांनी पोलीस आयुक्तालयात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीचे चौकशी सहायक पोलीस आयुक्त गुन्हे यांच्याकडे देण्यात आली होती. त्याप्रमाणे अर्जदार यांची चौकशी करुन त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांची पाहणी करुन प्रत्यक्षात जागेवर जाऊन पाहणी केली होती. त्यावेळी अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारीतील आदित्य महादेव गायकवाड यांनी पत्रा शेड मारुन अतिक्रमण केल्याचे दिसून आले होते.

याची अधिक चौकशी केली असता याच प्रकरणाची सलगर वस्ती पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पवार यांनी चौकशी केली असल्याचे सांगितले होते. त्यानंतर सहायक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी आदित्य महादेव गायकवाड, संतोष शंकर गायकवाड, शंकर संजय गायकवाड, विजय जाधव यांच्याविरुध्द तक्रार असलेला जबाब नोंदवला होता. सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी याबाबत योग्य मार्गदर्शन केले होते. तरीही दोघा जणांची नावे वगळून सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पोलीस उपायुक्त यांनीदेखील १२ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्याची पोलीस उपनिरीक्षक पवार यांना परवानगी दिली होती. तरीही त्यांनी गुन्हा दाखल केला नाही. त्याचबरोबर सहाय्यक पोलीस आयुक्त यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. चौघांवर गुन्हा दाखल करण्याची सुचना देऊनही त्यांचा आदेश पाळला नाही. यावरुन त्यांची सचोटी संशयास्पद दिसून येते. गुन्ह्यातील आरोपी पक्षास सहकार्य करण्याचा हेतू स्पष्टपणे दिसून येतो, असे म्हणत पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी पवार यांना निलंबित केले आहे. या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

### भू-माफियांविरोधात पोलिस आयुक्तांची धडक मोहिम...

गेल्या काही दिवसांमध्ये शहरात भू-माफियांनी जागा बळकावल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. याबाबत मूळ जागामालकांकडून पोलिस विभाग, महसुल विभाग, पालिका यांच्याकडे तक्रारी केलेल्या आहेत. परंतु, त्यांच्या तक्रारींकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे भू-माफियांचे चांगलेच फावले जात आहे. परंतु, पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी या भू-माफियांविरोधात कठोर भूमिका घेत पोलिस आयुक्तालयामध्ये त्यांच्या नेतृत्वात एका पथकाची निर्मीती केली आहे. ज्यांच्या जागांवर बळजबरीने कब्जा करून अतिक्रमण करण्यात आलेले आहे, अशां जागामालकांच्या तक्रारी अर्जाची चौकशी करून अतिक्रमण करणाऱ्यांवर कायदेशीर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने भू-माफियांचे धाबे दणाणले आहे.

# बाळे येथील खंडोबा देवस्थानची ६७ लाखांची फसवणूक

● बेकायदेशीर अध्यक्ष व सेक्रेटरीविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर -**







बाळे येथील खंडोबा देवस्थानची ६६ लाख ७६ हजार ६५ रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी देवस्थानचे बोगस अध्यक्ष सेक्रेटरीविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यता आला आहे.

याबाबत सिद्राम रघुनाथ पुजारी (वय ५८, रा. मारूती गल्ली, बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन श्री खंडोबा देवस्थानचे बेकायदेशीर अध्यक्ष विनय विजय ढेपे व सेक्रेटरी सागर चंद्रकांत पुजारी (रा. बाळे, सोलापूर) या दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बाळे येथील श्री खंडोबा देवस्थानमधील ट्रस्टींमध्ये वाद आहे. डिसेंबर २०२० ते ११ एप्रिल २०२३ या कालावधीत श्री खंडोबा देवस्थानच्या ट्रस्टच्या अध्यक्ष व सेक्रेटरी पदावर नसताना बेकायदेशीरपणे विनय ढेपे यांनी अध्यक्ष व सागर पुजारी यांनी सेक्रेटरी असल्याचे भासविले. ढेपे व पुजारी यांना अधिकार नसतानाही देवस्थानकरीता जागा घेण्यास व्यवहार करून खरेदी दस्त क्र. ५५७/२३ दि. ३१ जानेवारी २०२३ अन्वये खरेदी दस्त करून बाळे येथील जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बँक खात्यातून ६६ लाख ७६ हजार ६५ रुपयांचा खर्च लिहून देणार व स्टॅम्प ड्यूटीकरीता खर्च करून आणखी रकमेचा चेक लिहून देणार यांना दिला. ही बाब उघडकीस आल्यानंतर यामध्ये फसवणुक झाल्याची तक्रार सिद्राम पुजारी यांनी केली असून याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

# सिव्हीलमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प उभारणार

● सूद चॅरिटी फाऊंडेशनचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

सूद चॅरिटी फाऊंडेशनच्या वतीने सोलापुरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात ४० लाख रुपये खर्चून सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे, अशी माहिती सोनू सूद चॅरिटी क्लब सोलापूरचे संस्थापक विपुल मिरजकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रसिद्ध अभिनेते सोनू सूद यांच्या नेतृत्वाखाली या फाऊंडेशनच्या वतीने सार्वजनिक आरोग्य सुविधा देण्याचे कार्य करण्यात येत आहे. याच अंतर्गत फाऊंडेशनने सोलापुरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन केले आहे. या संदर्भातली सर्व परवानगी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. लवकरच या कामाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या रुग्णालयात वैद्यकीय



सेवेसाठी अखंडितपणे वीज पुरवठा आवश्यक आहे. त्यासाठी हा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. यामुळे पारंपरिक ऊर्जा स्तोत्रावर अवलंबित्व कमी होईल. वीज बिलाच्या खर्चात लक्षणीय बचत होणार आहे. त्याचबरोबर पर्यावरण संवर्धन होणार आहे. या ठिकाणी १३० किलो वॅटचा हा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

यामुळे साधारणतः येथील नियमित वीज बिलात ३० ते ४० टक्के बचत होणार आहे, असे विपुल मिरजकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस आनंद पवार, शरणाप्पा फुलारी, अनुराधा काबरा, भास्कर नडिमेटला, अमोल धडके, शुभम सब्बन आदी उपस्थित होते.

# एसटी स्टँडवर प्रवाशांची तोबा गर्दी!

● चालकाच्या केबिनमधून एसटीमध्ये एन्ट्री करण्याचे महिला प्रवाशांचे प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

प्रवाशांच्या सेवेसाठी ब्रीदवाक्य घेऊन धावणाऱ्या लालपरी अर्थात एसटी बसेस सध्या जोरात सुरू आहेत. प्रवाशांची लालपरीकडे गर्दी वाढत आहे. विशेष करून महिला प्रवाशांची अर्ध्या तिकिटामुळे एसटीकडे ओढ दिसून येत आहे. त्याचाच प्रत्यय शनिवारी सकाळी सोलापूर बसस्थानकावर दिसून आला. गौरी-गणपती सणानिमित्त एसटीला प्रवाशांची मोठी गर्दी असल्याने, महिलेने चक्क चालकाच्या केबिनमधून एसटीमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात चालकाने प्रसंगावधान दाखवल्याने महिलेला बाहेर काढण्यात आले.

सर्वसामान्य प्रवाशांना एसटी बसेसचा मोठा आधार आहे. मध्यंतरी एसटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता, तेव्हा एसटी बसेस उपलब्ध नसल्याने अनेक प्रवाशांचे हाल झाले. मात्र सरकारने यावर तोडगा काढत कर्मचाऱ्यांना वेतन वाढ देऊन संप मिटवला. त्यानंतर गणेशोत्सवासाठी विविध विभागातून आणि आगारातून जादा एसटी बसेस सोडल्या जात आहेत. गणेशोत्सव काळ लक्षात घेता प्रवाशांची प्रत्येक स्थानकावर गर्दी वाढत आहे. एसटी बसमध्ये प्रवेश करण्यासाठी प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. काही प्रवाशांनी अनोखी शक्कल लढवत एका महिलेने चक्क एसटी चालकाच्या केबिनमधून एसटीमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने तात्काळ महिलेला दरवाज्यातून येण्यास सांगितले. चालकाच्या प्रसंगावधानामुळे होणारे वाईट परिणाम टळले.



### एसटी बसेस हाऊसफुल्ल

सर्व एसटी बसेस प्रवाशांनी भरून येत आहेत. एसटीमध्ये जाण्यासाठी जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे खिडकीतून जागा पकडावी लागते. एसटी महामंडळाना याकडे लक्ष द्यावे.

**- नीता स्वामी,** जिल्हाध्यक्ष, जंगम समाज

### एसटीतून प्रवास करण्याच्या सूचना

गणेशोत्सव काळ असल्याने एसटी बसेसना प्रवाशांची गर्दी आहे. गर्दीमध्ये प्रवास करताना सुरक्षित प्रवास करावा. खिडकी किंवा चालक केबिनमध्ये प्रवेश करू नये अशा सूचना दिल्या आहेत. एसटी कर्मचारी यांनी देखील सतर्क रहावे.

**- अजय पाटील,**
विभागीय वाहतूक अधिकारी सोलापूर एसटी विभाग

# तुझी-माझी जोडी सगळ्यांत न्यारी, ८०२ जोडप्यांनी केली विवाह नोंदणी

● विशेष विवाहाकडे तरुणाईची कल

**तभा वृत्तसेवा,**
**ॲड. विजयकुमार जाधव**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

'घर म्हणते बांधून बघ व विवाह म्हणते करुन बघ' अशी म्हण प्रचलित असून, विवाहात होणारा अवाढव्य खर्च न करता अगदी साध्या पध्दतीने विवाह आटोपून घेण्याचा नवा ट्रेंड सध्या आजच्या पिढीत वाढताना दिसत आहे. नातेवाईक व काही मित्रमंडळींच्या उपस्थितीत विवाह आटोपून घेण्याची पध्दत वाढत चालली असून, त्यानंतर ही लग्नगाठ अधिक मजबूत करण्यासाठी ते विवाह नोंदणीवर जास्त भर देत आहेत. हे कारण आहे की, विवाह नोंदणीचा आकडा वाढताना दिसत आहे.





सोलापूर जिल्ह्यात नोंदणी पद्धतीच्या विवाहांच्या संख्येत वाढ होत आहे. २०२२ पासून जिल्हा मुख्यालयाच्या आवारातील दुय्यम निबंधक कार्यालयात ८०२ विवाहांची नोंदणी विशेष विवाह कायद्यानुसार झाली. आतापर्यंत एकूण ८०२ विवाह नोंदणी पद्धतीने पार पडले आहेत. यामध्ये घटस्फोटितांच्या विवाहांचाही समावेश असून त्याचे प्रमाण अन्य विवाहांच्या तुलनेने जास्त आहे. फॉर्म १६ च्या आधारे ३११ विवाह झाले आहेत. सोलापूर जिल्हा मुख्यालयातील प्रशासकीय ब इमारतीमधील उपनिबंधक कार्यालयात नोंदणी पद्धतीचे विवाह पार पडत आहेत. दिवसागणिक नोंदणी पद्धतीच्या विवाहांची संख्या वाढत आहे.

गेल्या वर्षी नोंदणी पद्धतीने सर्वाधिक ८०२ विवाह पार पडले. यात विशेष पारंपरिक पद्धतीच्या विवाहांची संख्या ८०२ होती. विशेष विवाह कायदा १९५४ नुसार विवाहेच्छुक वधू-वरांना नियोजित विवाहाची नोटीस, वय, रहिवासीच्या पुराव्याच्या कागदपत्रांसह जिल्ह्याच्या विवाह अधिकाऱ्यांकडे शुल्कासह सादर करावे लागते. वधू-वर अटींची पूर्तता करीत असल्यास ही नोटीस स्वीकारून विवाह अधिकारी ती नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करतात. विशेष विवाह कायद्यांतर्गतचा विवाह कार्यालयाव्यतिरिक्त घरासह अन्य ठिकाणी करण्याची तरतूद आहे.

वैदिक/धार्मिक पद्धतीने पार पडलेल्या विवाहांची नोंदणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांकडून केली जाते. विवाहाची नोंदणी न केल्यास विवाह बेकायदा ठरत नाही. नोंदणीअभावी विवाहाचा शासकीय पुरावा संबंधित जोडप्यांकडे उपलब्ध राहत नाही. त्यामुळे शासकीय अभिलेखात विवाह झाल्याची नोंद घेण्यास अडचणी येतात. महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियमाची राज्यात अंमलबजावणी करण्याचे अधिकार सार्वजनिक आरोग्य विभागासही आहेत.

### सोलापूरमधील आकडेवारी

- ▶ २०२२ - ३१९ ▶ २०२३ - २५०
- ▶ २०२४ - २३३ एकूण - ८०२
- ▶ २०२४ (२२ मार्चपर्यंत) - १६६ २२ १८८
- ▶ **एकूण २,५०५ ३११ २,८१६**



### ● आता घरबसल्या करा विवाह नोंदणी



वधू-वर यांना नोटीस देण्यासाठी व विवाहासाठी विवाह अधिकाऱ्यांकडे जावे लागत होते. तसेच विवाह अधिकारी कार्यालयात माहिती भरण्यात बराच वेळ जात होता. विवाह कायद्याअंतर्गत विवाहाच्या नोंदणीसाठी १ नोव्हेंबर २०१७ पासून ऑनलाइन प्रक्रिया उपलब्ध करून दिली होती. विवाह निबंधक कार्यालयाच्या वतीने आता १ ऑगस्ट २०१८ पासून ही नोटीस ऑनलाइन पद्धतीने देणे बंधनकारक केले आहे. आता नोटीससाठी ऑनलाइन प्रक्रिया बंधनकारक केल्याने घरबसल्या विवाहाची नोटीस देणे शक्य होणार आहे.

**- आर.जी. शेख,**
जिल्हा विवाह नोंदणी तथा दुय्यम निबंधक अधिकारी उत्तर -१

### ● अधिनियम १९९८ कायदा अस्तित्वात

वैदिक अथवा पारंपरिक पद्धतीच्या विवाहाची नोंदणी करण्यासंदर्भात महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ कायदा अस्तित्वात आहे. विशेष विवाह कायदा १९५४ अंतर्गत विवाह पार पडण्याकरिता या कायद्यातील कलम चारमध्ये अटींच्या पूर्ततेनंतर कलम पाच अन्वये विशेष विवाह पार पाडता येतो. पद्धतीने झालेल्या विवाहांची नोंदणी विशेष विवाह कायद्यातील कलम १५ मधील तरतुदीची पूर्तता केल्यावर कलम १६ प्रमाणे करण्यात येते.

### ● स्वतंत्र कार्यालयाचा अभाव

दुय्यम निबंधक कार्यालयात विवाह नोंदणी केली जाते. विशेष विवाह केलेल्या जोडप्यांना प्रमाणपत्र दिले जाते. यासाठी वेगळी व्यवस्था नसल्याने जमीन, घर आणि अन्य खरेदी-विक्रीच्या नोंदणीसाठी येणाऱ्यांची उपनिबंधक कार्यालयात मोठी गर्दी होते. जोडपी आणि त्यांच्यासोबत नातेवाइकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

### ● दुय्यम निबंधक कार्यालयात सेल्फी पॉईंट

विवाह नोंदणी झाल्यानंतर जोडप्यांना एकमेकांचे स्वागत करण्यासाठी स्वतंत्र सभागृह नसल्याने गैरसोय होते. एक सेल्फी पॉईंटसह वधू-वरासाठी छोटासा रंगमंच आणि बसण्यासाठी खुर्च्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# नरसिंह अवतार भक्त प्रल्हाद पाहण्यासाठी गर्दी

**तभा वृत्तसेवा । अरुण बळप**
**बार्शी, दि. १४ सप्टेंबर-**

येथील गणेश रोड रोडगा रस्तावरील श्री गणेश रोड तरुण गणेश मंडळ हे गेल्या अनेक वर्षांपासून गणेश भक्तांना वेगवेगळ्या पौराणिक व धार्मिक देखावे सादर करुन आपल्या मंडळाची वेगळी ओळख निर्माण करीत असल्याचे खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले.

ते मंडळाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'नरसिंह अवतार भक्त प्रल्हाद' या देखाव्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी माजी मंत्री दिलीप सोपल, माजी पंचायत समिती सभापती अनिल डिसले, औद्योगिक वसाहतीचे चेअरमन सुधीर सोपल, माजी नगराध्यक्ष गणेश जाधव, माजी पंचायत समिती सभापती युवराज काटे, विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, जि. प सदस्य श्रीमंत थोरात, माजी नगराध्यक्ष योगेश सोपल, युवा नेते आर्यन सोपल, माजी नगरसेवक नागजी नान्नजकर आदींसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खा. ओमराजे निंबाळकर, माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या हस्ते गणेशमूर्तीची आरती करण्यात आली. खा. ओमराजे निंबाळकर व माजी मंत्री दिलीप सोपल यांच्या हस्ते देखावा तयार केलेल्या कारागिरांचा सत्कार करण्यात आला. यावर्षी मंडळाच्यावतीने नरसिंह अवतार भक्त प्रल्हाद हा पौराणिक व धार्मिक देखावा सादर केला असल्याचे मंडळाचे आधारस्तंभ महेश यादव यांनी सांगितले. देखाव्यात एकूण आठ ते दहा फायबरद्वारे निर्माण केलेल्या मूर्ती आहेत. संकल्पना मार्गदर्शक संतोष जाधवर यांची असून देखाव्याच्या निर्मितीसाठी शंकर गवळी, सागर गायकवाड, विवेक धर्मराव, मूर्तीकार नाना पोटफोडे, कृष्ण मोटे तसेच विद्युतीकरणासाठी नागजी सरवदे, सागर गाढवे आदींनी परिश्रम घेतले आहेत. यासाठी मंडळाचे अध्यक्ष आदिराज यादव व पदाधिकारी हरी वायचळ, प्रथमेश वायकर, संकेत ढोले, मदन कोरे, साळुंखे, मोहिते, परदेशी, अण्णा लिगाडे, बंडू गाढवे, अमोल वायचळ, विनोद उमाटे, विरेंद्र शिराळ, अनिल मुलगे, योगेश शिराळ, विजय वाघमारे, शकील मुल्ला,अमोल हिंगमिरे, अतुल ठोंगे, बापु राऊत, धनंजय लिगाडे ,राजू होनराव, पिंटू कांबळे, राहूल लिगाडे, राम घोंगडे, शंकर पाटील, विकी हिंगमिरे, नागेश खळदे, सौरभ खळदे, समर्थ बोते, सौरभ ढोले, विकास कवडे, शुभम केवडकर, सुशांत थळपती, संकेत ढोले, हर्षल होनराव, नागेश वायकर आदी परिश्रम घेत आहेत. देखावा पाहण्यासाठी उद्घाटनाच्या वेळी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती.

### यंदा मंडळाचा अमृतमहोत्सव

या मंडळाची स्थापना १९५२ साली झाली असून यावर्षी मंडळ ७५ वा अमृत महोत्सव साजरा करीत आहे. या मंडळाने आतापर्यंत शिवाजी महाराजांची आग्रावरुन सुटका, शिवराज्याभिषेक सोहळा, तुकाराम महाराजांचे वैकुंठ गमन, बद्रीनाथ मंदिराची प्रतिकृती, पशुपतिनाथ मंदिर, गणेश जन्म, कामदेव दहन, दत्त जन्म, साक्षरता अभियान, व्यसनमुक्ती वरील देखावा, कुटूंब नियोजन देखावा, छोटे कुटूंब -सुखी कुटुंब देखावा, श्रावण बाळ देखावा आदींसह सामाजिक व धार्मिक देखावे सादर केले आहेत.

# बाजार समितीत वाढली बेबंदशाही

## ● पणन संचालक आणि प्रशासकांना निलंबित करा; डॉ. बगले यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

शासन आदेशाचा भंग करून धोरणात्मक निर्णय घेऊन कोट्यवधी रूपयांची उधळपट्टी करणाऱ्या सोलापूर बाजार समितीच्या प्रशासकाच्या बेकायदेशीर कामकाजास तात्काळ स्थगिती द्यावी आणि पणन संचालकांसह प्रशासकास तात्काळ निलंबित करावे अशी मागणी दक्षिण सोलापूर राष्ट्रवादीचे नेते डॉ. बसवराज बगले यांनी शासनाकडे केली आहे.

सोलापूर बाजार समितीची मुदत संपल्यानंतर पणन संचालकाने एका आमदाराचे ऐकून मोहन निंबाळकर यांची प्रशासक पदावर मनमानी पद्धतीने नियुक्ती केली.सत्ताधारी तिन्ही पक्षांच्या सदस्यांना घेऊन अशासकीय प्रशासक मंडळ नेमण्याचा निर्णय झाला होता.त्या दृष्टीने अनेकांचे अहवाल शासनाने मागवले होते.

त्यानुसार सोलापूरच्या जिल्हा उपनिबंधकांनी एकाच दिवसात संबधितांची कागदपत्रे घेऊन अहवाल पाठविला,मात्र ते मंत्रालयात न पाठविता पणन संचालकांनी मुख्यमंत्री आणि पणन मंत्र्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत सगळेच प्रस्ताव आपल्याकडेच प्रलंबित ठेवले. प्रशासक मंडळावर कार्यकर्ते येऊ नयेत आणि निंबाळकर यांनीच कारभार करावा, हा डाव आखून नियमबाह्य संगनमताने कामकाजाला सुरूवात केली.

### निवेदनकर्त्यांचे आरोप चुकीचे

निवेदनकर्त्यांनी केलेले आरोप चुकीचे आहेत. त्यांना सोलापूर बाजार समितीच्या अशासकीय सदस्यपदावर नियुक्ती मिळाली नाही. म्हणून ते दबाव टाकत आहेत. मी माझ्या कालावधीत कोणाताही गैरकारभार किंवा चुकीचा निर्णय घेतला नाही.

**- मोहन निंबाळकर,**
प्रशासक सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती




प्रशासकाला कोणतेही धोरणात्मक निर्णय घेण्याचे,बाजार समितीच्या आर्थिक खर्चाचे निर्णय घेण्याचे अधिकार नाहीत. अत्यावश्यक कामकाज करावयाचे असल्यास त्या प्रस्तावास राज्य सरकारची मंजुरी मिळाल्यानंतरच ते कामकाज करण्याचे बंधन आहे.मात्र पणन संचालक विकास रसाळ आणि प्रशासक मोहन निंबाळकर यांनी संगनमताने बेकायदेशीर कामकाजाचा जणू धडाकाच लावला आहे. बाजार समितीच्या आवारात पावसाळ्यात सिमेंट काँक्रीट रस्ता बनवणे,सेल हॉलवरील सिमेंटचे पत्रे बदलून लोखंडी पत्रे बसवणे,व्यापारी गाळे दुरूस्त करणे,सिक्युरिटी गार्डसाठी एजन्सी नेमणे,वजनकाटा भाड्याने देणे आणि अस्थापना खर्च वाढवणे असे अनेक धोरणात्मक निर्णयाचे नियमबाह्य कामकाज करून बाजार समितीच्या सुमारे २५ कोटी रूपयांच्या उधळपट्टीचा सपाटा चालविला आहे.यासाठी शासनाची कसलीही मान्यता नाही,या सर्व बेबंदशाही कामकाजास तात्काळ स्थगिती द्यावी अशी मागणी डॉ.बगले यांनी मुख्य सचिव आणि पणन विभागाच्या वरिष्ठांकडे निवेदनाद्वारे केली आहे. बाजार समितीचा एकही प्रस्ताव जिल्हा उपनिबंधकांकडे न पाठविता परस्पर पुण्याच्या पणन कार्यालयात पाठवून त्याला शासनाची मान्यता न घेता परस्पर मंजूरी देऊन पणन संचालक विकास रसाळ यांनी कर्तव्यात कसूर केली.प्रशासक मोहन निंबाळकर यांनी पदाचा दुरुपयोग करून नियमबाह्य कारभार करून बाजार समितीच्या कोट्यवधी रूपयांचा आर्थिक गैरव्यवहाराचा प्रस्ताव तयार व निविदा काढून कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी पणन संचालक विकास रसाळ आणि उपसंचालक तथा प्रशासक मोहन निंबाळकर यांना तात्काळ निलंबित करावे.अन्यथा शासना विरुध्द उच्च न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा इशारा डॉ. बसवराज बगले यांनी दिला आहे.

# 'मानव जन्म देवतांनाही दुर्लभ'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**




काहीतरी पुण्यकर्म असेल म्हणून हा मानव देह आपल्याला मिळालेला आहे.मानव जन्म हा देवतांनाही दुर्लभ आहे. आपल्याला हा जन्म का मिळाला? याविषयी चिंतन करा.शरीराचे लाड करू नका, शरीराकडून काम करून घ्या.जपतप, उपवास, धर्मआराधना करा. आणि हे फक्त मानवच करू शकतो. उत्तम असा नरदेह मिळालेला आहे, त्याचा फायदा घ्या'असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

जिनवाणी जीवनात उतरू द्या. नुसते ऐकू नका. धर्म म्हणजे काय हे समजून घ्या.पैशाच्या मागे पळू नका.गाडी बंगला,नोकर चाकर,धनदौलत सगळे आहे परंतु घरात धर्म आराधना नसेल तर काय उपयोग? ज्या घरात धर्म आराधना असते ते घर सुखी व संपन्न असते. सारा खेळ हा कर्मांचा असतो. आपण जसे कर्म करतो तसेच फळ आपल्याला भोगावे लागते.आपले मन स्वच्छ व निर्मळ असावे.मनात कोणत्याही प्रकारचा राग, द्वेष,लोभ नसावा.जीवनात घडणाऱ्या सुखदुःखाच्या बाबी या कर्मामुळेच घडत असतात,घटना या निमित्त मात्र ठरतात.संकुचित वृत्ती बाळगू नका. धनसंग्रह करू नका.आज आपण जे सुख भोगतो याचे कारण म्हणजे फक्त पूर्वभवाची पुण्याई होय.

पुण्यसंचय,धर्म आराधना करायचे म्हणजे कठीण नाही नी जास्त काही करावे लागत नाही. प्रवचन रोज ऐकलात,थोडेसे दानधर्म केलात, जपतप केलात तरी पुरे.आज पुण्यबंध आहे म्हणून आपण सुखात आहोत.पुण्यसंचय संपल्यानंतर काय याचा विचार करा.सदैव पुण्यसंचय करा,कधी कामाला येईल सांगता येत नाही.जीवनात काही अघटीत घटना घडल्यास आपले पुण्यकर्म संपले आहे,पुण्याचा बॅलन्स शून्य आहे हे लक्षात घ्या. पुण्याचा बॅलन्स शिल्लक असू द्या.



# उपायुक्त लोकरे यांच्या हस्ते ताता गणपतीची पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

शहरातील पूर्व विभाग मानाचा ताता गणपतीची पूजा महानगरपालिका उपायुक्त आशिष लोकरे यांचे हस्ते पार पाडली. यावेळी मंडळाचे सल्लागार उमेश मामड्याल, महापालिका सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतूल यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपायुक्त लोकरे यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. यावेळी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते उपायुक्त लोकरे यांचा सत्कार करण्यात आला. शहरातील पूर्व विभाग मानाचा ताता गणपती मंडळाच्या वतीने उत्सव काळात विविध उपक्रम राबविले जातात.

# ठेकेदारांचा २० सप्टेंबरपासून काम बंद आंदोलनाचा इशारा : राठोड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील जल जीवन मिशनच्या कामांची बिले येत्या आठ दिवसांत न मिळाल्यास २० सप्टेंबर पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे अध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी दिला आहे.

संघटनेची बैठक होऊन हा सामूहिक रित्या निर्णय घेण्यात आला आहे. सोलापूर जिल्ह्यात एक हजार पाणी पुरवठ्याची कामे सुरू असून बिले मात्र वेळेवर येत नाहीत, येत्या आठ दिवसांत बिले न मिळाल्यास आणि आमच्या अडचणी सोडवल्या नाही तर २० सप्टेंबर पासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा राठोड यांनी दिला.

मुदतवाढ देताना विना दंड मुदतवाढ द्या, जादा दाराच्या निविदांना प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर द्या, अशा अनेक मागण्या संघटनेच्या आहेत.

# फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन देणार विविध सेवा

## प्रबोधनासाठी कार्यशाळा, चर्चासत्राचे आयोजन

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन सोलापूर शाखेला यंदा मानवतावादी प्रकल्प देण्यात आला आहे. या अंतर्गतमिनिमम इनिशिअल पॅकेज ऑफ सर्विहसेस फॉर रिप्रोडक्टिव्ह हेल्थ अँड राइटसच्या माध्यमातून विविध सेवा दिल्या जाणार आहेत. या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती, फॅमिली प्लॅनिंगचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकल्प पूर्व तयारीचे काम करण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालय, सोलापूर व महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यालय यांच्यासोबत एफ.पी.ए.आय. काम करणार आहे. यासाठी सोलापूर शहरातील विविध सामाजिक संस्था, महिला मंडळ, युवक मंडळ, आरोग्य क्षेत्रातील सामाजिक संस्था, शासकीय व निमशासकीय आरोग्ययंत्रणा, इंडियन मेडीकल असोसिएशन, निमा डॉक्टर्स असोसिएशन, इंडियन रेडक्रॉस सोसायटी आदींबरोबर सामंजस्य करार करुन त्यांना प्रजनन आरोग्य व कुटुंब कल्याणच्या सेवांविषयी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

दरम्यान, या प्रकल्पातर्गत गुरुवार दि. १९ सप्टेंबर रोजी अक्कलकोट पंचायत समिती मधील अधिकारी, परिचारिका, आशा वर्कर्स यासह सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींसाठी कार्यशाळा आयोजित केली आहे. दि. २६ आणि २७ सप्टेंबर रोजी सेक्सुअल जेंडर बेस्ड वायलेंस व समुपदेशन या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा होणार आहे. दि. १३ ऑक्टोबर रोजी रिस्क रिडक्शन दिनानिमित्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र होणार आहे. मिस्प कार्यशाळा आयोजित केली जाणार आहे, असे फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी.तेली यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, फायनान्स सदस्य डॉ. राजीव प्रधान, माजी अध्यक्षा प्रा. डॉ. नभा काकडे, प्रा. विजया महाजन, डॉ. अग्रजा चिटणीस , डॉ. गौरी कहाते, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, अपेक्षा सावंत आदी उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | जागतिक लोकशाही दिन |
| दि. १५ सप्टेंबर २०२४ | वामन जयंती |
| विक्रम संवत् २०८०, | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वादशी (१८.१२) | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र- श्रवण (१८.४८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - अतिगंड (१५.१३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (०७.३१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| दिनविशेष - अभियंता दिन | |

### राशीभविष्य

**मेष :** जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ :** सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन:** अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क :** विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल.

**सिंह :** प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या :** व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ :** नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु :** आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**मकर :** नातेवाईकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विराधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ :** लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन :** रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# संघर्ष सेना करणार ढोल बजाव आंदोलन

## धनगर समाज आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करण्याची मागणी

### पंढरपूर येथील उपोषणकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

धनगर समाजाला अनुसूचित जमातीतून (एसटी) आरक्षण अंमलबजावणी करावी या मागणीसाठी चार दिवसापासून पंढरपूरमध्ये आमरण उपोषण सुरू आहे. त्याकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष आहे. त्यांचे लक्ष वेधण्यासाठी संघर्ष सेना आणि धनगर समाजातील विविध संघटनांच्या वतीने आमदार - खासदारांच्या घरासमोर ढोल बजाव आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थापक शेखर बंगाळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

गेल्या ७० वर्षापासून ही मागणी प्रलंबित आहे. कोणत्याही सत्ताधारी पक्षांनी हा प्रश्न सोडवला नाही किंवा जाणून देखील घेतला नाही. अनेक वर्षापासून मोर्चे, रस्ता रोको आंदोलन करण्यात आले तरीही धनगर समाजाला न्याय मिळाला नाही. गेल्या चार दिवसापासून पंढरपूर मध्ये धनगर समाजाच्या वतीने आमरण उपोषण सुरू आहे. उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडत चालली आहे. सोलापूर जिल्ह्यातील कोणत्याही आमदार अथवा खासदारांनी या उपोषणास भेट दिली नाही. उपोषण सोडविण्यासाठी प्रयत्न केला नाही. या आमदार, खासदारांना समाजाच्या प्रश्नाचा विसर पडला की काय असा प्रश्न शेखर बंगाळे यांनी उपस्थित केला.

येत्या दोन दिवसात पंढरपूर येथील उपोषणकर्त्यांची भेट घेऊन धनगर समाज आरक्षणाविषयी आमदार व खासदारांनी भूमिका स्पष्ट करावी अन्यथा सोलापूर जिल्ह्यातील खासदार आणि आमदारांच्या घरासमोर ढोल वाजवून भंडारा उधळून आंदोलन करण्यात येणार असल्याचे शेखर बंगाळे यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेत रणजीत मळगे शिवा कोटी , गौरव पवार, राहुल सावंत , संदीप धायगुडे, करणराजे गडदे, सुनील देवकर, उमेश काळे आदी उपस्थित होते.

# जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने मुख्याध्यापक दत्तात्रय पोतदार सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सलगर ता. अक्कलकोट येथील शाळेत मुख्याध्यापक पदावर कार्यरत असणारे दत्तात्रय पोतदार यांना शिक्षक दिनी आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पोतदार यांनी गेल्या ३ वर्षात शाळेमध्ये वेगवेगळ्या कंपन्यामार्फत ६० लाखांची कामे केलेली आहेत. गतवर्षी मुख्यमंत्री स्वच्छ शाळा, सुंदर शाळा या स्पर्धेत तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून तीन लाखांचे बक्षीस मिळविलेले आहे. तसेच प्रधानमंत्री पोषण आहार योजनेतंर्गत परसबाग स्पर्धेमध्येही तालुका स्तरावर प्रथम क्रमांक व जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक पटकावलेली आहे. सलगरची शाळा सोलापूर जिल्ह्यातील एकमेव डिजीटल स्कूल ठरणार आहे. सध्या शाळेत याचा शुभारंभ लवकरच शिक्षण संचालक महाराष्ट्र राज्य व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो व मा. शिक्षणाधिकारी सो (प्राथ.) व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. दत्तात्रय पोतदार यांनी केलेल्या या संपूर्ण कार्याची दखल घेवून त्यांना सोलापूर जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदरचा पुरस्कार मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम यांच्या हस्ते व शिक्षणाधिकारी कादर शेख व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

# राजकीय इच्छाशक्ती अभावी विकास खुंटला




### कॉ. आडम यांचा घणाघाती आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १४ सप्टेंबर-**

महाराष्ट्रातील विकसनशील शहरातल्या क्रमवारीत सोलापूर शहराचा देखील समावेश असून, केंद्र सरकारने सोलापूर शहराला स्मार्ट बनविण्यासाठी स्मार्टसिटी योजनेत समावेश केले. नागरीकरण आणि शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात शहर हद्दवाढ भागाचा विस्तार झाला. शहरातील असंख्य गरीब, कष्टकरी कुटुंब भाडे परवडत नसल्यामुळे पै-पैसे जमवून हद्दवाढ भागात ५०० ते १००० चौ.मी. ची खुली जागा विकत घेऊन त्या ठिकाणी पत्रे किंवा कच्चे बांधकाम करून राहू लागले. त्यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष होत असल्याने या भागाचा विकास खुंटल्याचा आरोप कॉ. नरसय्या आडम यांनी केला. सुनील नगर येथे रमेश चक्राल यांच्या अध्यक्षतेखाली हद्दवाढ भागातील नागरिकांचा निर्धार मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते. प्रास्ताविक कॉ. बापू साबळे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार कॉ. बाळकृष्ण मल्याळ यांनी मानले. व्यासपीठावर हुतात्मा रेडिमेड व शिलाई कामगार गृहनिर्माण संस्थेचे सचिव वीरेंद्र पद्मा, यादगिरी नराल, अनिल लिंबोळे, प्रभाकर मुणक्याल, सावित्रा गुंडला आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मल्लिकार्जुन बेलियार, अंबादास गडगी, प्रवीण आडम, सिद्राम गडगी, प्रशांत विटे, सनी कोंडा, अरुण सामल, प्रकाश कुऱ्हाडकर, आंबदास बिंगी, मोहन कोक्कुल, बालाजी तुम्मा, बालाजी गुंडे, गोपाळ जगलेर, श्रीनिवास तंगडगी, अनिल घोडके, नागनाथ जल्ला परिश्रम घेतले.



# प्राजक्ता माळीची 'फुलवंती' रूपातील अदाकारी

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

पेशवाईत लोककला आणि लोककलावंत यांना मोठा राजश्रय मिळत असे, याच काळात 'फुलवंती' आपली कला सादर करण्यासाठी मुघल दरबारात हजर झाली.

'फुलवंती'चे अस्मानी सौन्दर्य आणि आणि मनमोहक नृत्यकला ह्यांचे दर्शन आपल्याला 'फुलवंती' ह्या शीर्षकगीतातून होणार आहे. गीतकार वैभव जोशी,विश्वजित जोशी आणि स्नेहल तरडे ह्यांच्या लेखणीतून साकारलेले हे गीत; आर्या आंबेकर हीने गायले असून गीतकार जोडी अविनाश-विश्वजीत ह्यांनी हे गाणे संगीतबद्ध केलेले आहे; तसेच उमेश जाधव ह्यांचे नृत्य दिग्दर्शन आणि प्राजक्ता माळी यांची 'फुलवंती'च्या रूपातील अदाकारी ह्यांनी ह्या शीर्षकगीताला चारचांद लावले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### शमी विघ्नेश गणेशाचे तालुका कृषी अधिकाऱ्यांनी केले पूजन

**अक्कलकोट, दि. १४ सप्टेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात गुरुवारी सायंकाळी तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे-देशमुख यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी यासाचे सचिव शामराव मोरे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, आप्पा हंचाटे, मनोज निकम, रोहित खोबरे, सौरभ मोरे, प्रा. शिवशरण अचलेर, अतिश पवार, गोटू माने, प्रविण घाटगे, बाळासाहेब पोळ, नामा भोसले, धानप्पा उमदी, चंदू हिबारे, बाळासाहेब घाडगे, रोहन शिर्के, संभाजीराव पवार, पिंटू साठे, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, सुमित कल्याणी, अनिल गवळी, गोरख माळी, बसवराज क्यार, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, सागर पवार, अनिल गवळी, महेश झपंले, पप्पू कोल्हे, सोमनाथ शिंदे, किरण साठे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



### माळशिरसमधील कार्यशाळेला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद

**सोलापूर, दि. १४ सप्टेंबर-**

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत माळशिरस येथे शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. रुरल डेव्हलपमेंट डिपार्टमेंट महाराष्ट्र, सोलापूरचे क्लस्टर समन्वयक समाधान खुपसे व माळशिरस तालुका कृषी अधिकारी आबासाहेब रुपनवर यांनी शासनाच्या विविध अन्नप्रक्रिया उद्योगविषयी माहिती, आर्थिक मदत, अनुदान, महत्त्व, शेतकऱ्यांना असणाऱ्या समस्या याविषयी मार्गदर्शन केले. वाखरी, पंढरपूर एमआयटी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी शेतकऱ्यांना पीकशास्त्र विषय व त्याचे व्यावसायिक कृषी क्षेत्रांमधील असणारे महत्त्व, पीकशास्त्र व अन्न प्रक्रिया उद्योग याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी कृषी विभाग माळशिरस, पंढरपूर येथील संबंधित कर्मचारी व शेतकरी वर्ग उपस्थित होते.



### अक्कलकोट व्यापारी महासंघातर्फे प्रशासनाला निवेदन

**अक्कलकोट, १४ सप्टेंबर-**

करोडो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या अक्कलकोट निवासी ब्रह्मांडनायक दत्तअवतार श्री स्वामी समर्थ महाराजाबद्दल आक्षेपार्ह विधान करोडो स्वामी भक्ताच्या श्रध्देला धक्का पोहचविणारे वादग्रस्त विधानाचे अक्कलकोट व्यापारी महासंघातर्फे जाहिर निषेध व्यक्त केला असून याबाबत उचित दखल घेऊन कारवाई करावी. गुन्हा दाखल करण्याची मागणी अक्कलकोट उत्तर पोलीसाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. नायब तहसीलदार विकास पवार यांना व्यापारी महासंघातर्फे निवेदन देऊन उचित कारवाई करण्याची मागणी केली आहे. व्यापारी महासंघातर्फे निवेदन देण्याप्रसंगी मल्लिनाथ साखरे, अशोक कलशेट्टी, प्रसन्न हत्ते, आर. आर. पाटील, राजशेखर सोड्डे, नितीन पाटील, दयानंद बिडवे, प्रशांत केसकर, दत्ता कटारे, रवी जोशी, चंद्रशेखर अडवितोट, अजय अडवितोटे, गवंडी पाटील, क्षीरसागर, शरणप्पा पाटील, देविदास गवंडी, सचिन क्षीरसागर, दिनेश पटेल, सचिन माशाळे, राजेद्र भुंजगे, शशीकांत रणसुबे, संतोष मुस्के, गजानन पाटील आदी उपस्थित होते.



### उंदरगाव येथे गणेशोत्सव स्पर्धेत शालेय साहित्यांचे वाटप

**माढा, दि. १४ सप्टेंबर-**

गणेश उत्सवानिमित्त नवहिंदवी कला क्रीडा व सांस्कृतिक संस्था आणि शिवशाही प्रतिष्ठान उंदरगावच्या वतीने मुलांचा शारीरिक व बौद्धिक विकास व्हावा या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सामान्य ज्ञान, चित्रकला रंगभरण स्पर्धा अशा बौद्धिक कार्यक्रमाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रा.राजेंद्र तांबिले यांच्यावतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हा समन्वयक पंडित साळुंके, ॲड. नवनाथ तांबिले, मंडळाचे अध्यक्ष सौरभ साळुंके, अमोल तांबिले उपस्थित होते. या स्पर्धेत शंभरहून अधिक मुला-मुलींनी सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अनिकेत साळुंके, आदित्य तांबिले, गौरव साळुंके, शौर्य तांबिले, निखिल साळुंके यांनी परिश्रम घेतले. मंडळाचे अध्यक्ष सौरभ साळुंखे यांनी आभार मानले.

# डीजेपुढे नाचणारा तरुणवर्ग वळला सामाजिक कार्याकडे

## सामाजिक उपक्रम राबवणाऱ्या मंडळांना करमाळा पोलिस देणार पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ सप्टेंबर-**

करमाळा पोलिस ठाण्याच्या वतीने यावर्षी ग्रामीण व शहरी भागात सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या मंडळांना पुरस्कार दिले जाणार आहेत. यासाठी पुरस्कार निवड समितीची स्थापना करण्यात आली आहे. करमाळा विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद घुगे यांनी तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागासाठी गणेश मंडळांच्या सामाजिक उपक्रमाचे मूल्यांकन करणारी समिती स्थापन केली आहे.

या समितीने सार्वजनिक गणेश मंडळांना भेटी देऊन राबवत असलेल्या उपक्रमाविषयी माहिती दिली आहे.यावेळी समितीच्या सदस्यांनी सामाजिक उपक्रम राबवणे या विषयी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. आणि गणेश उत्सव मंडळ राबवत असलेल्या सामाजिक उपक्रमांची माहिती घेतली आहे व त्या माहितीच्या आधारावर त्यांचे गुणांकन केले जाणार आहे त्यातून ग्रामीण व शहरी भागासाठी पुरस्कार दिले जाणार आहेत. या समितीने केम, वडशिवणे, शेलगाव, कंदर,उमरडसह अनेक गावात भेटी देऊन गणेशोत्सव मंडळांची माहिती घेतली आहे.चिखलठाण येथे सरपंच धनश्री गलांडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, सोसायटीचे अध्यक्ष विकास गलांडे, चिखलठाणचे पोलिस पाटील गायकवाड, सचिन गव्हाणे यांनी परीक्षण समितीमधील सदस्यांचे स्वागत केले. यावेळी बारकुंड यांनी पोलिस निरीक्षक घुगे यांच्या कामाचे कौतुक केले. पोलिस निरीक्षकांच्या या निर्णयाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



#### शिट्टी, काठी, करडी नजरची जागा घेतली उपक्रमाने

पोलीस म्हटलं की शिट्टी, काठी, करडी नजर व कायद्याचा धाक हा जो समज आहे. तो करमाळा पोलिसांनी खोडून काढला आहे. डीजेपुढे नाचणारे व अनावश्यक खर्च करणारे तरुण आता सामाजिक उपक्रमाकडे वळाले आहेत. करमाळा पोलिसांच्या या उपक्रमाचे जिल्हाभर कौतुक होत आहे.

#### उपक्रम मूल्यांकन समिती सदस्य

पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष संदीप पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. लक्ष्मण राख, ॲड. अपर्णा पद्माळे, पत्रकार अशोक मुरूमकर, गजेंद्र पोळ याचा समावेश आहे.

# होटगी तलावात येणारे रसायनयुक्त पाणी थांबवा

## सचिन व्हनमाने : नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याने आंदोलन करणार

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १४ सप्टेंबर-**

होटगी तलावात सोलापूर शहारातील आणि विविध कंपन्यामधून येणारे रसायनयुक्त पाण्यामुळे होटगीसह चार गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. यामुळे शहर आणि औद्योगिक वसाहतीतील येणार पाणी बंद न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दक्षिण सोलापूर तालुका युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन व्हनमाने यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

होटगी येथील तलावात सोलापूर शहारातील सांडपाणी आणि अनेक लहान-मोठ्या कंपनीतील रसायनयुक्त पाणी सोडले जाते.

हे पाणी पूर्णपणे रसायनयुक्त असल्याने त्या पाण्याचा आरोग्यावर परिणाम होत आहे. या पाण्याचा वापर शेतात वस्ती करून राहणाऱ्या शेतकऱ्यांना नाईलाजास्तव पिण्यासाठी करावा लागत आहे. जनावरांना देखील हेच पाणी पाजवण्यात येते. यामुळे शेतकऱ्यांसह जनावरांचे देखील आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच होटगीसह होटगी स्टेशन, फताटेवाडी आणि मद्रे याही गावातील शेतातील वस्ती करून मुक्काम करत असलेल्या अनेक शेतकऱ्यांना या पाण्याचा त्रास होत आहे. या तलावातील पाण्यावर शेकडो हेक्टर क्षेत्रातील बागायत शेती अवलंबून आहे. हे पाणी ज्या पिकाला देण्यात येते त्याची सरासरी उत्पादनही निघत नसल्याचे व्हनमाने यांनी सांगितले.

#### तर आंदोलन छेडणार

या पाण्याने अंघोळ केल्यास त्वचा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची भिती व्यक्त होत आहे. म्हणून सोलापूर महानगरपालिका प्रशासनाकडून रसायनयुक्त येणार पाणी नाही. थांबवल्यास होटगी चार गावातील ग्रामस्थांसह युवक काँग्रेसच्या वतीने आंदोलन छेडणार असल्याचे व्हनमाने यांनी सांगितले.





# गावागावात मराठा सेवकांची नाव नोंदणी व्हावी

**मनोज जरांगे-पाटील : करमाळ्यात प्रा. झोळ यांची 'हक्काचा माणूस' नोंदणी सुरू**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ सप्टेंबर-**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी माढा, करमाळा, भूम-परंडा व बार्शी तालुक्यातून मराठा समन्वयकांची बैठक घेतली. प्रत्येक गावात कमीतकमी २० मराठा सेवक (हक्काचा माणूस) यांची नाव नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

मराठा समाजाच्या नोंदी, जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी, वैद्यकीय अडचणीबाबत मदत करणे, सामाजिक अडचणी व इतर समस्या सोडण्यासाठी काम करतील. या बैठकीसाठी करमाळा तालुक्यातून दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, स्वाभिमानीचे गणेश मंगवडे, प्रशांत नाईकनवरे, प्रा. संजय जगताप हे मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या बैठकीस हजर होते. प्रा. झोळ यांनी लगेच तातडीने मराठा बांधवांची बैठक घेऊन, करमाळा तालुक्यातील प्रत्येक गावात फिरून मराठा सेवकांसाठी अर्ज भरून आजपासून नाव नोंदणी करण्यास सुरुवात केली आहे.

# अक्कलकोट ते तुळजापूर नवीन बस प्रवाशांच्या सेवेत

**अक्कलकोट, दि. १४ सप्टेंबर-**

अक्कलकोट आगाराने अक्कलकोट ते तुळजापूर नविन बस खास भाविकांच्या सेवेसाठी सुरू केली आहे. या बसचे उद्‌घाटन सोलापूर विभाग नियंत्रक अमोल गोंजारी विभाग वाहतुक अधिकारी, अजय पाटील यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी आगार व्यवस्थापक म. ब. जुनेदी, ज. नि. चव्हाण, स. म. कांबळे, खसगी, घाडगे, कोप्पा उपस्थित होते. अक्कलकोट बसस्थानकवरून ७.५०, १४ वा. सुटणार आहे. तुळजापूर बसस्थानकवरून १०.३०, १६.४५ वा. सुटणार आहे. या बसला शासनाच्या सर्व सवलत लागू आहेत. प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आगार व्यवस्थापक नैदी यांनी केले आहे.





# शंभर टक्के गुणापेक्षा प्रामाणिक प्रयत्न महत्त्वाचे : डॉ. पालवे

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १४ सप्टेंबर-**

विद्यार्संथ्यांनी सर्व गुणसंपन्न असावे. आपल्या सभोवताली जे जे उत्कृष्ट आहे, ते त्या अंगीकृत करावे. चांगला आहार, विहार, उत्कृष्ट विचार, वेळेचे भान, आणि प्रामाणिक प्रयत्नाच्या जोरावर विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रात यशस्वी होता येते. आपल्या संपर्कातील व्यक्तीचे चांगले गुण आपल्याला अंगीकृत करता आले पाहिजेत, असे डॉ. पालवे यांनी प्रतिपादन केले.

शुद्ध आहार शाखाहार, जगा व जगू द्या असं संदेश देत सर्वांनी दशलक्षण धर्मातील दहा गुण अंगीकारावेत. रत्नत्रयमध्ये शिकणाऱ्या प्रत्येक हाताला काम मिळेल असा प्रामाणिक प्रयत्न संस्था करेल तसेच दहावी व बारावी बोर्ड परीक्षेमध्ये ९० टक्क्यावर मार्क मिळणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला ५००० चे बक्षीस देण्यात येईल असे आनंतलाल दोशी यांनी जाहीर केले.

अतिशय ग्रामीण भागामध्ये अत्यल्प फीमध्ये दादांनी २००८ साली दोन शिक्षक १८ विद्यार्थ्यांवर सुरू केलेली संस्था आज नावारूपाला आलेली असून ७०० प्लस विद्यार्थी मांडवे शाखेमध्ये शिकत असून नातेपुते, माळशिरस, दहिगाव या ठिकाणी संस्थेच्या शाखा आहेत. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष अनंतलाल दादा दोशी, सागर महादेव काळे, डॉ. मकरंद ज्ञानदेव पालवे, वीरकुमार दोशी, रामभाऊ कर्णे, वैभव शहा, रोनक चंकेश्वरा, संचालक अमित गांधी, बाहुबली दोशी, बबन गोफणे, दत्ताभाऊ भोसले, चंद्रकांत तोरणे, मुख्याध्यापक दैवत वाघमोडे, प्राचार्य गणेश जगताप, मुख्याध्यापक सतीश हांगे, माधवी रणदिवे, वनिता निंबाळकर, सविता देसाई, पठाण, माने, अमृता मोहिते उपस्थित होते. सूत्रसंचालन दुधाळ, रणदिवे यांनी केले.

# 'विठ्ठल'ने ऊस दराची फोडली कोंडी

**प्रा. रामदास झोळ : चेअरमन अभिजीत पाटील यांचा सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १४ सप्टेंबर-**

शेतकऱ्यांचा ऊसाला योग्य भाव देऊन त्यांना न्याय देण्याचे काम विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले असून, चालू वर्षी उच्चांकी दर, तर पुढील वर्षासाठी ३,५०० रुपये प्रति टन दर जाहीर करून ऊस दराची कोंडी फोडून बळीराजाला खऱ्या अर्थाने न्याय मिळवून दिल्याची भावना व्यक्त करत दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांच्या हस्ते चेअरमन अभिजीत पाटील यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रा. रामदास झोळ सर म्हणाले की, सहकारी साखर कारखाना म्हणजे शेतकऱ्याचे मंदिर असून त्यांच्या कष्टाला योग्य दाम देऊन त्यांच्या संसाराला समृद्ध करण्यासाठी निरपेक्षपणे जाणकार नेता म्हणून अभिजीत पाटील यांनी आतापर्यंत महाराष्ट्रात काम केलेले आहे.

शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव देऊन त्यांचा सन्मान केल्याबद्दल येणाऱ्या निवडणुकीमध्ये जनता त्यांच्या कामाची पोचपावती मत रूपाने देणारच आहे. शेतकरी हिताचा विचार करणारा युवा नेता म्हणून आम्हाला आपला सार्थ अभिमान वाटतो. अभिजीत पाटील यांचा आदर्श घेऊन सहकारी व खाजगी कारखानदारांनी शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य दर दिल्यास खऱ्या अर्थाने त्यांचे जीवन समृद्ध होईल.

चेअरमन अभिजीत पाटील विठ्ठल सहकारी साखर कारखाना पंढरपूर यांनी चालू वर्षी ऊसाला उच्चांकी दर दिल्याबद्दल आणि पुढच्या वर्षी ३,५०० रुपये प्रति टन दर जाहीर करून पुढच्या वर्षीची ऊस बिलाची कोंडी फोडल्याबद्दल त्यांचे आभार मानुन जाहीर सत्कार करण्यात आला.सदर सत्कार समरंभास प्राध्यापक रामदास झोळ फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष रवी गोडगे, गणेश मंगवडे, सुदर्शन शेळके, प्रशांत नाईकनवरे, बापू फडतरे, भीमराव ननवरे व सत्यवान गायकवाड उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनी अंगभूत कौशल्य विकसित करावेत

## संतोष वगाले : कल्याणशेट्टी महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशनचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ सप्टेंबर-**

वाणिज्य विद्याशाखेतील विद्यार्थ्यांकडे अंगभूत कौशल्य असतात, ती विकसित करण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत, त्यामुळे रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकते असे प्रतिपादन संतोष वगाले यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाने आयोजित केलेल्या कॉमर्स असोसिएशन उपक्रमांचा शुभारंभ केल्यानंतर ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर विज्ञान विभाग समन्वय पूनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. वगाले म्हणाले की, वाणिज्य विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख कोर्सेसची संधी असते त्यात चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी, कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट अशा परीक्षेस बसता येते. तसेच बँकिंग उद्योजकता शेअर मार्केट आदी कोर्सेस करण्याची त्यांना संधी मिळते, म्हणून विद्यार्थ्यांनी प्रगतीच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे.




मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, महाविद्यालयातील कॉमर्स असोसिएशनच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन स्वतः मधील कौशल्य विकसित केली पाहिजेत, त्यासाठी महाविद्यालयाकडून सहकार्य केले जाईल.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा जनाबाई चौधरी यांनी केले. आभार प्रा शिल्पा धूमशेट्टी यांनी मानले. कार्यक्रमास प्रा राजशेखर पवार, प्रा भीम सोनकांबळे, प्रा डॉ शितल झिंगाडे, प्रा प्राची गणाचार्य, प्रा मधुबाला लोणारी आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी प्रा शितल फुटाणे यांनी प्रयत्न केले

#### विद्यार्थ्यांसाठी घेतले जाणार मार्गदर्शक उपक्रम

उद्योजकता कार्यशाळा, करिअर मार्गदर्शन, बँकिंग मार्गदर्शन, औद्योगिक क्षेत्रभेट, पोस्टर प्रेझेंटेशन, शेअर मार्केट, देश विदेशातील आर्थिक उलाढाल आदी मार्गदर्शक उपक्रम वर्षभरात कॉमर्स असोसिएशनच्या माध्यमातून घेतले जातील, असे यावेळी पूनम कोकळगी यांनी सांगितले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आ. राजेंद्र राऊत यांच्या आंदोलनास भटक्या विमुक्त संघटनेचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ सप्टेंबर-**

शहरामध्ये आ. राजेंद्र राऊत यांचे नेतृत्वा खालील ओ,बी,सी,कोट्यातून मराठा समाजास आरक्षण मिळावे या मागणीकरीता आंदोलन करण्यात येत आहे. त्यास भटक्या-विमुक्त जमाती संघटना बार्शी शहर व तालुका शाखेने जाहीर पाठिंबा जाहीर केला.



संघटनेचे राज्य सरचिटणीस नागजी आडसूळ, तालुकाध्यक्ष अबंऋषी कोळेकर, शहराध्यक्ष, भोला आडसूळ, महिला अध्यक्ष मंगलताई, शशीकला, रामलिंग पवार, धनाजी घोटकर, संजय चव्हाण, अभिजीत आडसूळ, बापू घोटभर, मनोज, पवार, बाबू शिंगनाथ, राहुल घोडके, तायप्पा वाघमोडे, मसू, गंजे आदी उपस्थित होते. अनेक ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे व प्रत्यक्ष भेटून पाठींबा दर्शविला आहे. तसेच तालुक्यातून व आजूबाजूच्या तालुक्यातूनही या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी येत आहेत. आजच्या तिसऱ्या दिवशीही लोक येत होते.



# बाप्पा नगरपरिषदेस खड्डे बुजविण्याची सुबुद्धी दे!

### पंढरीतील सार्वजनिक मंडळांचे पदाधिकारी आणि करदात्या नागरिकांचे गणरायास साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ सप्टेंबर-**

पंढरपूर शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात सुरू आहे. मात्र शहरातील अनेक रस्त्यावर खड्डे पडले असल्याने १७ सप्टेंबर २०२४ रोजी असणाऱ्या अनंतचतुर्थीच्या दिवशी गणेशाची विसर्जन मिरवणूक काढताना रस्त्यांवरील खड्डे चुकविण्याची शहरातील जवळपास सर्वच सार्वजनिक मंडळांना मोठी कसरत करावी लागणार आहे. त्यामुळे पंढरपूर नगरपरिषदेस खड्डे बुजविण्याची तरी सुबुद्धी दे असे साकडे सार्वजनिक मंडळांच्या पदाधिकारी आणि शहरातील नागरिकांकडून गणपती बाप्पाला घातले जात आहे.





पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने येथे वर्षाला एक कोटी होऊन अधिक भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत असतात. परगावाहून आलेल्या भाविकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी शासन कोट्यवधी रुपयांचा विकास निधी नगर परिषदेस देत असते. गेल्या दहा वर्षात सुमारे पाचशे ते सहाशे कोटी रुपयांचा विकास निधी तीर्थक्षेत्र पंढरपूरसाठी शासनाकडून देण्यात आला आहे. मात्र शासनाकडून वितरित झालेल्या या निधीतून शहरातील आणि उपनगरातील रस्त्याची कामे चांगल्या प्रकारे करण्यात आली नाहीत. परिणामी ये रे माझ्या मागल्या म्हणत प्रत्येक वर्षी रस्त्यावर खड्डे पडलेलेच चित्र पंढरपूरकरांना पहावयास मिळत आहे. या खड्डे पडलेल्या रस्त्यांवरुन जा ये करताना पंढरपूरकरांचे कमालीचे हाल होत आहेत. या बरोबरच वाहनचालक तसेच बाहेरगावांहून आलेल्या भाविकांना देखील याचा त्रास सहन करावा लागत आहे. एकंदरीतच रस्ते दुरुस्तीकडे नगरपरिषद महिनो न महिने दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

सध्या शहर आणि उपनगरातून गणेशोत्सव मोठ्या उत्साहात सुरू आहे पंढरपूर शहरात दीडशेच्या आसपास लहान,मोठी सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी गणेशमूर्तीशी प्रतिष्ठापना केलेली आहे. येत्या १७ सप्टेंबर रोजी अनंतचतुर्थी आहे. मात्र पंढरपुरात अनंतचतुर्थीच्या आदल्या दिवशी म्हणजे १६ सप्टेंबरला त्या बरोबरच अनंतचतुर्थीच्या म्हणजे १७ सप्टेंबरला आणि काही मंडळांचे गणपती१८ सप्टेंबर रोजी देखील विसर्जन मिरवणुका काढत असतात. त्यामुळे पंढरपुरात गणेशाचे विसर्जन करण्यासाठी तब्बल तीन दिवस विसर्जन मिरवणुका निघत असतात.

मात्र दुसरीकडे प्रत्येक रस्त्यावर खड्डे असल्याचे चित्र सध्या शहर आणि उपनगरातून दिसून येत आहे. शहरातील व्हीआयपी समजला जाणारा ठाकरे चौक ते सावरकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते चौफाळा पर्यंतचा रस्ता देखील याला अपवाद नाही. या बरोबरच शहरातील इंदिरा गांधी चौक, नवी पेठ, जुनी पेठ, भोसले चौक, महात्मा फुले चौक, संत पेठ, प्रदक्षिणामार्ग आदी शहर भागातील रस्त्यावर मोठाले खड्डे पडले आहेत. मात्र या वर्षी शहरातील आणि उपनगरातील प्रत्येक रस्त्यावरील खड्ड्यामुळे गणेश भक्तांना मिरवणूक काढताना त्याचा त्रास होणार आहे. त्यामुळे नगरपरिषदेने अनंतचतुदर्शीच्या किमान एक दिवस तरी अगोदर नेहमी प्रमाणे तात्पुर्ती रस्त्यांची मलमपट्टी करीत रस्त्यावरील खड्डे बुजवावेत. त्यामुळे काही अंशी तरी त्रास कमी होईल अशी मागणी केली जात आहे. मात्र याकडे नगरपरिषद दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांनी खुद्द गणरायालाच या नगरपरिषदेतील अधिकाऱ्यांना खड्डे बुजविण्यासाठी सुबुद्धी दे असे साकडे आता घातले आहे.

## अकलूजमध्ये २९ सप्टेंबर रोजी सुशिलकुमार शिंदे यांचा सन्मान

**माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती**

**अकलूज, दि. १४ सप्टेंबर-**

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त माळशिरस तालुक्याच्या वतीने रविवारी २९ सप्टेंबर रोजी नागरी सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दिली. यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, शिवतेसिंह मोहिते-पाटील, कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, शंकर सहकारी साखर कारखान्याची व्हाईस चेअरमन मिलिंद कुलकर्णी, ॲड. प्रकाशराव पाटील रामचंद्र सावंत-पाटील तालुक्यातील विविध गावचे सरपंच, उपसरपंच संस्थांचे चेअरमन यांच्यासह माळशिरस तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थितीत होत. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले की हा सन्मान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते







व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. हा समारंभ अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे २९ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. ५० हजार नागरिक या समारंभास येतील. त्या दृष्टीने बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. यासाठी विविध कमिट्या नियुक्ती करण्यात आल्या असून कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. हा कार्यक्रम पक्षविरहित व माळशिरस तालुक्याच्या वतीने असून आ. रणजीतसिंह मोहिते-पाटील या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत.

## गहिनीनाथ औसेकर महाराजांना महाराष्ट्ररत्न पुरस्कार जाहीर

**पंढरपूर, दि. १४ सप्टेंबर-**



आफ्टरनून व्हाईस संस्थेकडून प्रत्येक वर्षी महाराष्ट्ररत्न पुरस्कार दिला जातो. यंदाच्या वर्षीचा हा पुरस्कार येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना जाहीर झाला असून येत्या २१ सप्टेंबर रोजी मुंबई येथे खास कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. मंदिर समितीचे सहअध्यक्ष म्हणून गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी काम करताना पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केलेले आहेत. याबरोबरच वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार करण्यात देखील त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी केलेल्या या सर्व कार्याची दखल घेत मुंबई मधील प्रसिध्द दैनिक आफ्टरनून व्हाईस या वृत्तपत्र संस्थेकडून यंदाच्या महाराष्ट्ररत्न २०२४ या पुरस्कारासाठी त्यांची निवड केलेली आहे. या पुरस्काराचे वितरण येत्या २१ सप्टेंबर रोजी मुंबई येथील नरिमन पॉईंट परिसरातील मंत्रालयाजवळील यशवंतराव चव्हाण हॉल येथे सायंकाळी पाच वाजता मोठ्या शानदार समारंभात करण्यात येणार आहे. हा पुरस्कार मान्यवराच्या हस्ते गहिनीनाथ औसेकर महाराजांना प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कार समारंभावेळी आफ्टरनून व्हाईसच्या संस्थापक अध्यक्ष तथा मुख्यसंपादक वैदही तमन उपस्थित राहणार आहेत. गहिनीनाथ महाराज औसेकर यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मुंडफणेवाडीतील जिल्हा परिषद शाळा तालुक्यात प्रथम

### मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानांतर्गत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १४ सप्टेंबर-**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियानांतर्गत महाळुंग केंद्रातील मुंडफणेवाडी जिल्हा परिषद शाळा तालुक्यातून प्रथम आल्याचे मुख्याध्यापक समीर लोणकर यांनी सांगितले.

यावेळी अर्चना वाघ उपस्थित होत्या. १५० गुणांचे मूल्यांकन करून निकष ठरवण्यात आले होते. त्यामध्ये शाळेच्या वर्ग खोल्या, ग्रंथालय, वाचन कोपरे, पुस्तक पेढी, प्रयोगशाळा मुख्याध्यापक कार्यालय, आरोग्य सेवा, हँडवॉश स्टेशन, दिव्यांगासाठी स्वच्छतागृह, फर्निचर, सुरक्षा तरतूद, पर्यावरणपूरक शाळा, इको क्लब, सोलर पॅनल, क्रीडांगण, क्रीडा सुविधा, आयटीसी पायाभूत सुविधा, शैक्षणिक साधनसामग्री, शालेय रंगरंगोटी, परसबाग, महावाचन चळवळ, तंबाखूमुक्त शाळा, आनंददायी शनिवार, स्काऊट गाईड, तक्रार निवारण यंत्रणा, विद्यांजली पोर्टल, असाक्षर असे निकष होते. त्यात ही शाळा सरस ठरली.



**लोकवर्गणी, शिक्षकांचा सहभाग**

गेल्या अनेक वर्षांपासून मुख्याध्यापक समीर लोणकर हे प्रत्येक शासकीय योजनांची अंमलबजावणी व कल्पकतेने विद्यार्थ्यांच्या सहभागातून उपक्रम राबवितात. तसेच शिक्षकांनी स्वखर्चातून व लोकवर्गणीतून मुख्याध्यापक कक्ष व संगणक कक्ष निर्मिती यातून ई-लर्निंग शिक्षण दिले आहे. तसेच शाळेची रंगरंगोटी करून शाळा डिजिटल केली आहे. त्यामुळे शाळेची इमारत अधिकच सुंदर दिसत आहे.

## आनंदाच्या शिधाचा अपुरा पुरवठा

### फक्त ८३ टक्केच वाटप होणार; आठ तालुके अद्याप वंचित

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १४ सप्टेंबर-**

राज्य शासनाकडून अंत्योदय व प्राधान्य कुटुंब पात्र रेशनकार्डधारकांना गौरी गणपती सणनिमित्त जाहीर केलेला होता. परंतु गणपती उत्सव संपत आला तरी ग्रामीण भागातील सात ते आठ तालुक्यांमध्ये आनंदाचा शिधा उपलब्ध नाही.

येणारा शिधा हा अधिकाऱ्यांकडून तोंडी ९० टक्के सांगितले गेले होते. परंतु प्रत्यक्षात ८३ टक्के शिधा वाटपासाठी दिला जाणार असल्याने धान्य दुकानदारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. शासन फक्त जाहिरातीसाठी हा शिधा उपलब्ध करून देत आहे असे प्रश्न जिल्ह्यांमधील सर्व रेशन दुकानदारांच्या मना येते आहे. शासनाने जाहिरात जरूर करावी. पण त्यासाठी धान्य दुकानदारांना बळीचा बकरा करू नये अशी संतप्त प्रतिक्रिया सोलापूर जिल्ह्यातील धान्य दुकानदारांच्या येत आहेत. एकीकडे रेशनकार्डधारक वारंवार शिधा कधी येणार आहे, यासाठी हेलपाटे मारत आहेत. शिधा कमी येणार आहे, असे पेपरमध्ये छापून आले आहे असे समजते. मग आम्ही कामधंदा सोडून, मोलमजुरी सोडून हेलपाटे मारायचे का? असा प्रश्न दुकानदारांना उपस्थित करत आहेत.

यामध्ये मात्र धान्य दुकानदार यांच्याकडे ऐकून घेण्याशिवाय कोणतेही उत्तर नाही. त्यामुळे धान्य दुकानदारांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

> धान्य दुकानदार संघटनेने थेट खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांना दूरध्वनीवरून संपर्क करून ग्रामीण भागामध्ये शिधा उपलब्ध झाला नाही, याबाबत संघटनेने तक्रार दिली आहे. यावर त्यांनी लक्ष घालण्याचे आश्वासन सघटनेला दिले आहे.
>
> **- विजय मंडलिक, जिल्हाध्यक्ष, महासंघ, वेळापूर**



## पिलीवच्या व्यंगचित्र, हास्यचित्र प्रदर्शनात विद्यार्थी गेले हरकून

**पिलीव, दि.१४ सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात व्यंगचित्र व हास्यचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन मुख्याध्यापक शिवाजी कापस यांनी केले. विद्यार्थ्यांना चित्रातून आपले विचार प्रकट करता आले पाहिजेत. हा याचा मुख्य उद्देश असून विद्यार्थ्यांना मराठी विषयाची आवड निर्माण व्हावी. तसेच सध्या कलेला किती महत्त्व असते याची विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने जाणीव व्हावी म्हणूनच या प्रदर्शनाचे आयोजन मराठी विषयाचे शिक्षक अतुल पाटील यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेवेळी परीक्षक म्हणून वैशाली हिरके, कुलकर्णी यांनी काम पाहिले. यावेळी सातपुते, काळे, इंगळे, विद्यार्थी उपस्थित होते.

## सांगोल्यात स्मारक, भवनसाठी १५ कोटी निधी द्या

### राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ सप्टेंबर-**

सांगोला शहरातील मध्यवर्ती ठिकाणी थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले व थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले या दोघांचा पूर्णाकृती पुतळा उभा करण्यासाठी आणि क्रांतीज्योती भवनसाठी १० कोटी रुपयांचा तसेच आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांचे भव्य स्मारक आणि भवन व्हावे यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारने मंजूर करावा अशी मागणी माजी आ.दीपकआबा साळुंखे पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



यावेळी अजितदादांनी दिपकआबांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर सांगोला शहरात सदर स्मारक आणि भवन उभारणीसाठी राज्य सरकार सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले. सांगोला शहर आणि तालुक्यात महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या क्रांतिकारी व सत्यशोधक विचारांवर प्रेम करणारा मोठा समुदाय आहे.शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी फुले दांपत्याचा पूर्णाकृती पुतळा व दोघांच्या नावे क्रांतीज्योती भवन निर्माण व्हावे ही या समुदायाची अनेक वर्षांची आग्रहाची मागणी आहे.

तसेच सांगोला शहर आणि तालुक्यात तसेच प्रामुख्याने माढा लोकसभा मतदारसंघात रामोशी समाज मोठ्या प्रमाणात आहे.सांगोला शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आपल्या प्रेरणादायी महापुरुषाचे भव्य स्मारक आणि राजे उमाजी नाईक भवन व्हावे ही तमाम समाज बांधवांची अनेक वर्षांची मागणी आहे.

## बार्शीच्या आंदोलनासंदर्भात मुख्यमंत्री शिंदेंना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ सप्टेंबर-**



बार्शीत सुरु असलेल्या आ. राजेंद्र राऊत यांच्या ठिय्या आंदोलनाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देण्यात आले. धाराशिव येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बार्शी येथे मराठा भूषण आ. राजाभाऊ राऊत यांचे बेमुदत ठिय्या आंदोलन चालू आहे व आंदोलनाची जी प्रमुख मागणी आहे, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळाले पाहिजे या संदर्भात विशेष अधिवेशन हे झाले पाहिजे. असे निवेदन मुख्यमंत्री साहेब यांना सकल मराठा समाज महाराष्ट्र व मराठा भूषण आमदार राजाभाऊ राऊत यांच्याकडून देण्यात आले. यावेळी विजयनाना राऊत, रणवीर राऊत, ॲड. गणेश हांडे उपस्थित होते.



## लोकमंगल पतसंस्था सांगोला शाखेचा १६ वा वर्धापनदिन साजरा

**सांगोला,दि.१४ सप्टेंबर-**

लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था सांगोला शाखेचा १६ वा वर्धापन दिन साजरा झाला. डॉ. सुनील पवार, डॉ. फिरोज तांबोळी यांनी हृदयरोग प्रतिबंधात्मक उपाय या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे तज्ञ संचालक ॲड. गजानन भाकरे यांनी लोकमंगल पतसंस्थेविषयी माहिती दिली. यावेळी शाखेचे सल्लागार डॉ. शिवराज भोसले व्यासपीठावर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला सांगोला शाखेचे खातेदार, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय अधिकारी लांबोरे, सूत्रसंचालन शाखाधिकारी दिवसे यांनी केले.

## ग्रामीण पश्चिममधील १४ मंडल अध्यक्ष निवडीसाठी सोमवारी मुलाखती

### भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१४ सप्टेंबर-**


महाराष्ट्राच्या विधानसभेवर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठी भाजपने जोरदार तयारी केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सक्रिय कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या खांद्यावर पक्षाची नवी जबाबदारी देण्यासाठी सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात १४ मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने सोमवार दि.१६ सप्टेंबर रोजी माजी खा.रणजितसिंह निंबाळकर आणि जिल्हा प्रभारी विक्रम देशमुख यांच्या उपस्थितीत नूतन मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत.

तसेच भाजप पदाधिकाऱ्यांच्या जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात

**असा आहे मुलाखीतीचा स्वरुप**

सांगोला उत्तर मंडलमध्ये महूद जि.प.गट, एखतपूर जि.प गट, जवळा जि. प. गट, नगरपालिका, दक्षिण मंडलमध्ये घेरडी जि. प. गट, कडलास जि. प. गट, चोपडी जि. प. गट, कोळा जि. प. गट, पंढरपूर मंडलमध्ये भाळवणी जि. प. गट, करमाळा मंडलमध्ये नगरपरिषद,वीट जि. प. गट, पांडे जि. प. गट, ग्रामीण करमाळा मंडलमध्ये कोर्टी जि. प. गट, वांगी जि. प. गट, केम जि. प. गट, कुर्डूवाडी मंडलमध्ये नगरपरिषद, भोसरे जि. प. गट, कुर्डू जि. प. गट, म्हैसगाव पं. स. गण, माढा पूर्व मंडलमध्ये नगरपंचायत, मोडनिंब जि. प. गट, उपळाई जि. प. गट, मानेगाव जि. प. गट, पश्चिम मंडळमध्ये टेंभुर्णी जि. प. गट, बेंबळे जि. प. गट व माळशिरस तालुक्यातील गावे, करकंब मंडलमध्ये करकंब जि. प. गट, रोपळे जि. प. गट, गुरसाळे जि. प. गट, भोसे जि. प. गट, माळशिरस पूर्व मंडळमध्ये यशवंत नगर जि. प. गट, संग्रामनगर जि. प. गट, माळीनगर जि. प. गट, वेळापूर जि. प. गट, तांदुळवादी जि. प. गट, पश्चिम मंडलामध्ये दहिगाव जि. प. गट, फोंडशिरस जि. प. गट, मांडवे जि. प. गट, कन्हेर जि. प. गट, पिलीव जि. प. गट, नगरपंचायत, नातेपुते नगरपंचायत, अकलूज मंडलमध्ये अकलूज शहर, बार्शीमध्ये ग्रामीण व शहर अशी १४ मंडले तयार करण्यात आली आहेत.



आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात प्रत्येक मंडलमध्ये ३०० पेक्षा जास्त बुथ संख्या असल्याने मंडल अध्यक्षांना बूथ प्रमुखांशी वेळेत संपर्कात राहणे व वेळ देणे अडचणीत होत होत आहे.त्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे,शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील,पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे यांच्या आदेशानुसार सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात तीन मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येणार आहे.भाजपच्या वतीने आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील सांगोला,करमाळा,माढा,माळशिरस, पंढरपूर व बार्शी या विधानसभा मतदारसंघात ११५ ते १४० इतक्या बूथचे एक मंडल तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात १४ मंडले तयार करण्यात आली आहेत.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोयाबीन पिकाला सात हजार रुपये हमीभाव देण्याची मागणी

**तेर, दि.१४ सप्टेंबर -**

सोयाबीन पिकाला सात हजार रुपये हमीभाव देण्याची मागणी भारतीय किसान मोर्चाचे धाराशिव तालुका उपाध्यक्ष हनुमंत कोळपे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या जो सोयाबीन पिकाला हमीभाव देण्यात आलेला आहे तो शेतकऱ्यांना परवडणारा नाही. शेतकऱ्यांना नांगरणी, मोगडणी, पाळी, वेचणी, खत-बियाणे, पेरणी, आंतरमशागत, खुरपणी, फवारणी, काढणी, भरडणे यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. शिवाय अवेळी पडलेल्या अतिवृष्टीमुळे झालेले पिकाचे नुकसान या सर्व बाबींचा विचार करता सोयाबीन पिकाला प्रति क्विंटल सात हजार रुपये हमीभाव देण्यात यावा अशी मागणी भारतीय किसान मोर्चाचे धाराशिव तालुका उपाध्यक्ष हनुमंत कोळपे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.



# बहिणींच्या डोळ्यातील आनंद सांगतो; मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना 'सुपरहिट' : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे







## मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाला जिल्हाभरातील लाडक्या बहिणींची लक्षणीय उपस्थिती...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ सप्टेंबर -**

मला मुख्यमंत्री पदापेक्षा भाऊ हा शब्द जिव्हाळ्याचा वाटतो. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाच्या आजच्या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने सहभागी झालेल्या लाडक्या बहिणींच्या डोळ्यातील आनंद पाहून मनाला अतिशय समाधान मिळत आहे.त्यांच्या डोळ्यातील हा आनंद म्हणजे या योजनेच्या यशस्वीतेची पावती आहे. ही योजना 'सुपरहिट' ठरल्याचे यातून स्पष्ट होत असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. परंडा येथे आज महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत, आमदार ज्ञानराज चौगुले, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव, प्रा. शिवाजी सावंत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, अनिल सावंत, दत्ता साळुंखे, प्रा. गौतम लटके, आण्णासाहेब जाधव, राहुल डोके, जयदेव गोफणे, जाकीर सौदागर, सुभाषसिंह सद्दिवाल, रत्नकांत पापा शिंदे, संजय बनसोडे, वाजीद दखनी, गुलाब शिंदे, बालाजी नेटके, शशीकांत खुने यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केल्यानंतर अनेकांनी याविषयी शंका उपस्थित केल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, महिला सक्षम तर देश सक्षम हे ब्रीद लक्षात घेवून राज्य शासनाने ही योजना प्रभावीपणे राबविली. या योजनेतून लाडक्या बहिणींच्या खात्यावर रक्कम जमा झाली असून त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, त्यांच्याकडून मिळणारे प्रेम पाहिल्यानंतर मनाला समाधान मिळत आहे.

लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावरील आनंद असाच कायम ठेवण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह राज्य शासनाच्या इतरही योजना यापुढेही सुरु राहतील. लाडक्या बहिणींची साथ देणारा हा एकनाथ आहे असे सांगून या योजनांसाठी निधीची तरतूदही शासनाने केली असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. तसेच भविष्यात या योजनेचा लाभ टप्प्या-टप्प्याने वाढविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे मला गरिबीची जाणीव आहे. गरीब कुटुंबातील महिलांच्या दृष्टीने दीड हजार रुपयांचे मूल्य खूप मोठे आहे, हे अनेकांना माहित नाही.नुकतेच माझी भेट झाल्यानंतर प्रणाली बारड या बहिणीने मला सांगितले की, दीड हजार रुपयातून तिने घुंगरू कडीचा व्यवसाय सुरु केला. गौरी गणपतीच्या सणात तिला या व्यवसायातून दहा हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले. याच प्रकारे इतरही भगिनींनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून मिळालेले पैसे आपापल्या परीने विविध व्यवसायात गुंतविले आहे. त्यातून त्यांच्या व्यवसायाला आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. महिलांसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिल्यानंतर तोट्यातील एसटी महामंडळ नफ्यात आले. त्याचप्रमाणे आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळेही राज्य शासनाच्या अर्थव्यवस्थेला नुकसान न होता चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून महिलांना एका वर्षात तीन घरगुती गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय घेवून त्यांच्या शिक्षणाला पाठबळ दिले आहे.

मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षांपर्यंत तिच्या बँक खात्यात टप्प्या-टप्प्याने एक लाख रुपये जमा करण्यासाठी लेक लाडकी योजना सुरु केली आहे. लाडक्या बहिणींसोबत लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करून त्यांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. या प्रशिक्षणार्थींना राज्य शासन दरमहा सहा ते दहा हजार रुपये विद्यावेतन देणार आहे, अशी योजना राबविणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

शेतकऱ्यांसाठीही राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेतून साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी सन्मान योजना सुरु करून देशात पहिल्यांदाच राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर दरवर्षी सहा हजार रुपये जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच शेतकऱ्यांना केवळ एक रुपये विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ दिला असून शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

तसेच केंद्र शासनाने कांद्यावरील किमान निर्यात शुल्क रद्द करण्याचा आणि खाद्यतेलावर आयात शुल्क वाढविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना चांगला दर मिळण्यास मदत होणार असल्याने मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाचे आभार मानले.

उजनी धरणातून सीना-कोळेगाव प्रकल्पात पाणी आणण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी येत्या पंधरा दिवसात बैठक घेणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी या प्रकल्पाचे ९८ टक्के काम पूर्ण झाले असून गेल्या तीस वर्षांपासून प्रतीक्षा असलेला हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी लक्ष घालण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना केली होती.

परंडा येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविकामध्ये पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांनी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत गेल्या दोन वर्षात नागरिकांना पुरविण्यात आलेल्या आरोग्य सुविधांचा लेखाजोखा मांडला. गतवर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे वारकऱ्यांना पुरविलेल्या आरोग्य सुविधांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने नोंद घेतली आहे.

याशिवाय आरोग्य विभागाने राबविलेल्या माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित आणि जागरूक पालक सुरक्षित बालक या अभियानांमुळे राज्यातील मातामृत्यू व बालमृत्यू दर कमी करण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राज्यातील १२ कोटी ६५ लाखापेक्षा अधिक नागरिकांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेतून ५ लाख रुपयांचे आरोग्य विमा कवच दिले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबवून जवळपास साडेअकरा हजार युवक-युवतींना नोकरी दिली आहे. बदली प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी पहिल्यांदाच ऑनलाईन प्रणाली विकसित केली असून याद्वारे अधिकारी, कर्मचारी यांच्या बदल्यांची कार्यवाही केल्याचे डॉ. तानाजीराव सावंत म्हणाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसह इतर योजनांच्या महिला लाभार्थ्यांना यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात धनादेश आणि निवड पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी पारंपारिक वेशभूषेत आलेल्या सिंधू पवार आणि पूजा पवार या बंजारा समाजातील भगिनींनी मुख्यमंत्र्यांना राखी बांधली.

प्रारंभी लाडक्या बहिणींचे स्वागत स्वीकारत मुख्यमंत्री शिंदे यांनी कार्यक्रमस्थळी प्रवेश केला. यावेळी अनेक बहिणींनी त्यांना राखी बांधली. तसेच काही महिलांनी त्यांच्यासोबत मोबाईलवर सेल्फी घेण्याचा आग्रह केला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्वतः महिलांच्या मोबाईलमध्ये सेल्फी काढून देत आपल्या लाडक्या बहिणींचा मान राखला.

मुख्यमंत्री शिंदे आणि पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी लाडक्या बहिणींवर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत केले. श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा आणि कवड्याची माळ, श्री विठ्ठल मूर्ती, वीणा व घोंगडी देवून यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांना मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन ऐश्वर्या हिबारे आणि निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी केले. आभार जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी मानले.

कार्यक्रमाला धाराशिव जिल्ह्यातून मोठ्या संख्येने महिला भगिनींची उपस्थिती होती.

### परंडा शहरात महापुरूषांचे पुतळे उभारणीसाठी निधी

परंडा शहरात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे पुतळे उभे करा त्यासाठी मी शासकीय निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली.

### शासकीय कार्यक्रम खासगी व्यक्तींचा पक्षप्रवेश...

मुख्यमंत्री शिंदे व पालकमंत्री सावंत यांच्या उपस्थित महिला सशक्तिकरण अभियान हा शासनाचा कार्यक्रम पार पडला. परंतु यावेळी शासनाच्या कार्यक्रमात इतर पक्षाच्या खाजगी व्यक्तींचे पक्ष प्रवेश कार्यक्रम घेण्यात आले हे योग्य आहे का? अशी चर्चा उपस्थित नागरिकात होत होती.

महिला सशक्तिकरण कार्यक्रमासाठी परंडा-भूम-वाशी मतदारसंघाचे एकमेव भाजप नेते तथा विधान परिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर हे आवर्जून उपस्थित होते. परंतु त्यांना कार्यक्रमात बोलण्याची संधी मिळायला पाहिजे होती. ती का मिळाली नाही याची सुद्धा चर्चा कार्यक्रम पार पडल्यानंतर नागरिकांमध्ये होत होती.

## जिल्ह्यातील दहा खो-खो खेळाडूंची शासन सेवेत थेट नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ सप्टेंबर -**

महाराष्ट्र सह देशाला विविध खेळातून सुवर्णपदक मिळवून देत राज्याची मान उंचावणाऱ्या खेळाडूंना ना कोणतीही परीक्षा, वा इंटरव्यू न देता राज्य शासनाने महाराष्ट्रातील विविध खेळाडूंना थेट नियुक्ती देत सरकारी नोकरी दिली आहे.

त्यामध्ये धाराशिव जिल्ह्याला खो खो ची पंढरी म्हणून ओळखले जाते. त्यातीलच एकूण दहा खो खो खेळाडूंची महाराष्ट्र शासनाने थेट नियुक्ती द्वारे सरकारी नोकर भरती केली आहे. त्यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खो-खो खेळाडू निकिता पवार व गौरी शिंदे यांची राजपत्रित अधिकारी वर्ग दोन पदी थेट नियुक्ती झाली आहे.

तर राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते ऋतुजा खरे, संपदा मोरे, मयुरी पवार, प्रीती काळे, जानव्ही पेठे, किरण शिंदे व निखिल मस्के यांचे वर्ग चार पदी थेट नियुक्ती झाली आहे.

या नियुक्ती बद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मनापासून आभार तसेच महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी घेतलेल्या विशेष परिश्रमामुळे अधिक अधिक खो-खो खेळाडूंना शासन सेवेत नोकरी लागण्यासाठी मदत झाली आहे.

## त्रिशक्ती गणेश मंडळाचा अनोखा उपक्रम; मयत सदस्याच्या मुलींच्या नावे एक लाखांची मुदतठेव

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ सप्टेंबर -**

येथील त्रिशक्ती तरूण मंडळातर्फे जेष्ठ सभासद कै. सुजित साळुंके यांच्या निधन पार्श्वभूमीवर मिरवणुकीचा अतिरिक्त खर्च टाळत परिवाराला एक आधार म्हणून त्यांच्या पाश्चात असलेल्या २ मुलींच्या नावे एक लाख अकरा हजार रुपये-इतकी रक्कम वर्गणी गोळा करुन मुदतठेव पावती माध्यमातून शनिवार दि.१४ रोजी महंत वाकोजीबाबा, महंत मावजीनाथ बाबा, महंत व्यंकट अरण्य बाबा, युवा नेते विनोद गंगणे, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, आनंद कंदले यांच्या हस्ते देण्यात आली.



यावेळी औदुंबर कदम, किशोर साठे, शिरीष कुलकर्णी, किशोर गंगणे, शिवाजी बोधले, अमर हंगरगेकर, शांताराम पेंदे, धैर्यशील दरेकर, गुरुनाथ बडुरे, सचिन ताकमोघे त्याचबरोबर त्रिशक्ती तरूण मंडळाचे आधारस्तंभ नरेश अमृतराव, संतोष छत्रे व मंडळाचे सभासद सूरज छत्रे, शितल अमृतराव, शिवाजी हाके, श्रीकांत छत्रे, पिंटू कामे, बालाजी वाघे, सोनू कोळगे, सौदागर पौळ, नाना अमृतराव, प्रेम पुजारी, महेश पुजारी, बालाजी बेरगळ, अमित छत्रे, आप्पा गायकवाड, शुभम छत्रे, सिद्धिराज कामे निलेश अमृतराव आदी उपस्थित होते.

## देव, धर्म, देश आणि अन्नाचा आदर करा : अश्विनी भोसले




**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.१४ सप्टेंबर -**

श्री सिद्धेश्वर विद्यालय आणि स्वातंत्र्यसेनानी चंद्रशेखर बदोले उच्च माध्यमिक विद्यालय कसगी येथे सखी तक्रार निवारण मंच आणि इको फ्रेंडली क्लब उद्घाटनाप्रसंगी उमरगा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अश्विनी भोसले यांच्या हस्ते पार पाडले. विद्यार्थ्यांनी मन मनगट मेंदू सुदृढ करण्यासाठी व्यायाम योगासन प्राणायाम नित्य करावे असे आव्हान केले.

शरीराबरोबर स्वतःचा विकास घडवण्यासाठी शिक्षणाबरोबर संस्काराची जोड द्या, असेही आपल्या मनोगतात व्यक्त केले.

समाजात फिरताना मुली ताठ मानेने चाला तुमच्या जीवनामध्ये कोणत्याही अडचणी असतील तर पोलीस काका पोलीस सखी यांच्याकडे तुमच्या अडचणी नोंदवा, असेही यावेळी बोलताना म्हणाले. बदलापूर सारख्या घटना घडता कामा नये. त्यासाठी समाजाने जागृत राहावे.

वेळप्रसंगी कायद्याचा मदत घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शिक्षणा संस्थेचे सचिव श्री विठ्ठलराव बदोले यांनी भोसले यांच्या कार्याचे कौतुक केले.

आमच्या विद्यालयात कार्यक्रमात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे प्रमोशन होते आपलेही लवकरच पोलीस अधीक्षकपदी प्रमोशन होईल ही सदिच्छा व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक विठ्ठलराव पटणे, उपाध्यक्ष विजयसिंह राजपूत, मुख्याध्यापक आर.एम. माशाळे, इको फ्रेंडली क्लबचे समन्वयक श्री गुरव मनोज हे उपस्थित होते

कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी भाऊसाहेब पाटील, शिवपुत्र बळशेट्टी, प्राध्यापक महकरकर, सखी मंचाच्या कायनात जमादार, इको फ्रेंडली क्लबचे योगेश काशिनाथ पाटील व मंडळाचे सर्व सदस्य विद्यार्थी यांनी मदत केले.

## उमरा गणेश मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यासाठी स्पर्धा परिक्षा



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१४ सप्टेंबर -**

उमरा गावातील गणेश मंडळातर्फे अभिनव उपक्रम म्हणुन स्पर्धा स्पर्धेचे परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये जागृती व्हावी, स्पर्धा परीक्षेची माहिती व्हावी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेसह विविध वयोगटानुसार वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या.

उमरा येथे सामान्यज्ञान परीक्षेत पाहिले ते दुसरी वयोगटात प्रथम दिव्यांका जाधव, द्वितीय विराज मोहिते, तृतीय शिवानी जाधव या विद्यार्थ्यांनी क्रमांक मिळवले. ३ ते ४ थी गटात प्रथम सिद्दी जाधव, द्वितीय हर्षद जाधव, तृतीय जाधव यांनी क्रमांक पटकावले. ५ ते ७ वी गटात प्रथम गौरी जाधव, द्वितीय प्रणिती विलास जाधव, तृतीय सिधी ना. जाधव यांनी क्रमांक पटकाविले. ८ ते १२ वी वयोगटात प्रथम सुगला प्रकाश शिंदे, द्वितीय यश शिंदे, तृतीय सार्थक जाधव यांनी बक्षीस पटकाविले.

या परीक्षेचे आयोजन हरी जाधव,महादेव जाधव, घातक ग्रुप, श्रीकांत जाधव, विशाल जाधव, मुकुंद जाधव, वैभव शिंदे, किरण जाधव, गणेश जाधव, रवि जाधव (कर निरीक्षक) यांनी पोलिस उपनिरीक्षक विलास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले.

# प्राथमिक शिक्षक संघाचे प्रलंबीत मागण्यांसाठी जिल्हा कचेरीसमोर धरणे




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**
दोनवेळा जिल्हा परिषदेसमोर प्रलंबीत मागण्यांसाठी अखील महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने धरणे आंदोलन केली परंतु आंदोलनाची जिल्हा परिषद प्रशास-नाने दखल न घेतल्यामुळे शनिवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षकांनी धरणे आंदोलन सुरू केले आहे.

प्राथमिक शिक्षक संघाने दोनवेळा जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी लेखी आश्वासने दिली परंतु अद्याप एकही मागणी जिल्हा परिषद प्रशासनाने पूर्ण केली नाही. त्यामुळे शिक्षक संघाच्यावतीने आजपा-सून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. शिक्षकांनी दिलेल्या निवेदनात आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करतांना झालेल्या भ्रष्टाचाराबाबत करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल संघटनेला देण्यात यावा, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, अराजपत्रित मुख्याध्यापक, उच्चश्रेणी मुख्याध्यापकांच्या रिक्त पदावर समुपदेशन पध्दतीने पदोन्नत्या करण्यात याव्यात, प्रलंबीत शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ त्वरीत देण्यात यावा, पात्र प्राथमिक शिक्षकांना विषय शिक्षक म्हणून दर्जोन्नती द्यावी, डीसीपीएस धारक शिक्षकांच्या कपात रकमेचा हिशोब त्वरीत देण्यात यावा, गेल्या तीन वर्षापासून राहीलेल्या जिल्हा पुरस्काराचे त्वरीत वितरण करण्यात यावे, शाळा अनुदान व सीआरसी अनुदान अद्याप का मिळाले नाही याची चौकशी करण्यात यावी, आंतरजिल्हा बदली-ने मार्च २४ मध्ये रूजू झालेल्या शिक्षकांचा अडीच महीन्याचा पगार त्यांना अदा करण्यात यावा आदी मागण्यांचा निवेदनात समावेश असून या मागण्या मान्य होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार असल्याचे शिक्षक संघटनेच्यावतीने सांगण्यात आले आहे. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष व्ही डी देशमुख, सरचिटणीस हरिभाऊ मुटकुळे, कार्याध्यक्ष जी एस खिल्लारी, कोषाध्यक्ष रमेश सुर्यवंशी, एल एन वाव्हळ,के व्ही खंडोमलके, एस डी पाटील, ए एल पवार, जी एस नागभुजंगे, बी एल माखणे, आर व्ही उडंगे, एस व्ही तोंडे, एच व्ही नीळकंठे, बी डी कोल्हे, आर एम व्यवहारे, एस एम जाधव, प्रकाश नीळकंठे, व्ही ई आरू, जी बी पायघन, बी डी साखरे, पी पी कावरखे, आर पी कावरखे, एस बी कांबळे, एच व्ही चव्हाण, एस एस रणवीर, बी एस आसोले, ए एक वाकोडे, ए एस गायकवाड आदींचा समावेश आहे.

# चिंतामणी संस्थानकडून १ लाख ५१ हजार मोदकांचे वाटप होणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**
राज्यासह परराज्यात मोदकाचा गणपती म्हणून प्रसिध्द असलेल्या श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी देशभरातून सुमारे २ लाखांपेक्षा जास्त भाविक येण्याचा अंदाज असून संस्थानकडून १.५१ लाख नवसाचे मोदक वाटप केले जाणार असल्याची माहीती संस्थानचे सचिव दिलीप बांगर यांनी दिली आहे. रक्तदान करणाऱ्यांना थेट विघ्नहर्ता चिंतामणीचे दर्शन मिळणार असून यावर्षी स्तनदा मातांसाठी आठ ठिकाणी हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आला आहे.



अनंत चर्तुदशीच्या दिवशी नवसाचा मोदक दिल्या जातो. त्यानंतर नवस पूर्ण झाल्यानंतर १००१ मोदक गणपतीला अर्पण केल्या जातात. दरवर्षी अनंत चर्तुदशीला मोदक घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. मंगळवार दि १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता संस्थानच्या विश्वस्तांच्या उप-स्थितीत महाआरती झाल्यानंतर नवसाच्या मोदकाचे वाटप केले जाणार असून यावर्षी १ लाख ५१ हजार मोदकांचे वाटप केले जाणार आहे. गणेश चतुर्थीपासूनच दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. यावर्षी अनंत चर्तुदशीला सुमारे २ लाखांपेक्षा जास्त भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे. त्यानुसार संस्थानकडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. पोलिस अध-ीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या पथकाने या भागात पाहणी केली असून ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. नगर पालिकेकडून स्वच्छतेसाठी सर्वच साफसफाई कर्मचारी दिवसभर मदतीला असणार आहेत. आरोग्य पथकही कार्यरत राहणार आहे. शासकीय रूग्णालयात रक्त बाटल्यांचा तुटवडा लक्षात घेता रक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरात रक्तदान करणाऱ्या भाविकांना थेट चिंतामणीचे दर्शनाचा लाभ मिळणार आहे. ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग, गरोदर माता यांना थेट दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. पावसाची शक्यता लक्षात घेता वॉटरप्रुफ मंडप उभारण्यात आला आहे.

हिंगोली शहरातील दानशूर व्यक्ती, व्यापारी, सेवाभावीसंस्था, व्यायामशाळांच्यावतीने भाविकांच्या चहापाणी, नाश्ता तसेच भोजना-ची व्यवस्था केली जाणार आहे. भाविकांच्या वाहतुकीसाठी ऑटो संघटनेकडून मोफत वाहतुक केली जाणार असल्याची माहीती संस्थानचे सचिव दिलीप बांगर यांनी दिली आहे.

# पोलिस प्रशासन, पालिकेच्यावतीने गांधी चौकात कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**
महात्मा गांधी चौकातील हातगाडे, ऑटोचालक यांच्या दादागिरीला कंटाळून व्यापारी महासंघाने बंद पुकारण्याचे आवाहन केले हो-ते परंतु पोलिस अधीक्षक यांच्या आश्वासनानंतर व्यापारी महासंघाने बंद मागे घेतला. शनिवारी येथील महात्मा गांधी चौकात पोलिस प्रशासन आणि पालिका प्रशासनाने हातगाडे चालक, ऑटोचालक यांना समज देत रस्त्यावर आल्यास कडक कार्यवाहीचा इशारा देत चौक मोकळा केला.



व्यापारी महासंघाच्यावतीने शुक्रवारी जिल्हाध्यक्ष गजान-नराव घुगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. यावेळी व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर गाडे आणि ऑटो उभे करणाऱ्यांविरोधात तसेच व्यापारी गोविंद मुंदडा यांना झालेल्या मारहाणीचा निषेध करीत शनिवारी बंदचे आवाहन करण्यात आले होते परंतु पोलिस अध-ीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी व्यापाऱ्यांची बैठक घेत संबंधीतांवर कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. त्यानुसार शनिवारी पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, वाह-तुक शाखेचे पोलिस कर्मचारी तसेच नगर पालिकेचे स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, आकाश देशमुख, दिनेश वर्मा यांच्या पथकाने गांधी चौकातील फळविक्रेते तसेच ऑटोचालक यांना व्यापाऱ्यांच्या दुकानासमोरून हटवून रस्त्याच्या एका बाजूला वाहने उभी करण्यास भाग पाडले. या कार्यवाहीमुळे जवाहर रोड, गांधीचौक, इंदिरा चौक, महावीर चौक येथील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. फळविक्रेते आणि ऑटोचालकांना निशिचत जागा दिली असून रस्त्यावर गाडा अथवा वाहने उभे करणाऱ्याविरूध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोनि पाडळकर यांनी सांगितले.

# आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ७ सप्टेंबर**
पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या ३५०व्या स्मृती वर्षा निमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बाल संगम व पथसंचलन दि १५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे.



या संगमाचे एकत्रीकरण जिल्हा परिषद शाळा मैदाना-वर सकाळी १० वाजता होणार आहे. त्यानंतर तेथुन पथसंचलन निघणार आहे. पथसंचलन शहराच्या मुख्य मार्गावरून पदक्रांत करणार आहे. तसेच या संचालनाचा समारोप आणि बौद्धिक कार्यक्रम दुप-ारी १२ वाजता जिल्हा परिषद शाळा मैदानावर होईल. या संगमास वय १२ ते १७ वर्ष वयोगटातील (वर्ग ७ वी ते १२ वी ) बाल स्वयंसेवक भाग घेऊ शकतील. पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या जीवनाचा आदर्श आणि त्यांच्या कार्याची ओवी लक्षात घेऊन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि हिंदुचे शक्ति प्रदर्शन करण्याचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जिल्हा हिंगोली यांच्यातर्फे सर्व हिंदू बांधवांनी या संगमामधे व बौद्धिक कार्यक्रमास सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### म. ज्योतिबा फुले योजनेच्या प्रलंबीत लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकण करण्याचे आवाहन

हिंगोली- महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र ठरलेल्या (विशिष्ट क्रमांक देण्यात आलेल्या ) परंतु आधार प्रमाणिकरण न झालेल्या शेतकऱ्यांसाठी महाआयटी यांनी दि. १२ ऑगस्ट ते दि. ७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत आधार प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. अद्यापही २५१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण शिल्लक असल्यामुळे दि. १८ सप्टेंबर, २०२४ पर्यंत आधार प्रमाणिकरणाची सुविधा सुरु राहणार आहे. या काळात संबंधित शेतकरी बांधवानी आधार प्रमाणिकरण करुन घ्यावे. यादीतील पात्र शेतकरी आधार प्रमाणिकरण कालावधीत मयत झाले असल्यास त्यांच्या वारसांची नोंदी संबंधित बँकेत तातकाळ करुन घ्यावेत. याबाबत बँकांनी यापूर्वी पोर्टलवर अपलोड केलेल्या मयत खात्यांच्या डिलीशेनची सुविधा दि. १७ सप्टेंबर, २०२४ पर्यत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद घेऊन बँकाना खाती अपलोड करण्याची सुविधा दि. १८ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आ-लेली आहे. हिंगोली जिल्ह्यातील महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी आधार प्रमाणिकरण प्रलंबित असलेल्या पात्र लाभार्थ्यांनी आधार प्रमाणिकरण करुन घ्यावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांनी केले आहे.

### छत्रपती संभाजी नगरमध्ये भरती मेळावा

हिंगोली- मराठवाडा पर्यावरण बटालियन, १३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महार (एमओइएफ आणि सीसी) आणि महाराष्ट्र राज्य व विभागाच्या माजी सैनिक आणि माजी महिला कर्मचाऱ्यांच्या (अकाली निवृत्तीसह) भरतीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील मिल्ट्री कँट येथे दि. २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत माजी सैनिक आणि माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी (समाविष्ट महिला) भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. १३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महामध्ये सहभागी होण्यासाठी स्वयंसेवा करणारे सर्व पात्र उमेदवार दिलेल्या वेळापत्रकानुसार दि. २३ सप्टेंबर, २०२४ रोजी संभाजीनगर मिलट्री कैंट (सर्वत्र स्टेडियम) येथे ५.३० वाजता शारीरिक फिटनेस चाचणीसह भरती सुरु होणार आहे. संभाजीनगर मिलट्री कैंट (सर्वत्र स्टेडियम) येथे दि. २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत सोल्जर जीडी, क्लार्क, हाऊस कीपर, ब्लॅकस्मिथ, मेस कीपर, आर्टीशियन (डब्ल्यूडब्ल्यू), स्टेवार्ड अशी एकूण ५३ पदे भरण्यात येणार आहेत. सोल्जर जीडी या पदासाठी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे. तर उर्वरित सर्व पदासाठी संपूर्ण भारताचा रहिवाशांना सहभागी होता येणार आहे. या भरतीसाठी उमेदवारांसाठी संपर्क क्रमांक ९१६८१६८१३६ हा आहे. तसेच या भरतीच्या अटी व शर्ती तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, हिंगोली यांच्या कार्यालयाशी संपर्क साधता येईल.

# स्कुटीच्या डिक्कीतून ४० हजार रोख, ३.३८ लाखांचे दागिने पळविले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**
शहरातील भर चौकातील एका पावभाजी सेंटरसमोर उभ्या असलेल्या स्कुटीच्या डिक्कीतून चोरट्यांनी ४० हजार रूपये रोख आणि ३ लाख ३८ हजारांचे मुद्देमाल अवघ्या वीस मिनिटात चोरट्यांनी पळविले. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार येथील राज्य राखीव दलातील जवान दादाराव कांबळे हे कुटुंबियांसह शुक्रवारी सकाळी स्कुटीवर हिंग-ोली शहरात आले होते. यावेळी भारतीय स्टेट बँकेतून ५ लाख रूपयांची रक्कम काढली. त्यानंतर त्यातील काही रकमेतून सराफा बाज-ारातून दागिने घेतले. त्यानंतर उर्वरित रकमेतून त्यांनी बुलढाणा बँकेत तारण ठेवलेले सोन्याचे दागिने सोडवून घेतले. दरम्यान, यावेळी त्यांनी त्यांच्या स्कुटीच्या डिक्कीत उर्वरित ४० हजार रूपये आणि १ लाख ९२ हजार रूपये किंमतीचे ३५ ग्रॅम सोन्याचे गंठन तसेच १ लाख ४५ हजार रूपये किंमतीच्या १९ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या अंगठ्या असा ३ लाख ७८ हजार रूपयांचा मुद्देमाल ठेवला होता. त्यानंतर काही अंतरावर असलेल्या महावीर पावभाजी सेंटर येथे नाश्ता करण्यासाठी आले होते. दुपारी एक वाजण्याच्या सुमारास त्यांनी स्कुटी पावभाजी सेंटरच्या समोर उभी केली. त्यानंतर वीस मिनीटातच ते नाश्ता करून परतले असता त्यांना स्कुटीची डिक्की उघडी दिसली. त्यामुळे डिक्कीची तपासणी केली असता त्यातील रोख रक्कम आणि दागिने चोरीला गेल्याचे आढळले. या प्रकारानंतर त्यांनी तातडीने हिंगोली शहर पोलिस ठाण्यात माहीती दिली. पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, जमादार अशोक धामणे, संभाजी लेकूळे, धनंजय क्षीरस-ागर, पोटे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासण्यास सुरूवात केली आहे.

# कृषी सुवर्ण समृध्दीनिमित्त २३ सप्टेंबरला तोंडापूरला शेतकरी मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**
कळमनुरी तालुक्यातील तोंडापूर येथील कृषि विज्ञान केंद्रात दि. २३ सप्टेंबर, २०२४ रोजी कृषि सुवर्ण समृध्दी आठवडा साजरा करण्यात येणार आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला एका शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते होणार असून या मेळाव्याला वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. डॉ. इंद्रमणी हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खासदार नागेश पाटील आष्टीकर, माजी खासदार ड. शिवाजीराव माने उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे सचालक संशोधन डॉ. खिजर बेग, ज्वारी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एल. एन. जावळे, मिलेट मिशन नवी दिल्ली येथून राकेश सिन्हा, मिलेट मॅन ऑफ आंध्र प्रदेश श्री वीर शेट्टी व भारतीय अन्न संशोधन संस्थान, हैदराबाद येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र चापके यांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळणार आहे.

या कार्यक्रमाच्या वेळी प्रदर्शनाचे सुद्धा आयोजन करण्यात आले असून या प्रदर्शनामध्ये भरड धान्याच्या बियाण्याची विक्री सुद्धा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भरड धान्यापासून तयार होऊ शकणाऱ्या पदार्थाचे प्रदर्शन सुद्धा लावले जाणार आहे. मानवी आरोग्याच्या दृष्टिकोनातून भरडधान्याचे महत्त्व मागच्या वर्षी आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष साजरे करून सांगण्यात आलेले आहे. त्या दृष्टिकोनातून हे संपूर्ण दशक हे भरड धान्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरे करण्याचा कृषी विज्ञान केंद्राचा मानस आहे.

या कार्यक्रमास सर्व शेतकरी आणि शेती विषयक काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी या मेळाव्यामध्ये उप-स्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा आणि हिंगोली जिल्ह्यांमध्ये हळद सोयाबीन आणि हरभरा या पिकांसोबतच रब्बी ज्वारीचा पेरा आणि उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय पोषण अभियानात हिंगोली जिल्हा राज्यात अव्वल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १४ सप्टेंबर**
राज्यात राष्ट्रीय पो-षण अभियानांतर्गत पहिल्या पंधरवाड्यात हिंगोली जिल्ह्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून त्याची ऑनलाईन नोंद घेत राज्यात अव्वल क्रमांक मिळवला आहे. मागील वर्षी या अभियानात हिंगोलीने राज्यात चौथा क्रमांक पटकाविला होता.

राज्यात महिला व बाल कल्याण विभागाच्यावतीने अंगणवाड्यांमधून पोषण माह सुरू आहे. त्या निमित्ताने राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत दररोज अंगणवाड्यांमधून विविध उपक्रम राबवले जात असून या उपक्रमांची ऑनलाईन नोंद घेतली जात आहे. राज्यातील सुमारे १ लाख अंगणवाड्यांमधून हा उपक्रम राबवला जात आहे. यामध्ये अंगणवाडीतील बालकांना विविध पोषण रॅली, पोषण वाटीका तयार करणे, स्क्रिनींग राबवणे, घरोघरी योग, गरोदर महिलांची ॲनीमिया तप-ासणी, आहाराबाबत समुपदेशन, पाणी स्वच्छतेचे महत्व यासह इतर उपक्रमांचा समावेशआहे.

दरम्यान, हिंगोली जिल्ह्यात जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी सहा प्रकल्पांतील अंगणवाड्यांमधून उपक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. महिला व बाल कल्याण विभागाच्या आयुक्त कार्यालयाने ठरवून दिलेल्या उपक्रमांसोबतच इतर नावीन्यपूर्ण उपक्रम अंगणवाड्यांमधून राबविले जात आहेत. या उपक्रमांची माहीती व छायाचित्र देखील ऑनलाईन अपलोड केले जात आ-हेत. हिंगोली जिल्ह्यातील सुमारे १ हजार अंगणवाड्यांमधून पहिल्या पंधरवाड्यात ६९ हजार ऑनलाईन नोंदी घेण्यात आल्या आहेत. या उपक्रमांची माहीतीही पालकांना दिली जात असून त्याना स्वच्छता व बालकांची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले जात आहे.

दरम्यान, हिंगोली जिल्ह्याने पहिल्या पंधरवाड्यात राज्यात पहिला क्रमाक मिळवला आहे. जिल्ह्यात राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची गती कायम ठेवून त्याच्या नोंदी घेत दुसऱ्या टप्प्यातही राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांनी सांगितले.

# आज शहर भाजपच्यावतीने मोफत आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**
भारतीय जनता पक्ष शहर कार्यकारणीच्यावतीने येथील रिस-ाला बाजार, गणेशवाडी गारमाळ, कांचन नगर, भाग्यनगर, आशीर्वाद नगर, श्रीनगर, विठ्ठल कॉलनी, बंजारा कॉलनी या भागातील नागरिकांसाठी दि १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत अथर्व लॉन येथे मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

भाजपचे आ.तान्हाजीराव मुटकुळे यांच्या संकल्पनेतून आणि सौजन्यातून विविध शासकीय योजनांचे निशुल्क नोंदणीकरण आणि मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचे उद्घाटन आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी माजी खा ॲड शिवाजीराव माने, भाजपचे जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. गजाननराव घुगे आदीची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी महिलांच्या मेळाव्याला सकाळी ११.०० वा आमदार तान्हाजीराव मुटकुळे हे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. या भागातील सर्व पात्र लाभार्थी नागरिकांनी विशेषता महिलांनी आवर्जून उपस्थित रह-ावे, असे आवाहन शहराध्यक्ष कैलाशचंद्र काबरा,महिलामोर्चाच्या शहराध्यक्षा अल्का लोखंडे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# विमानतळ सुरक्षा पथकाचा कारभार कॉन्स्टेबलच्या हाती

## तीन वेळा बदली होवुनही तळ ठोकुन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

विमानतळ सुरक्षा पथकातील कारभाराविषयी तरुण भारत मध्ये नुकतेच वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. वृत्त प्रकाशित झाल्यानंतर या ठिकाणी होत असलेल्या त्रासाला कंटाळलेल्या अनेकांनी तरुण भारतशी संपर्क साधून व्यथा मांडल्या. तसेच या ठिकाणी सुरू असलेले अनागोंदी कारभाराचा पाढाच वाचला असून येथील सर्व कारभार एका कॉन्स्टेबलच्या हाती असल्याचे त्यांच्या माहितीवरून उघड झाले. हजेरी मेजरची जबाबदारी हेड कॉन्स्टेबल किंवा जमादार यांना देण्याऐवजी कॉन्स्टेबल कडे देण्यात आली असून या कॉन्स्टेबलची देखील या ठिकाणी कार्यरत सहाय्यक पोलीस निरीक्षकाप्रमाणेच तीन वेळा बदली झाली असल्याचे त्यांच्या माहितीवरून उघड झाले.

विमानतळ सुरक्षा पथकात मंजूर संख्याबळापेक्षा केवळ ३५ पोलीस कर्मचारी कार्यरत असून यामुळे कर्मचाऱ्यांना १५ ते १६ तास कर्तव्य बजवावे लागत आहे. त्यातच येथील अधिकाऱ्यांनी आपला मनमानी कारभार सुरू केला असून अधिकारी दोन शिफ्ट मध्ये कर्तव्यावर तर कर्मचाऱ्यांना पंधरा ते सोळा तास कर्तव्यावर जुंपण्यात येत असल्याने कर्मचारी नाराजी व्यक्त करीत आहेत.

विमानतळ सुरक्षा पथकात एकूण ५७ संख्या बळ मंजूर आहे. तर या संख्येप्रमाणेच या ठिकाणी मनुष्यबळ कार्यरत होते. परतू विमानसेवा कधीच सुरु होणार नाही अशी आशा असलेल्या येथील सहाय्यक पोलिस निरीक्षकांनी संख्याबळाची गरज नसल्याचे सांगुन मागील वर्षी २५ जणांना कमी केले. त्यामुळे या ठिकाणी आता केवळ ३५ कर्मचारी कार्यरत आहेत. कमी कर्मचाऱ्यांमुळे या ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असुन त्यांना १५ ते १६ तास कर्तव्य बजवावे लागत आहे तर वरीष्ठ अधिकारी आपल्या मर्जीप्रमाणे दोन शिफ्ट मध्ये कर्तव्य बजावत आहेत.

दरम्यान या ठिकाणी कार्यरत असलेल्या एका कॉन्सटेबलच्या इशाऱ्यावर विमानतळ सुरक्षा पथकाचा कारभार सुरु असल्याचे उघड झाले आहे. येथील महीला सहाय्यक पोलिस निरीक्षकयांची दोन वेळा बदली झाली असुन वरीष्ठांचे आर्शीवाद व राजकिय वरदहस्तामुळे त्या याच ठिकाणी तळ ठाकुन आहेत. तर सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्या आर्शीवादामुळे कॉन्सटेबल तळ ठोकुन असुन या कॉन्सटेबलची देखील तीन वेळा बदली झाली असल्याची माहीती आहे.

# महादेव मंदिरातील दानपेटी फोडणाऱ्या चोरट्यांना अटक




**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. १४ सप्टेंबर -**

नायगाव तालुक्यातील मांजरम येथील महादेव मंदिरातील दानपेटी फोडुणा-या चोरट्यानां नायगांव पोलीसांनी ४८ तासाच्या आत अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठविले असल्याने नायगांव पोलीसांच्या या कारवाई बदल पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार यांनी नायगांव पोलीसांचे अभिनंदन केले आहे.

गेली अनेक वर्षांपासून नायगांव शहरासह नायगांव पोलीस ठाण्याच्या हादीतील चोर-यांचा तपास लागत नव्हता त्यामुळे नागरिक चांगलेच वैतागले होते. एक आठवड्या पुर्वी नायगांव पोलीस ठाण्याचा पदभार पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी स्वीकारताच मांजरम येथील महादेव मंदीराची दानपेटी १० सप्टेंबर ला चोरट्यानी फोडुन आंदाजे ३० हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी सुभाष हावगीर बोमनाळे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांना खब-याकडुन मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी एक पथक तयार करून यातील आरोपी. बाजीराव गोविंदराव शिंदे (वय ३२), गोविंद विठ्ठल शिंदे,(वय३६), शरद धनराज शिंदे (वय २२) यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्यांच्याकडून १५ हाजाराचा मुद्देमाल जप्त करून नायगांव येथील न्यायालयात हजर केले असता त्यानां न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पंडित,पोलीस उपनिरीक्षक भिमराव कदम , पोहेका गणपत पेदे, बाबुराव चरकुलवार, बालाजी शिंदे, बालाजी बामणे नायगांव पोलिसांनी ४८ तासाच्या आत तपास लावल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलीस उपअधीक्षक संकेत गोसावी यांनी कौतुक केले.

## संक्षिप्त वृत्त

### भोकर विधानसभा निवडणुक लढवण्यासाठी वंचित कडून अॅड. कमलेश चौदंते इच्छुक

**मुदखेड** -येत्या काही महिन्याच्या आत विधानसभेची निवडणूक होणार असून त्यात भोकर विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडीकडून माजी नगरसेवक अॅड. कमलेश चौदंते यांनी पक्षाकडे रीतसर विधानसभेसाठी मागणी केली असल्याची माहिती दि.१३ सप्टेंबर रोजी मुदखेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितिले पुढे बोलताना आपली भूमिका स्पष्ट करत निवडून आल्यास समाजातील वंचित ,उपेक्षित, अल्पसंख्याक ,बहुजन सह इतर सामाजिक घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली. भोकर विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून एकमेव अँड तथा माजी नगरसेवक कमलेश चौदंते यांनी केली , उपस्थित स्थानिक पत्रकारांशी संवाद करत विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं देताना अँड कमलेश चौदंते यांनी विधानसभा मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी लघु उद्योग उभारण्यासाठी अर्थ सहाय्य उपलब्ध करत रोजगार निर्मितीसाठी आवश्यक उपाय करण्यात येईल ,विधानसभेतील शेतकऱ्यांसाठी शेतीमध्ये उत्पन्न वाढी शेतीपूरक आधूनिक पद्धतीद्वारे शेती विकास आणि शेती उदिष्ट पूर्ती करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले, वास्तविक स्थितीमध्ये महिलांसाठी सामाजिक सुरक्षा रक्षक म्हणून योग्य ते पावले उचलून सामाजिक सुरक्षा आणि महिला सन्मान देण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे यावेळी नमूद केले, नांदेड जिल्ह्यात एका राजकीय पक्षाच साम्राज्य नष्ट करत विधानसभेतील सामान्य गरीब कुटुंबातील भूमिपुत्रावर विश्वास करत मतदारसंघातील अपूर्ण, रखडलेले आणि प्रलंबित विकास कार्य पूर्ण करण्यासाठी एकदा निवडून देण्याचा आवाहन पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अँड कमलेश चौदंते यांनी व्यक्त केले आहे.या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे माजी संपर्क प्रमुख राहुल चौदंते, अॅड समीर पठाण, अँड बाबसाहेब चौदंते, बाळु राऊत, अँड अमोल भुरे, राजू चौदंते, निखिल चौदंते आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### उमरी दुय्यम निबंधक पदमवार यांचा आर्य वैश्य समाजाच्या वतीने सत्कार

**उमरी**-उमरी शहरात रुजू झालेले दुय्यम निबंधक व्हि.बी. पदमवार यांचा आर्य वैश्य समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे. उमरी शहरातील प्रथम श्रेणी दुय्यम निबंधक कार्यालयात दुय्यम निबंधक म्हणून पदमवार हे रुजू झाले आहेत. त्यांचा आर्य वैश्य समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गोविंद नलवलवार, जयप्रकाश तम्मेवार, बालाजी येरावार, पांडुरंग लापशेटवार, मनोज कोटगिरे, किशोर पबितवार 'गोविंद महाजन, अशोक मामीडवार, नरेंद्र येरावार, संतोष शिरूरकर, अनिल नगनुरवार यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

### लिंबोटी येथे मोफत रोगनिदान शिबिर

**लोहा**- लिंबोटी येथील अभी वाघमारे लिंबोटीकर यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करून ३०० रुग्णांची तपासणी करण्यात आली.सामाजिक कार्यकर्ते अभिभाऊ वाघमारे लिंबोटीकर यांच्या वाढदिवसानिमित्त नुकतेच भव्य मोफत रोगनिदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदरील शिबिरास लोहा व कंधार तालुक्यातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ मिलिंद धनसडे, रमाकांत केंद्रे, मेडिकेअर मल्टीस्पेशालिटीचे संचालक आनंद धनसडे, भीमकीर्तीराज कलंबरकर, वामन दासरे, भीमा सावकर मलशेट्टे, बि. जी. वाघमारे, राजर्षी चे आर. जी. वाघमारे, सतीश कदम, संभाजी गाडगे, राजगुरू दासरे, आरोग्य कर्मचारी अनवर पठाण आदींची उपस्थिती होती.

### सोनखेड येथे गौरी पूजनच्या दिवशी चोरी २लाख ४५ हजार रुपये घेऊन चोरटे पसार

**सोनखेड** -येथील पोलीस ठाण्याच्या समोर वीस ते पंचवीस फुटावर असलेले बाजार मैदान व सराफा लाईन ला असलेले संतोष किराणा दुकानात काल दिनांक ११रोजी रात्री अंदाजे २.४५ वाजण्याचे सुमारास अज्ञात चोरट्यानी दुकानाच्या मागील भागातील पतरा खिडकीच्या साईज चा कापून आत मध्ये प्रवेश केला व दुकानातील महाग वस्तू जसे जर्दा सिगारेट गोल्ड फ्लॅग अशा महागड्या वस्तू पिशवीत भरल्या व गल्लयातील रोख रक्कम १ लाख ४५ हजार व माल असे मिळून २ लाख ४५ हजार चोरला सदरील घटना ही दुकानातील कॅमेऱ्यात कैद झाली असून घटनेची माहिती मिळताच सपोनि पांडुरंग माने व बिट जमादार विशवनाथ हंबर्डे घटनास्थळी पोहचले व श्वान पथक व फॉरेन्सिक टीम ला पण पाचरण करण्यात आले चोरांच्या बोटाचे ठसे काही वास्तुवर असल्याने ते घेण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे दुकान मालक राजेश शंकरराव मोरे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध गु र क्रमांक १६३/२०२४ कलम ३५१(४), ३०५(१) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास स पो उपनिरीक्षक वैशाली कांबळे हया करीत आहेत सोनखेड येथे भर बस स्टॉफ वर किराणा दुकान फोडण्याची ही तिसरी घटना असून प्रत्येक वेळी दुकान फोडण्याची पद्धत सारखीच आहे या अगोदर शेख बाबुमिया यांचे दुकानातं दोन वेळेस याच पद्धतीने चोरी झाली व लाखो रुपयाचा माल चोरीस गेला नंतर बाजार मैदानातील श्री बालाजी किराणा मध्ये त्याच पद्धतीने चोरी झाली आणी लाखो रुपयाचा माल चोरीला गेला फक्त वरील दोन्ही चोरीच्या घटनेची तक्रार त्यावेळी सोनखेड पोलिसांनी घेतली नाही पण आता सर्व चोरी सीसी टी व्ही मध्ये कैद झाली व तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला पण वरील सर्व चोरीच्या घटनेत एकाच पद्धत वाफरण्यात आली हे विशेष चोरीचा तपास करून आरोपीस अटक करण्याचे मोठे आव्हान सोनखेड पोलिसांसमोर आहे.

### रामतीर्थ पोलीस ठाण्यातील तीन पोलीस कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**नायगाव** -रामतीर्थ पोलीस ठाण्यातील तीन पोलीस कर्मचाऱ्यांस पदोन्नती मिळाली असून श्यामसुंदर भवानगीकर यांना हेड कॉन्स्टेबल ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती मिळाली आहे तर पुंडलिक आलेवाड व प्रशांत केसराळीकर यांना नुकतीच पोलीस नाईक ते हेड कॉन्स्टेबल म्हणून पदोन्नती मिळाली आहे. याबद्दल रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि श्रीधर जगताप यांनी या पोलीस कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर बॅज लावून कौतुक केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# लोहा-कंधार तालुक्यात मुंख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे सव्वा लाख लाभार्थी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. १४ सप्टेंबर -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्ग लोहा तालुक्यात ६० हजार २७० तर कंधार तालुक्यात ५८ हजार ६९२ असे एकूण १ लक्ष १८हजार ९६२ लाभार्थी पात्र ठरले आहेत. या बैठकीत ४४ हजार १६४ पात्र लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली. अशी माहिती मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती लोहा विधानसभा अध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी दिली आहे.



तहसील कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लोहा विधानसभा अध्यक्षा प्रणिताताई देवरे (चिखलीकर )यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, बीडीओ डी. के. आडेराघो, कंधार नायब तहसीलदार रेखा चामनर, लोहा नायब

तहसीलदार अशोक मोकले, माजी नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार, समितीचे सदस्य ऑड. गंगाप्रसाद येन्नावार, ऑड मारुती पांढरे, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती पवार, संजय गांधी निराधार विभागाच्या प्रमुख श्रीमती वैशाली चाटे यांची बैठकिला उपस्थिती होती.

लोहा तहसिल कार्यालयाच्या बैठकीत २२ हजार ६३७ अर्ज मंजूर झाले तर लोहा तालुक्यात पूर्वी ३५ हजार ६०५ महिला पात्र ठरल्या. आजच्या बैठकीत २४ हजार ६६५ अर्ज मंजूर करण्यात आले. जे अर्ज त्रुटीत आहेत त्या अर्जदारांच्या कागदपत्रांची पूर्तता करून ते पात्र व्हावेत अशा सूचना दिल्या. योजनेला समाजातील तळागाळात पोहोचवण्यात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या अंगणवाडी सेविका सुपरवायझर, दोन्ही तहसील कार्यालय कर्मचाऱ्यांच्या सहकार्याबद्दल योजनेच्या अध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, तलाठी, ग्रामसेवक व कंधार, लोहा तहसील कार्यालयातील कर्मचारी यांची उपस्थित होती.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात बितनाळ जि. प. शाळा तालुक्यात दुसऱ्यांदा प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. १४ सप्टेंबर -**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन मध्ये ही जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सलग दुसऱ्यांदा उमरी तालुकास्तरावरून प्रथम क्रमांक व जिल्हास्तरीय मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा मूल्यांकनासाठी पात्र ठरणारी बितनाळ ही शाळा प्रथम ठरली आहे .

बितनाळ जि प के प्रा शाळा ही गतवर्षीय उमरी तालुक्यात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियनात प्रथम क्रमांकाचे मान मिळविले.

दिनांक ४ सप्टेंबर २४ रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बितनाळ येथे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन अंतर्गत केंद्रस्तरीय पथक अंतर्गत तपासणी करण्यात आली तपासणी पथककाचे मुख्य एम. सी .पवार , पवळे आर.के. , एन.पी. नागशेट्टी या सरांनी शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, परिसरातील इतर सुविधा याविषयी सखोल माहिती घेऊन गुणदान केले आणि केंद्रामधून प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत तालुकास्तरीय पथक दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोजी शाळेला भेट देण्यासाठी आले शाळेतील विविध मुद्द्यानुसार तपासणी करून सर्व रेकॉर्डची पाहणी करण्यात आली यात्रसंगी उमरी गटशिक्षण अधिकारी नंदकुमार कुलकर्णी तसेच केंद्रप्रमुख शिंदे , पाटील सर, यांनी शाळेतील गुणवत्ता, विद्यार्थी विकास, परिसर विकास, शाळेतील चालू असलेली उपक्रम याविषयी सखोल माहिती घेऊन तालुका स्तरातून जिल्हा परिषदेची प्रथम शाळा गुणांकनाद्वारे ठरवली.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत जिल्हास्तरीय गुणांकन दिनांक १३सप्टेंबर २०२४ रोजी पडताळणीसाठी पदमवार गटविकास अधिकारी बिलोली, तसेच औंढेकर मॅडम अधिव्याख्याता डायट नांदेड, तसेच दौलताबादी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती देगलूर तसेच लोलमवार केंद्रप्रमुख बिलोली, यांच्या पथकांनी जिल्हास्तरीय तपासणीसाठी शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता, शैक्षणिक उपक्रम व इतर अनुषंगाने असलेल्या सर्व बाबींची तपासणी करून जिल्हास्तरीय गुणांकन केले. शाळेतील स्काऊट गाईडच्या पथकाने उपस्थित सर्व मान्यवरांना स्काऊट संचलन करून स्वागत केले व स्काऊट गाईड अंतर्गत विविध उपक्रमांचे सादरीकरण करून दाखवले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत गुणवत्ता, शैक्षणिक रेकॉर्ड, शालेय परिसर, शाळेमध्ये राबवले जाणारे उपक्रम, सर्व पाहून शाळेची व मुख्याध्यापक भगवान संपतवार सर्व शिक्षक स्टॉप स्तुती केली आहे.सर्वात शेवटी गटविकास अधिकारी यांनी शाळेसाठी जिल्हास्तरीय गुणवत्तेमध्ये शाळेचा क्रमांक यावा यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत मुख्याध्यापक भगवान सपंतवार यांनी मागील दोन वर्षापासून तालुकास्तरीय मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळेमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे मुख्याध्यापकांचा सत्कार करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला आहे . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक मुख्याध्यापक भगवान संपतवार , वडमिले एल. के , कळसकर के. एन, मोटरवार व्ही. बी, सौ.कल्याणकर एम. बी , सौ. तांबरे आर. जी , घोगरे यु. एस पेंडलवार एस. पी, शिवणखेडकर एस. जी ' शेख एम एफ आदीने परिश्रम घेतले आहे.

# बैलगाडी मोर्चात जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी सहभागी व्हावे- माधव देवसरकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १४ सप्टेंबर -**

मागच्या पंधरा दिवसापूर्वी पडलेल्या अति मुसळधार पावसामुळे हदगाव- हिमायतनगर तालुक्यातील शेतकरी बांधवांची हाततोंडाशी आलेला घास हिरवल्यामुळे त्यांचे प्रचंड नुकसान झाले असून आज पर्यंत १५ दिवस उलटले तरीसुद्धा शेतकरी बांधवांना कोणत्याही प्रकारची मदत न करणाऱ्या शासनास व अधिकारी यांना जागे करण्यासाठी येत्या बुधवार रोजी दि.१८ सप्टेंबर २०२४ रोजी बैलगाडी मोर्चाच्या आयोजन करण्यात आले असून या मोर्चा दोन्ही तालुक्यातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान स्वराज्य पक्षाचे राज्य उपाध्यक्ष माधवराव पाटील देवसरकर यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले. यावेळेस तिरूपती पाटील भानगुरे ,बालाजी कराळे, सदा पुयड, देवा इंगळे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

हदगाव - हिमायतनगर या दोन्ही तालुक्यात अतिवृष्टी झाल्याची नोंद सुद्धा झाली असून शासन हे फक्त वेळ काढू धरण अवलंबित आहे. तालुक्यातील ज्या नदीकाठाच्या शेतकरी बांधवांच्या जमिनी आहेत त्या पुरामुळे अक्षरशः खरडून गेलेले आहेत त्यांना विशेष बाब म्हणून निदान दोन-तीन वर्ष तरी अनुदान रुपी काही मदत मिळावे तसेच ज्यांचे अतिवृष्टीमुळे पिके वाया गेली आहेत त्यांना शासनाने तात्काळ सरसकट मदत द्यावी यासह अनेक मागण्यांची निवेदन आम्हास या बैलगाडी मोर्च्याच्या रुपाने शासनास द्यायचे आहेत. जर या मोर्चाची दखल शासनाने न घेतल्यास या पुढच्या आंदोलन स्वराज पक्षामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयावर सुद्धा मोर्चा काढू असा गर्भित इशारा माधवराव पाटील देवसरकर यांनी यावेळेस दिला.

# तूकाराम शेळके यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. १४ सप्टेंबर -**

कूंभारगाव ता.बिलोली येथील रहिवाशी कूंभारगावचे माजी सरपंच तूकाराम रामजी शेळके(७५)यांचे दि.१३सप्टेंबर २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचा स्वभाव



मनमिळाऊ होता. सामाजिक, धार्मिक कार्यात त्यांचा नेहमी सहभाग असायचा, त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, नातू, नातवंडे असा परिवार आहे. सहशिक्षक सोपान शेळके यांचे ते वडील होत. शनिवारी दूपारी कूंभारगाव येथे त्यांच्या पार्थीवावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरीक गावकरी मंडळीसह कै.लक्ष्मणराव पा. हस्सेकर संस्थेचे सचिव अशोक पाटील येंडाळकर, मू.अ.ए.जे.कदम तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# महामार्गावरील धनेगावच्या समस्या साठी भेटलो; भाजपात जाण्यासाठी नाही - मनोहर पाटील शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे धनेगावकर यांनी आपल्या गावच्या महामार्गावरील येणाऱ्या समस्याचे निवेदन घेऊन भाजपाचे राष्ट्रीय महामार्गमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली असता, काही माध्यमातून उलट सुलट चर्चेला उदान आले होते. तेव्हा पत्रकार परिषद घेऊन मनोहर पाटील शिंदे यांनी आपण गावच्या समस्या सोडवण्यासाठी निवेदन देण्यास गेलो होतो; भाजपात जाण्यासाठी नाही असा खुलासा १३ सप्टेंबर रोजी आ. मोहनराव हंबर्डे यांच्या संपर्क कार्यालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिला



नांदेड शहरालगत असलेल्या धनेगाव ते लातूर फाटा येथील ३६१ राष्ट्रीय महामार्गावरील धनेगाव येथील उडानपूल किंवा बोगदा असा रस्ता करून देण्याच्या मागणीचे निवेदन भाजपाचे राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना दिनांक ११ सप्टेंबर रोजी नागपूर येथे त्यांचे निवासस्थानी देण्यात आले होते. सदरील निवेदन देतानाचा नितीन गडकरी यांच्यासोबतचा फोटो व्हायरल झाल्याने काही माध्यमाने काँग्रेसचे मनोहर पाटील पुन्हा भाजपात जाणार का ? असा प्रश्न निर्माण करण्यात आला होता. तेव्हा माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक १३ सप्टेंबर रोजी आ. मोहनराव हंबर्डे यांच्या संपर्क कार्यालय येथे पत्रकार परिषदे घेऊन आपण भाजपात जाणार नसल्याचे सांगून मी माझ्या गावच्या राष्ट्रीय हामार्गावरील समस्या सोडवून घेण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यास गेलो होतो, यावेळी नांदेड दक्षिणचे आमदार मोहनराव हंबर्डे, माजी जी प सदस्य आनंदराव गुंडले, धनेगावचे सरपंच पिंटू पाटील शिंदे यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली व आमच्या समस्येचे तात्काळ निराकरण करून दिले. सदरील गावचा प्रवास महामार्गाच्या पलीकडे असून गाव अलीकडेच्या बाजूस आहे त्यामुळे गावातील दैनंदिनी शेतीची कामे, गुरेढोरे इत्यादींना महामार्ग क्रमण करताना दुर्घटना होण्याची दाट शक्यता असल्याने गावाची ही सर्वात मोठी अडचण होती. आणि ती राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याशिवाय सुटणारी नसल्याने या समस्यांचे निवेदन घेऊन नितीन गडकरी यांना दिले तेव्हा सदरील निवेदना तील समस्या व गावकऱ्यांचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात आला अशी माहिती मनोहर पाटील शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आमदार मोहनराव हंबर्डे यांचे चिरंजीव राहुल हंबर्डे यांची उपस्थिती होती.

# गोदावरी अर्बन 'सहकार भूषण' पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

गोदावरी अर्बनने महाराष्ट्रासह, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक व गुजरात या राज्यांमध्ये सहकार रुजविण्यात व वाढविण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल नॅशनल मल्टीस्टेट फेडरेशनच्या वतीने गोदावरी अर्बनला 'सहकार भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार केंद्रीय सहकार सचिव डॉ.आशिष भूतानी, माजी सहकार मंत्री सुभाषबापू देशमुख, सहकार सहनिबंधक संभाजीराव निकम, राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पुरस्कार स्वीकारला. यावेळी मल्टिस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांची प्रमुख उपस्थिती होती. या पुरस्कार सोहळ्यात संस्थेचे उप सरव्यवस्थापक रवी इंगळे, मार्केटिंग मॅनेजर महेश केंद्रे, वणी शाखा व्यवस्थापक विजय मोडक व अधिकारी उपस्थित होते. या सोहळ्याचे आयोजन नॅशनल मल्टीस्टेट फेडरेशनच्या वतीने सहकार भवन शिर्डी येथे करण्यात आले होते.



गोदावरी अर्बनने स्पर्धात्मक युगात सकारात्मक बदल करुन स्वतंत्र कार्यशैली निर्माण केली. सहकार क्षेत्रामध्ये काम करतांना कोणतीही स्पर्धा न करता आपल्या प्रगतीचा आलेख उंचावत ठेवण्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. संस्थेने कायमच ग्राहकाला केंद्रबिंदू मानून विविध योजना राबवल्या आहेत. त्यांना आर्थिक साक्षर करून त्यांच्यामध्ये आर्थिक शिस्त रुजविण्यात कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान आहे. ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर्जेदार व सुलभ सेवा देण्यासाठी संस्था अथक कार्य करीत आहे. संस्था आधुनिकतेची कास धरून काम करीत असते. मागील काही वर्षापासून सहकार क्षेत्रात आमुलाग्र बदल होत आहेत. याचा सकारात्मक स्वीकार करून संस्था वेळोवेळी आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून त्यांना प्रशिक्षित करीत असते.या पुरस्काराबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे संशोधन केंद्राचे अध्यक्ष मा.खा.हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांनी व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, समस्त संचालक, ग्राहक व कर्मचारी यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी वर्धा शाखेचे व्यवस्थापक चंद्रशेखर कामडी,मुख्यालय सहाय्यक व्यवस्थापक गजानन सूर्यवंशी,एकनाथ विभूते,मुख्य शाखा सहाय्यक व्यवस्थापक अतिश कोमटवार, हिंगणघाट शाखाधिकारी कुंदन वेले,माहूर शाखाधिकारी गोपाल खोडके,अर्धापूर शाखाधिकारी सोमेश संगेवार,कुरुंदा विस्तारित शाखा गोपीराज दळवे,सिडको शाखाधिकारी गजानन पाटील,अकोला शाखाधिकारी निखिल जुराफे आदी उपस्थित होते.

CMYK

लातूर

# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## महात्मा बसवेश्वर भवन निर्माण करण्याबाबत आज बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. १४ सप्टेंबर-**

उदगीर येथे महात्मा बसवेश्वर भवन निर्माण करण्याबाबत आज १५ सप्टेंबर रोजी आयोजित बैठकिस बसवभक्त व हितचिंतक मंडळींनी उपस्थित राहण्याचे आवाहन हणमंतराव औरादे व हणमंतराव बुळ्ळा यांनी केले आहे.

उदगीर येथे महात्मा बसवेश्वर भवन निर्माण करणेबाबत सविस्तर चर्चा करुन निर्णय घेणे बाबत बसव भक्त व हितचिंतक यांची बैठक रविवार दि. १५ सप्टेंबर रोजी बसव मंटप, शिवशंकर नागुरे मंगल कार्यालय,नई आबादी देगलुर रोड उदगीर येथे आयोजित करण्यात आली असुन या बैठकित बसवभक्त व हितचिंतकांनी वेळेवर उपस्थित राहवे असे आवाहन निमंत्रक बसवभक्त हणमंतराव औरादे व हणमंतराव बुळ्ळा यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त




### ई- पीक पाहणीची अट रद्द करण्याची मागणी

**शिरूर अनंतपाळ, दि. १४ सप्टेंबर-**

सततच्या पावसामुळे सोयाबीनसह शेती पिकाचे झालेल्या नुकसानीचे अनुदान देण्यात यावे, व २०२३चे अनुदान ई- पिक पाहणीची अट रद्द करण्यात यावी, या मागणीसाठी रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजीराव पेठे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारमार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. जिल्ह्यातील सर्वात लहान तालुका म्हणजे शिरूर अनंतपाळ तालुका आहे. या तालुक्यात एकूण ३५०००हजार शेतकरी आहेत.त्यात २१६३५आणि जॉईंट मध्ये ३०००अंदाजे धरले तर २५००० हजार शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. एका लहान तालुक्यातील दहा हजार शेतकरी जर या लाभापासून वंचित राहत असतील तर, लातूर जिल्ह्यामध्ये वंचित शेतकऱ्यांची संख्या फार मोठी होईल म्हणून मायबाप सरकारने ज्या शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी झाली नसेल त्या शेतकऱ्यांची ई-पिक पाहणी तलाठ्याने केली पाहिजे होती परंतु तलाठ्याकडून ईपिक पाहणी केली नाही. म्हणून रयत क्रांती संघटनेच्या वतीने निवेदन करण्यात येते की, आमच्या मागणीचा सहानुभूती पुर्वक विचार करून आमच्या मागण्या मान्य करून आम्हाला न्याय मिळवून द्यावा. नाही तर आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ओबीसी नेते शिवाजीराव पेठे यांनी दिला आहे. यावेळी हिप्पळगावचे सरपंच ज्ञानोबा मोगले, संजय शिंदे, रामकिशन जाधव, बाळासाहेब कलमे, विनोद कुंभार, नारायण सूर्यवंशी, विष्णू पेटे, विशाल बुरगे, बाळासाहेब चामले, दयानंद सूर्यवंशी उपस्थित होते.



### आ. देशमुख यांची नगरसेवक अजय दुडिले यांच्या निवासस्थानी भेट

**लातूर, दि. १४ सप्टेंबर-**

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण,सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि.१४ सप्टेंबर रोजी दुपारी लातूर शहरातील कव्हा रोडवरील २ नं शिवनेरी गेट शेजारील लातूर शहर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक अजय दुडिले यांच्या रामचंद्र निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली. यावेळी लक्ष्मी बहुउद्देशीय पतसंस्था लातूरचे चेअरमन प्रल्हाद दुडिले, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख अशोक (गट्टूशेठ)अग्रवाल, तुळशीराम गंभीरे अजिंक्य सोनवणे किशोर बिदादा सचिन मोरे सुरेश धानूरे,अंकलकोटे, बळवंत पाटील आनंद मालू उपस्थित होते.

### जिल्ह्यात २६ सप्टेंबरपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश

**लातूर, दि. १४ सप्टेंबर-**

कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १२ सप्टेंबर रोजीच्या १ वाजेपासून ते २६ सप्टेंबर रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

### तेरणा नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**लातूर, दि. १४ सप्टेंबर-**

निम्न तेरणा धरणाची (माकणी धरण) पाणी पातळी ६०३.५५ / ६०४.४० मीटर असून धरणातील उपयुक्त पाणीसाठा ७५.३१ टक्के आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात येणाऱ्या येव्यामुळे (इन्फ्लो) धरण निर्धारित पातळीस भरण्याची शक्यता आहे. त्यानंतर धरणात येणारा येवा तेरणा नदीमार्गे सोडावा लागणार आहे. त्यामुळे तेरणा नदी काठावरील शेतकरी, नदीकाठी वस्ती करुन राहीलेले नागरिक यांनी सतर्क राहावे, जेणेकरुन जिवीत व वित्त हानी होणार नाही, असे लातूर पाटबंधारे विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता अ. न. पाटील यांनी कळविले आहे.

## गुटखा विक्रेत्यांना पोलिसांचा झटका

### लाखोंचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. १४ सप्टेंबर-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथे गेल्या चार पाच दिवसापूर्वी लातूर पोलिस व शिरूर अनंतपाळ पोलिसांच्या वतीने अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येऊन साकोळ येथील एका गुटखा व्यवसायीकावर धाड टाकून लाखो रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, साकोळ येथील आरोपीने महाराष्ट्र शासनांकडून प्रतिबंधीत केलेला गुटखा व पानमसाला तसेच सुगंधित तंबाखु व इतर तंबाखूजन्य पदार्थास विक्री करण्यास प्रतिबंध केले असताना सुध्दा आरोपीने आपल्या फायदयाकरीता लोकांच्या आरोग्यास धोका होइल हे माहित असताना सुध्दा तंबाखूजन्य पदार्थ चोरून विक्रीकरता जवळ साठवून ठेवला. त्यामध्ये बाजीराव लेबल असलेले एकूण ७८ पुडे प्रत्येकी १५० रूपय प्रमाणे ११७७०/- रुपय तर व्ही ०१ लेबल असलेले तंबाखु २८१पुढे प्रत्येकी ३० रूपये प्रमाणे पुढे ज्याची किमत २८४२० रूपयांची तर बाबा बैंक १२० पाकेट २२२०० रुपय व मस्तानी तंबाखु ७५ पुढे ज्याची किंमत ४६०० रुपय तसेच विमल सुगंधित पान मसाला २४४ पुढे ज्याची किंमत ३६६०० रुपय, रजनीगंधा ५ डब्बे १७५० रपये, सिल्व्हर बाबा पाकेट २ ज्याची किंमत ७६०० असा एकूण ८,७२८० रूपयाचा मुद्देमाल पोलिसाकडून जप्त करण्यात येऊन आरोपी रिजवान रशीद बागवान वय २० वर्ष रा. साकोळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर यांच्या विरुद्ध साकोळ बीटचे जमादार राजेंद्र नामदेवकांबळे यांच्या फिर्यादीवरून शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशन मध्ये भाग १ ते ५ गु.र.नं. १८६/२०२४ कलम १२२,२२२,२७४,२७५ए. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास

पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक अन्सापुरे करित आहेत. यावेळी लातूर पोलीस पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संदीप कराड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बेरलाळे, फुलारी, पोलीस आमलदार सोनकांबळे, पोलीस हवालदार राजेंद्र कांबळे आदी पोलिसांच्या विशेष पथकांकडून धाड टाकण्यात आली होती.

## चैत्य स्मारकाचे स्ट्रक्चरल ऑडिट करा

### ठेकेदारावर गुन्हे दाखल करा अन् दर्शन बंद करण्याची आंबेडकरी अनुयांचीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**रेणापूर, दि. १४ सप्टेंबर-**

सहा वर्षा पूर्वी कोट्यावधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या पानगाव येथील चैत्य स्मारक इमारत पावसाळ्यात चहूबांजूनी गळत असून स्मारकाच्या दोन्ही मजल्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने दुर्दैवी घटना घडून जिवीत हानी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.संभाव्य जीवित हानी टाळण्या करिता इमारतीची तात्पुरती दुरुस्ती न करता स्ट्रक्चरल ऑडिट करून स्मारकाचे इमारतीतील अभिवादन (दर्शन) बंद करून संबंधित ठेकेदार यांची चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी आंबेडकरी अनुयांयींनी राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री आणि लातुरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

इमारतीमध्ये भगवान गौतम बुद्धांची मूर्ती ठेवण्यात आली आहे. बाहेरून इमारत भव्य दिव्य आणि सुंदर दिसत असल्यामुळे राज्यभरातून आंबेडकरी अनुयायी पर्यटक या इमारतीला भेट देतात, तर महापरिनिर्वाण दिन एका एका वेळी वीस ते पंचवीस हजार अनुयांयी एकत्रित या इमारतीत वंदना, अभिवादनाकरिता जमतात त्यामुळे दुर्दैवी घटना घडवून मोठ्या प्रमाणात जीवित हानी ही होऊ शकते. संभाव्य जीवित हानी



टाळण्याकरिता चैत्य स्मारक इमारतीची तात्पुरती दुरुस्ती न करता स्ट्रक्चरल ऑडिट करून स्मारकाचे इमारतीतील अभिवादन बंद करून संबंधित ठेकेदार यांची चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे अन्यथा आंबेडकरी अनुयांयींना रस्त्यावरची आणि न्यायालयीन लढाई लढावी लागेल, असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर विष्णू आचार्य, रत्नराज आचार्य, गौतम आचार्य, रणजित आचार्य, महेंद्रकुमार आचार्य, सत्यशिला आचार्य, मालन आचार्य, प्रणिता आचार्य, ज्योती आचार्य, पुष्पा आचार्य, रमेश तिगोटे, सुभाष आचार्य, किशोर आचार्य आदींसह ५० जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## शिव-पार्वती नगरमध्ये प्रवचन महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. १४ सप्टेंबर-**

अहमदपूर येथील थोडगा रोडवरील शिव पार्वती नगरमध्ये पूर्वी स्थापित गणेश मंडळ व्यतिरिक्त या वर्षापासून दुसरे गणेश मंडळ स्थापन करण्यात आले.

या सार्वजनिक गणेश मंडळाने पहिल्याच वर्षात रोज एक या प्रमाणे प्रबोधनात्मक प्रवचना साठी विविध क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना निमंत्रित करून आयोजन करताना येणाऱ्या भाविकांसाठी रोज महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

पहिल्या दिवशी पाहिले पुष्प हे हभप सुमित्रा भास्कर राव केंद्रे यांनी आजचे अध्यात्म यावरील प्रवचनाचा भकांनी लाभ घेतला. दुसऱ्या दिवशी शिव पार्वती गणेश मंडळाच्या विचार पिठावरुन संत साहित्यातील प्रबोधन स्थळे या विषयावर श्री हरिदास तम्मेवार यांचे व्याख्यान झाले.

पुष्प गुंफताना शिक्षक असलेले भरत कराड म्हणाले की, जो पर्यंत आजच्या तरूण पिढीमध्ये आपन राष्ट्रप्रेम, राष्ट्रभावना, राष्ट्रहित जोपासून तरूण पिढी व्यसनमुक्त चारित्र्य संपन्न बनवू शकत नाही,आमच्या बहिणी -मुली जोपर्यंत घराबाहेर पडल्यास मुक्त श्वास घेऊ शकत नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने गणेशोत्सव साजरा करण्यामागची लोकमान्य टिळकांची संकल्पना पूर्ण होऊच शकणार नाही.

श्रीमती मिनबाई मुंढे यांनी चौथे पुष्प गुंफताना सांगितला गणपती का बसवतात याचा धार्मिक अर्थ. देवापरमेश्वरा विषयी प्रत्येकाच्या भावना जरी वेगळ्या असल्या तरी ईश्वर हा सूर्य प्रकाशा सारखा सर्वत्र एकच असतो. प्रसिद्ध वक्ते प्रा.डॉ. विजयकुकर ढोले यांनी विचाराच्या पाचव्या पुष्पात गणरायांनी विश्व प्रदक्षणेत शिव-पार्वतीला प्रदक्षणा का घातली - कारण - आपली व विश्वाची निर्मिती आई - वडला पासूनच आहे. आई-वडलांनी आपल्याला कष्टाने मोठे केले याचे भान आज प्रत्येकाने ठेवले पाहिजेत. संतवचन व अभंग यावर आजच्या तरुणांनी विचार करण्याची गरज आहे



कारण संत विचार व अभंग हे त्रीकालाबाधीत आहेत ते समाजाला घडविणाऱ्याचे कार्य करत असतात यावर प्रा ढोले यांनी यावेळी प्रदीर्घ विचार मांडले.

शंकर महाराज घाटांगेकर यांनी आपल्या किर्तनात गणेशउत्सवातून सर्व समाज एकत्र येतो यातून तरूण वर्गाला प्रवचन - किर्तन अशा माध्यमातून संत विचारांचे स्मरण व प्रबोधन करण्याची गरज असल्याचे सांगत उपदेश हा एकणाऱ्यांना करावा मुर्खाला करू नये. मानवी जीवन हे एकदाच मिळत असल्याने जीवनात सत्कार्य करून आत्मज्ञान प्राप्त करत विकृतीला दूर करा हे कलियुग आहे विकृत प्रवृत्तीचा काळ आहे. भगवंत कृपेने आपल्याकडे संतसाहित्याचे ज्ञान मोठे आहे ते आत्मसात करून जिवन सत्कारणी लावा असा उपदेश त्यांनी आपल्या किर्तनातून केला. या मंडळाच्या सर्वांनी सेवाभक्तीतून परिश्रम घेतले.




## प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर यशाला गवसणी घालता येते

- जिल्हा ग्राहक न्यायाधीश मंदाकिनी भोसले
- गुळखेडा येथील विद्यार्थीनींची विभागीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १४ सप्टेंबर-**

मुला मुलींच्या शिक्षणासाठी पालकांची भुमिका महत्वाची असून यात मुलीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलून मुलींना शिक्षण देऊन सक्षम करणे गरजेचे आहे. शैक्षणिक काळात सोशल मिडियावर वेळ न घालवता विद्यार्थ्यांनी स्वताःच्या करिअरकडे लक्ष देऊन शिक्षण घ्यावे. इच्छाशक्ती प्रबळ असेल तरच यशाला गवसणी घालता येते, असे प्रतिपादन जिल्हा ग्राहक मंचाचे न्यायाधीश मंदाकिनी भोसले यांनी केले.

औसा तालुक्यातील गुळखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अक्षरा कोराळे व आदीबा शेख या दोन विद्यार्थिनींची विभागीय पातळीवर बुद्धीबळ स्पर्धेसाठी निवड झाली. त्यानिमित्ताने शालेय समिती व गावकऱ्यांच्यावतीने विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांचा सत्कार व गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. त्यावेळी ग्राहक जिल्हा न्यायाधीश मंदाकिनी भोसले बोलत होत्या. केंद्रप्रमुख आर. के. जाधव, माजी सरपंच दगडू गिराम, शालेय समितीचे अध्यक्ष शाम भोसले, शिवकुमार स्वामी, गुंडेराव भोसले, शिवाजी भोसले, पत्रकार विठ्ठल पांचाळ, मुख्याध्यापक रवि भोसले, सतीश भुजबळ, आकाश कोळी, महादेव भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा क्रीडा विभाग यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्यानंतर या दोन्ही विद्यार्थिनींची विभागीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी निवड झाली. यामुळे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना बुध्दीबळ शिक्षण देणारे आकाश कोळी यांचा ग्रामस्थातर्फे सत्कार करुन आभार मानण्यात आले. सूत्रसंचालन भुजबळ तर आभार खोजे यांनी मानले.

## गणेश विसर्जनासाठी पालिकेची तयारी पूर्ण

### १५ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र; ३९४ अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १४ सप्टेंबर-**

प्रदूषण टाळण्यासाठी शहरातील नागरिकांनी आपाल्या घरी स्थापित केलेल्या गणेश मूर्तीचे विसर्जन जलाशयात न करता मनपाच्या संकलन केंद्रांकडे त्या मुर्ती द्याव्यात.सार्वजनिक गणेश मंडळांनी १२ नंबर पाटी येथील खदानीत विसर्जन करावे,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.मुर्ती संकलनासाठी पालिकेकडून ३९४ अधिकारी/कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



शनिवार दि. ७ सप्टेंबर रोजी स्थापित केलेल्या श्रीगणेशाचे मंगळवारी (दि.१७ सप्टेंबर ) विसर्जन होणार आहे.शहरातील नागरिक व भक्त गणरायाला निरोप देणार आहेत. प्रथेप्रमाणे श्रीगणेशाच्या मुर्तीचे जलाशयात विसर्जन केले जाते.गेल्या कांही वर्षांपासून प्रदूषण टाळण्यासाठी मनपा गणेश मूर्ती संकलन केंद्र कार्यान्वित करते.यातून प्रदूषणाला कांही अंशी प्रतिबंध करता येऊ शकतो.गणेशभक्तांनी आपल्या मुर्ती संकलन केंद्रात देण्याचे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे. सार्वजनिक गणेश मंडळांना आपल्या मोठ्या मूर्तीचे १२ नंबर पाटी जवळील खदानीत विसर्जन करता येणार आहे.यासाठी संबंधित मंडळांनी स्वतःच्या वाहनाने मूर्ती तेथपर्यंत आणाव्यात. श्री सिध्देश्वर मंदीर परिसर,कव्हा रोड, बांधकाम भवन या ठिकाणी मिरवणुकी नंतर श्री गणेश मुर्तीचे संकलन करण्यात येणार आहे.

घरगुती गणेश मंडळांसाठी मनपाकडून शहरात १५ ठिकाणी संकलन केंद्र उभारण्यात आली आहेत.या ठिकाणी मनपाचे कर्मचारी दिवसभर उपस्थित राहून मुर्तीचे संकलन करणार आहेत.नांदेड रस्त्यावर यशवंत शाळा,विवेकानंद चौकातील पाण्याची टाकी,मंठाळे नगरमध्ये मनपा शाळा क्रमांक ९, सिध्देश्वर मंदिर, जिल्हाधिकारी कार्यालया जवळील शासकीय विहीर, बार्शी रस्त्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची पाण्याची टाकी,दयानंद महाविद्यालयाचा पार्किंग परिसर,सरस्वती कॉलनीतील पाण्याची टाकी,टाऊन हॉल, बांधकाम भवन,कव्हा रस्त्यावर खंदाडे नगर, साळे गल्लीतील यशवंत शाळा,तिवारी यांची विहीर,गणेश नगर व काशी विश्वेश्वर मंदिर ग्रीन बेल्ट या ठिकाणी यावर्षी मूर्ती संकलन केंद्र उभारली जाणार आहेत. श्री गणेश विसर्जना वेळी आपल्याकडील गणेश मूर्ती मनपाने उभारलेल्या संकलन केंद्रात द्याव्यात. पालिकेकडून या सर्व मूर्तीचे १२ नंबर पाटीवरील खदानीत विधीवत विसर्जन केले जाणार आहे. नागरिक व गणेश भक्तांनी या उपक्रमात मनपाला सहकार्य करावे.प्रदुषणाला आळा घालण्यास सहकार्य करावे, असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## बेलकुंड जलसिंचन उपसा योजनेच्या सर्वेक्षण कामास मंजुरी

### १७ गावातील ९० हजार एकर जमिन सिंचनाखाली; आ. पवारांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १४ सप्टेंबर-**

निम्न तेरणा प्रकल्पामुळे धाराशिव व लातूर जिल्ह्यातील अनेक गावे बॅरेजेसच्या माध्यमातून सिंचनाखाली आले आहेत. पण प्रकल्पाच्या जलाशयापासून ८-१० किमी अंतरावर असलेली बेलकुंड व परिसरातील गावे योजनेअभावी सिंचनापासून वंचित राहिली होती. त्यामुळे निम्न तेरणा प्रकल्पाच्या जलाशयातून बेलकुंड उपसा जलसिंचन योजना तातडीने मंजूर करण्यात यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे काही दिवसांपूर्वी केली होती.यानंतर केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून तेरणा प्रकल्पाच्या जलाशयातून बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषण कामास मंजुरी मिळाली आहे. सर्वेक्षणानंतर तातडीने अंदाजपत्रक तयार करून अंतिम मंजुरी मिळवून योजना लवकरात लवकर प्रत्यक्षात कार्यान्वित केली जाणार असल्याची माहिती आ. अभिमन्यू पवार यांनी दिली आहे.

निम्न तेरणा प्रकल्पाच्या प्रवाही कालव्याद्वारे भिजणारे उमरगा, निलंगा व औसा तालुक्यातील ११६१० हे. सिंचन क्षेत्र तसेच आशिव उपसा सिंचन योजनेवरील ६८९० हे. सिंचन क्षेत्र व पाणीसाठा कायम ठेवण्यात आला असून मंजूर प्रकल्पिय सिंचनात कोणतीही कपात प्रस्तावित करण्यात आली नाही. निम्न तेरणा प्रकल्पाच्या खालील भागात तेरणा नदीवरील बांधण्यात आलेल्या नऊ बॅरेजेसच्या लाभ क्षेत्रातील पाणीवापरात होणारी बचत विचारात घेऊन प्रस्तावित बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेचे नियोजन करण्यात आले आहे. निम्न तेरणा प्रकल्पाच्या फेरनियोजनामुळे कायम सिंचानापासून वंचित असलेल्या बेलकुंड व परिसरातील १६ ते १७ गावांमधील साधारण ३००० ते ३५०० हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे हा भाग सुजलाम सुफलाम होऊ शकतो.

#### शेतकऱ्यांनी मानले आ. पवारांचे आभार

बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेमुळे या भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी ओलिताखाली येणार असून त्यासाठी शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक उन्नती होईल गेल्या शेकडो वर्षांपासून कायम कोरडवाहू असलेल्या जमिनी आ अभिमन्यू पवार यांच्या प्रयत्नाने ओलिताखाली येणार असल्याने या भागातील शेतकरी सुखावला आहे. यामध्ये बेलकुंड एमआयडीसीची भर पडणार असल्याने बागायती शेती व उद्योग या दोन्ही बाजूंचा भक्कम आधार मिळणार असून या भागाचा कायापालट होणार असल्याने या भागातील शेतकऱ्यांनी आ. अभिमन्यू पवार यांचे आभार व्यक्त केले.